
माणूस
दसरा विशेषांक
सव्वा रुपया

# सवलतीच्या दोन आकर्षक योजनांची

## लोकाग्रहास्तव केलेली मुदतवाढ



## राजा शिवछत्रपती

भाग एक ते दहा

लेखक : ब. मो. पुरंदरे

प्रसिद्धी : डिसेंबर १९६४

दीड हजार पृष्ठांच्या ज्या साधार पण ललितरम्य शिवचरित्राने मराठी वाचकाला आजवर एक अपूर्व मोहिनी घातली,

जो ग्रंथ प्रत्येक मराठी भाषिकाच्या घरी असावा यासाठी आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी अव्वल आणि मातब्बर मंडळी लेखद्वारा, पत्रद्वारा, संभाषणांतून वा भाषणांतून आपला अमोल शब्द वेचीत आहेत,

तो हा ग्रंथ सर्वसामान्य परिस्थितीतील मराठी माणसाला विकत घेऊन संग्रही ठेवता यावा म्हणून –**राजहंस प्रकाशन संस्था**

सवलतीच्या पुढील दोन योजना जाहीर करीत आहे.

**१ : राजहंस प्रकाशन संस्थेकडे पाच वर्षांसाठी शंभर रुपयांची ठेव ठेवणारास हे संपूर्ण शिवचरित्र व्याजाच्या मोबदल्यात विनामूल्य घरपोच दिले जाईल. पाच वर्षांनंतर ठेव परत करण्यात येईल. यासंबंधी अधिक तपशील हवा असल्यास पत्रकाची मागणी संस्थेकडे करावी.**

**२ : या तृतीय आवृत्तीच्या संपूर्ण शिवचरित्र संचाची किंमत प्रसिद्धीनंतर रुपये पस्तीस राहील. १५ नोव्हेंबर १९६४ पर्यंत रुपये पंचवीस फक्त पाठवून प्रसिद्धिपूर्व ग्राहक होता येईल.**

[ **संच पोस्टाने हवा असेल तर रजि. पोस्टखर्चासाठी अडीच रुपये अधिक पाठविणे.** ]

ठेवीची वा प्रसिद्धिपूर्व ग्राहकाची रक्कम ' राजहंस प्रकाशन ' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

चेक असल्यास शक्यतो पुणे-मुंबई येथील बँकेवरचा पाठवावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास वटणावळ ७५ न. पै. अधिक पाठवावेत.

चित्रकार दीनानाथ दलालांची शंभरहून अधिक रेखाचित्रे व आकर्षक मुखपृष्ठे, ऐतिहासिक स्थळांची व व्यक्तींची छायाचित्रे, पांढरा शुभ्र कागद, मोहरेदार छपाई, टिकाऊ बांधणी–या व इतर वैशिष्ट्यांनी युक्त असल्याने, एका सुबक पेटीतून वाचकांच्या भेटीस येणारा हा संच म्हणजे प्रत्येक कुटुंबाचे, प्रत्येक ग्रंथालयाचे एक भूषणच ठरणार आहे.

**राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २**

वर्ष चौथे : अंक सातवा

★

१५ ऑक्टोबर १९६४ : सव्वा रुपया

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २

दूरध्वनी : ५७३५९




## स्व रू प - द र्श न


व्यक्ती आणि वार्ता :

- दिग्दर्शक जॉन फोर्ड
  - ☐ के. टी. देशमुख

कथा :

- नष्टनीड
  - ☐ रवींद्रनाथ टागोर
- पहारा
  - ☐ ब. मो. पुरंदरे
- आणि वाघ आलाच नाही
  - ☐ गो. नी. दांडेकर
- फुलाआत्ती
  - ☐ आनंद यादव
- नवरदेव- एकांकिका
  - ☐ वामन पात्रीकर

कविता :

- डॉ. सरोजिनी बाबर, सुधा ओक, सुमन करमरकर, सुनेत्रा ओक, इंदिरा कुलकर्णी, सुधा कुलकर्णी

पुस्तकपरिचय :

- नाझी भस्मासुराचा उदयास्त
  - ☐ रा. म. शास्त्री

विविध विषय विभाग :

- रंगभूमी : **अपराध मीच केला**
- क्रीडा : **दोन स्फुटे**

शिवाय :

- राजकीय घडामोडींचे समालोचन
- दिल्लीचे विशेष वार्तापत्र
- जगाच्या पाठीवर • चकाट्या आदि सदरे


मुखपृष्ठ : **अनंत सालकर**

रवींद्रनाथ टागोर, माधवी मुकर्जी आणि सौमित्र चटर्जी
(चारुलता चित्रपटात)

[ दिग्दर्शक जॉन फोर्ड या लेखातील छायाचित्रे पॅरामाउंट, वॉर्नर ब्रदर्स, ट्वेंटिएथ सेंचरी फॉक्स, या चित्रसंस्थांच्या सौजन्याने ]

१. **वर्गणीदारांस सूचना** : दीपावली व सर्व खास अंकासह माणूसची वार्षिक वर्गणी दहा रुपये व परदेशी पंधरा रुपये आहे.

२. **वर्गणी मनीऑर्डरने** यावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'व्यवस्थापक माणूस' या नावे पुणे किंवा मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा असल्यास ७५ पैसे वटणावळ पाठवावी.

३. **अंक न पोचल्याचे** कळवावयाचे झाल्यास ५ व २० तारखेपर्यंत वाट पाहून मगच कळवावे. अंक आमचे कार्यालयात शिल्लक असल्यास जरूर पाठविले जातात.

४. **लेखकांसाठी** : स्वीकृत साहित्याचाच फक्त निर्णय कळविला जातो. नापसंत साहित्याचा निर्णय व ते परत हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठविणे अत्यावश्यक आहे.

५. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

६. या मासिकात व्यक्त झालेली मते 'माणूस' पाक्षिकाच्या चालकांची अधिकृत मते असतातच असे नाही.

७ **जाहिरातींचा व्यवहार** हा परस्पर विश्वासाचा असतो. गिऱ्हाइकाच्या इच्छेनुसार जाहिरात छापण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. तरीही काही तांत्रिक अडचणीमुळे जाहिरातीत कमी जास्त फरक झाला तर त्याची जबाबदारी व्यवस्थापकांवर नाही.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि. ३८३ नारायण पेठ पुणे, येथे छापून ४१९ नारायण पेठ पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.



## जेव्हा हिंदु मनुष्य हा हिंदुत्वातीत होतो

हिंदुस्थानातील इतर जाती जोपर्यंत 'हिंदुस्थान आधी' असे म्हणत नाहीत, किंवा जगामधले इतर लोक 'मनुष्य-जाती आधी' असे तत्त्वज्ञान आचरित नाहीत, परंतु, जोपर्यंत हे लोक चढावाची व स्वसंरक्षणाचीच तयारी करण्याकरिता, केवळ जातीच्या अथवा धर्माच्या संकुचित दृष्टीने संघटना आणि जूट करण्याचा विश्वप्रयत्न करीत आहेत, तोपर्यंत– हिंदुनो ! तोपर्यंत तरी तुम्ही, शक्य तर तुमच्या जातीच्या सामाजिक जीवनाला ज्ञानतंतूंच्या जाळ्याप्रमाणे एकजीव करणारी सर्व बंधने दृढ करा. तुमच्यापैकी जे कोणी, या अत्यंत जिव्हाळ्याच्या बंधनांना तोडून टाकण्याचा आत्मघातकी प्रयत्न करतील, किंवा 'हिंदु' हे नाव नाकार-तील, त्यांना पुढे असा विषमय अनुभव येईल की, आपल्या जातीच्या जीवनाच्या आणि सामर्थ्याच्या झऱ्यापासूनच त्यांनी स्वतःला तोडून घेतले आहे.

..आणि हेहि तितकेच निश्चित आहे, की जेव्हा केव्हाहि अशी वेळ येईल, तेव्हा हिंदु लोक सर्व जगाला दुसरे तिसरे काहीही सांगणार नाहीत. तर तेच जगाला करावयास सांगतील की, जे गीतेने सांगितले, जे बुद्धाने उपदेशिले. ज्यावेळी 'हिंदु' मनुष्य हा हिंदुत्वातीत होतो, त्यावेळेला तो श्रीशंकराचार्यांप्रमाणे 'वाराणसी मेदिनी' म्हणून गावयाला लागतो व श्रीतुकाराममहाराजांप्रमाणे 'आमुचा स्वदेश! भुवनात्रयामध्ये वास!' असे गर्जुन उठतो. 'काय म्हणता? माझा स्वदेश? ऐका तर, बंधूनो! माझ्या देशाच्या मर्यादा म्हणजे त्रैलोक्याच्या मर्यादा. तीच माझ्या देशाची सरहद्द.

––सावरकर

# पेन्शन कसले देता? 'भारत रत्न' द्या!

सावरकरांना भारत सरकारतर्फे 'पेन्शन' देण्याचा विचार चालू असल्या-बद्दलची एक बातमी पुण्याच्या 'सकाळ' वृत्तपत्राने प्रसिद्ध केली आहे. पंडित नेहरूंच्या निधनानंतर सावरकरांवरची सरकारी अवकृपा संपण्याची व दिल्ली दरबारकडून त्यांचा योग्य तो मान-सन्मान होण्याची शक्यता अनेक जण बोलून दाखवीत होतेच. पण भारत सर-कार सावरकरांना 'पेन्शनी'त काढण्याचा विनोद करील अशी मात्र कोणालाच कल्पना नव्हती. बहुधा भारत सर-कारचा तसा हलका विचार नसावाहि. बातमीत काही तरी चूक किंवा अपुरे-पणा किंवा जाणूनबुजून केलेला खोड-साळपणा नसेलच असेहि काही सांगवत नाही.

ब्रिटिश सरकारने जप्त केलेली आपली स्वतःची हक्काची मालमत्ता परत मिळावी म्हणून ज्यांनी सरकारपुढे शब्दहि टाकला नाही ते सावरकर असल्या मदतीच्या तुकड्याला नकार दर्शवतील याचीच शक्यता अधिक वाटते.

वास्तविक सरकारने 'भारतरत्न' ही सर्वश्रेष्ठ पदवी सावरकरांना देऊन त्यांच्या देशसेवेचा यथोचित गौरव कर-ण्याची संधि लवकरात लवकर आपणहून साधून घेतली पाहिजे.

नेहरू युगात कटाक्षाने टाळले गेलेले हे कर्तव्य नव्या शास्त्रीयुगात आवर्जून पार पाडले जाईल अशी अपेक्षा आहे.

—संपादक



म्या असता दिवस नसे व्यर्थ गमविला
दिवसास्ताचेहि म्हणूनि दुःख ना मला ॥

Pratibha 642




साखर कारखान्याला लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची उभारणी, त्याचे विद्युतिकरण आणि त्याला लागणाऱ्या बॉयलरची बांधणी व उभारणी हे **नायक्रोम मेटल वर्क्सचे** खास वैशिष्ट्य.


४ लक्ष चौ. फूट क्षेत्रफळ असलेल्या संरक्षण खात्याच्या कारखान्याची आंखणी, जोडणी व उभारणी अवघ्या सात महिन्यांत पुरी करण्याचा अभिमानास्पद विक्रम नायक्रोम मेटल वर्क्सनें केला. मुख्य कारखान्यातील इतर बांधकामें चालू आहेत. नायक्रोम मेटल वर्क्स: लोखंडी खिडक्या, लोखंडी दारें, सरकती दारें व सुप्रसिद्ध **विश्वास** रोल अप शटर्स व रोल अप ग्रिल्स यांचेंहि उत्पादन करतात.

नायक्रोमने उभारलेले
काही उल्लेखनीय कारखाने

• हेवी डिफेन्स प्रॉजेक्ट • हिंदुस्थान ऑरगॅनिक केमिकल्स लि. • अँटि-फ्रिक्शन बॉलबेअरिंग कॉर्पोरेशन • पॉलिकेम लि. • सँडविक एशिया लि. • फिलिप्स (इंडिया) लि. • खोसला मेटल पॉवडर्स प्रायव्हेट लि. • संकेश्वर, सोमेश्वर व कुंभीकासारी येथील सहकारी साखर कारखाने • आणि इतर कितीतरी

**नायक्रोम** मेटल वर्क्स

४६, वेल्स्ली रोड, संगम, पुणे-१ फोन: २४२८७ तार: नायक्रोम पुणे.



[ कैरो परिषदेतील रेडिओ फोटो ] परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग, पंतप्रधान शास्त्री, अध्यक्ष नासर

# आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील पहिले दमदार पाऊल

'एक वेळ मी आंतरराष्ट्रीय राजकारण विसरेन; पण देशातील गरिबीचा मला विसर पडणार नाही. कारण मी स्वत: गरिबीत दिवस काढलेले आहेत.'

असे उद्गार लाल बहादूर शास्त्री यांनी पंतप्रधान झाल्यावर केलेल्या पहिल्याच जाहीर भाषणात कलकत्ता येथे नुकतेच काढले होते.

पण कैरो येथील अलिप्त राष्ट्रांच्या शिखर परिषदेतील शास्त्रीजींची कामगिरी पाहता देशातील गरिबीप्रमाणेच आंतरराष्ट्रीय प्रश्नावरही ते चांगलंच लक्ष ठेवून आहेत याची साक्ष पटते.

आंतरराष्ट्रीय तंटे शांततेच्या मार्गाने सोडवावेत, दुसऱ्या राष्ट्राच्या प्रादेशिक अभंगत्वाला धोका उत्पन्न होईल अशा तऱ्हेने बळाचा वापर करू नये, आक्रमणाला मान्यता देऊ नये, भिन्न राजकीय व सामाजिक ध्येयप्रणाली असलेल्या राष्ट्रांमध्ये शांततामय सहअस्तित्वाचा दृष्टिकोन असावा, प्रस्थापित सीमारेषेचा भंग होऊ नये यांसारखे महत्त्वाचे मुद्दे, चीनला अनुकूल असलेल्या काही राष्ट्रांचा विरोध असताहि परिषदेतर्फे काढण्यात आलेल्या अखेरच्या निवेदनात ग्रथित करण्यात भारताला मिळालेले यश हा शास्त्री–स्वर्णसिंग जोडीचाच विजय समजला पाहिजे.

# दिल्ली कुठे आहे?

**' माणूस '-च्या विशेष प्रतिनिधींने तयार केलेला एक परखड वृत्तलेख.**

दिल्ली जवळ जवळ येत चालली, तसं माझ्या तोंडचं पाणी पळालं. अक्षरशः कोरड पडली माझ्या घशाला. दिल्लीचं पाणी खराब असल्याच्या वार्ता दुरून वाचायला, ऐकायला मोठ्या गोड असतात. पार्लमेंटमध्ये देखील या प्रश्नावर केवढी पाणीदार चर्चा होत असते अधूनमधून. आता मीच खुद्द दिल्लीला चाललो होतो नि मनाशी म्हणत होतो, "आता पाणी न पिताच आठदहा दिवस दिल्लीत काढायचे आपण. फक्त चहा कॉफी पिऊन ! हां, निदान उकळलेलं पाणी तरी पोटात जाईल !" विचारांती मला माझ्या या निश्चयातली अशक्यता लक्षात आली नि मी चिंताग्रस्त झालो.

दिल्ली जवळ आली नि राजधानीतलं सुप्रसिद्ध वर्तमानपत्र 'हिंदुस्थान टाइम्स' माझ्या हाती आलं. पहिल्याच पानावरल्या त्या व्यंगचित्रानं दिल्लीकरांची करमणूक झाली असेल, पण माझं मात्र धाबं दणाणलं. दिल्लीचा कुणी मंत्री अथवा नगरपिता कोणत्या तरी समितीपुढं भाषण करताना म्हणत आहे, "घाणेरड्या पाण्याचा जुना प्रश्न आम्ही सोडविला आहेच. आता बिघडलेल्या पाण्याचा नवीन प्रश्न सोडवावयाचा आहे..."

हं ! आहे खरी कंबक्ती नक्कीच.

सहप्रवाशाजवळ आदल्या दिवशीचा त्या पत्राचा अंक होता. सगळा अंक चाळून झाल्यावर सहज म्हणून मी संपादकांना आलेल्या पत्रांचे स्तंभ पाहू लागलो. 'दिल्लीला रामराम' (Farewell to Delhi) या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या एका पत्रानं माझं विशेष लक्ष वेधून घेतलं. के. डी. पॉल नावाचा लेखक या पत्रात काय म्हणतो पाहा :

" मी दिल्लीचा कायमचा निरोप घेत आहे. या राजधानीतला एक नागरिक कमी होईल, पण त्यामुळं कोणालाही चुकल्या चुकल्यासारखं होणार नाही की माझी उणीवही जाणवणार नाही. पण माझ्या या पलायनामागे एक क्रूर कथा आहे.

इथं माझ्या जिवाला धोका आहे. मी पळून जात आहे. कारण माझ्या स्वतःच्या आणि माझ्या लेकरांच्या जीवनाबद्दल मला इथं निर्धास्तपणा वाटत नाही. या शहराला माझी गरज नाही. भ्रष्टाचाराचे भूत माझ्याभोवती इथं थैमान घालत असतं. चढत्या किंमती, वाढती घरभाडी, प्रत्येक जिनसांतली भेसळ आणि आवश्यक असे जीवनोपयोगी जिन्नस मिळण्याची मारामार, यामुळं मी बेजार झालो आहे. प्यायला ताजं दूध नाही, खायला ताजी भाकर नाही, कच्च्याबच्च्याकरता योग्य असं अन्न नाही. वाईट अन्न खाल्ल्यामुळं जिभेला आलेला कडवटपणा घालवावा म्हटलं तर साखर नाही. प्यायला शुद्ध पाणीही नाही !

घाण सांडपाण्यांच्या समुद्रावर हे शहर तरंगत आहे. हातपंपांचं, विहिरीचं, ट्यूबवेल्सचं आणि म्युनिसिपालिटीच्या नळाचं पाणी दूषित असतं. बाटलीतलं (सोडावॉटरचं) पाणीही अशा पाण्याचंच बनविलेलं असतं--बर्फही त्याचंच. माझ्या दुधातही हेच पाणी निम्म्यानं असतं.

म्हणून रामराम ! परमेश्वर आमच्या नगरपित्यांचं रक्षण करो !"

दिल्लीच्या नागरिकांना सध्या शहराविषयी काय वाटतं ते या एका मासल्यावरूनही लक्षात येण्यासारखं आहे. दिल्लीचा धसका खाऊन तिथले नागरिक बाहेर पळायला पाहातात अन् मी चाललो आहे उघड्या डोळ्यांनी त्याच गावाला– आमच्या राजधानीला. "माणूस"–वाचकांना आजच्या दिल्लीचं चक्षुर्वैसत्यं दर्शन घडवायचं आहे ना मला. जाताजाताना एक सूचना मी माझ्या वाचकांना अवश्य देऊन ठेवतो. "दिल्ली तो बहोत दूर है !" ही जुनी पुराणी उक्ती मनाशी जपा नि अगदीच काही जरूरीचं कारण पडल्याशिवाय या शहराच्या वाटेला उगाचच जाऊ नका !

### तंत्री घोरत आहेत !

मी दिल्लीत उतरलो; ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात. अन् गंमत ही की त्यावेळी भारत सरकारचे बहुतेक प्रमुख मंत्री दिल्लीबाहेर होते. पंतप्रधान श्री. लाल बहादूर शास्त्री नि परराष्ट्र-मंत्री



**घाणेरड्या पाण्याचा जुना प्रश्न आम्ही सोडवला आहेच. आता बिघडलेल्या पाण्याचा नवीन प्रश्न सोडवावयाचा आहे.**

**चिनी आक्रमणाला दोन वर्षे झाली. देशात आणीबाणीची परिस्थिती असल्याचे सांगितले जाते. पण प्रत्यक्ष राजधानीत काय चालले आहे? 'आणीबाणी'ची आच दिल्लीच्या राजकारणाला आणि राज्यकारभाराला लागली आहे का?**

श्री. स्वर्णसिंग कैरोच्या अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेकरिता गेलेले. संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण सातारा, महाबळेश्वर, कराड इकडे निघालेले. अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम्, नभोवाणी-माहिती खात्याच्या मंत्री श्रीमती इंदिरा गांधी वगैरे बहुतेक सर्व मंत्री दिल्लीबाहेर. पूर्वी एकटे पंतप्रधान पं. नेहरू दिल्लीत नसले तर तेवढ्या मुळंही दिल्लीला अवकळा येत असे अन् भारतीय राज्यकारभाराची गतीही मंदावत असे. आता तर सारेच बडे मंत्री चोहोकडे विखुरलेले होते. या मंत्र्यांशिवाय दिसणारी दिल्ली म्हणजे खरा भारत! –खऱ्या अर्थानं!

मंत्री जाग्यावर असले तरी तंत्र्यांशिवाय त्यांचंही काही चालत नाही. प्रत्येक खात्याचं दैनंदिन काम पाहायला आय्. सी. एस्., आय्. ए. एस्., इत्यादी दर्जाचे सेक्रेटरी, अंडर सेक्रेटरी असतात. त्यांना उद्देशून मी 'तंत्री' हा शब्द इथं योजिलेला आहे. बहुतेक मंत्री या तंत्र्यांचा सल्ला घेतात, घेणं आवश्यकही असतंच. मंत्र्यांच्या समोर 'यस् सर' करत कार्यक्षमतेचं प्रदर्शन करण्याकरिता टुणटुणू नाचणारे हे आमचे तंत्री मंत्र्यांच्या गैरहजेरीत झोपा तरी काढतात किंवा हुकूमशहा तरी बनतात.

तुम्ही कोणतंहि काम घेऊन एखाद्या खात्याकडे जा, "मंत्री सध्या इथं नाहीत, ते आल्यावर तुम्हाला काय ते कळवू!" हे तुसडेपणाचं उत्तर अगदी ठरलेलं. जसं काही मंत्री जाग्यावर असताना कामांचे निकाल तडकाफडकीच होत असतात!

मला एक उच्चशिक्षित तरुण गृहस्थ भेटला त्याची ही गोष्ट ऐकण्यासारखी वाटेल तुम्हांला.

श्रीमती इंदिरा गांधी यांनी नभोवाणी-माहिती खात्याचं मंत्रिपद स्वीकारल्यानंतर जे एक वक्तव्य केलं त्याचं सार असं होतं: 'माझ्या खात्याकरिता नवनव्या कल्पना सुचवणारी माणसं हवीत! मला कल्पक माणसं हवी!'

त्या तरुणानं इंदिराबाईंना एक पत्र लिहून कळविलं, "तुम्हांला उपयुक्त ठरतील अशा अनेक कल्पना, योजना माझ्याकडे आहेत. आपल्या भेटीची संधी द्याल तर त्या मी तुम्हाला अवश्य सांगेन!"

हा तरुण अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स इ. अनेक देशांत शिक्षण घेऊन आलेला आहे. देशसेवेच्या प्रामाणिक इच्छेमुळं तो परदेशातली मोठ्या पगाराची नोकरी सोडून आला आहे हे विशेष. बोलताबोलता तो मला म्हणाला,

"पण माझ्यासारख्या तरुणांची इथं गरज आहे कुणाला?"

"ते का? सर्व मंत्रीच तर सांगत असतात की-- " मी पुढं बोलणार होतो, पण मला अडवून त्यानं विचारलं,

"मंत्री या घोषणा सभेत करतात. प्रत्यक्ष आम्हाला कधी भेटतात का? भेटले तर शेवटी आम्हाला आपल्या खात्याच्य तंत्र्यांच्या ताब्यात देतात. हे तंत्री गोड भाषेत म्हणतात, 'लवकरच कळवू तुम्हाला!' त्यांचं पत्र कधीच येत नाही. लवकरच त्या जागेवर कुणाची तरी नेमणूकही होते अन् हा कुणीतरी अगदी सामान्य प्रतीचा असतो!"

"बरं मग, इंदिराबाईकडे तुम्ही पाठविलेल्या पत्राचं काय झालं?" मी विचारलं.

"त्यांच्या एका सेक्रेटरीचं उत्तर आलं ना!" तो म्हणाला, "तुमच्या कल्पना लिहून पाठवा, असं कळविलं मला त्या सेक्रेटरीनं!"

"मग लिहून पाठविल्या तुम्ही?"

"मुळीच नाही! मी एकदोन ठिकाणी असले अनुभव घेऊन



**माझ्या खात्याकरिता नवनव्या कल्पना सुचविणारी माणसे हवीत.**

पुरता पोळून निघालो आहे. मी कळविलेल्या कल्पना हा सेक्रेटरी आपल्याच एखाद्या नातेवाईकाला सांगून त्याचीच वर्णी अगोदर लावून देईल-- किंवा स्वत:च्याच त्या कल्पना आहेत अशीही मंत्र्याची समजूत करून देऊन फुशारकी मिरवील-- त्याचा काही नेम सांगता येत नाही ! आमच्या दिल्ली सरकारातल्या कर्मचाऱ्यांत भयंकर भ्रष्टाचार आहे, ही गोष्ट काही खोटी नाही !"

भ्रष्टाकार, भ्रष्टाचार, लाचलुचपत, वशिलेबाजी !

दिल्लीतल्या हवेतच हे शब्द एकजीव होऊन गेलेत जणू ! दिल्लीतलं काम पटकन् व्हायचं नाही, तंत्री तुमच्या कागदपत्राकडे पाहावयाचे नाहीत ... ... ... हो, तुम्ही योग्य माणसाची ओळखचिठीचपाटी वगैरे आणली असेल तर मात्र गोष्ट वेगळी ! नाहीतर तंत्री आराम करतील, झोपा काढतील किंवा गप्पा मारीत बसतील. तुमचा कागद हलायचा नाही ! भारताचा एक नागरिक या नात्यानं भारताच्या राजधानीत तुम्हांला कवडीचीही किंमत नाही. तुम्ही 'कोणाचे कोण' असाल, तुमच्या थैलीत भरपूर माया असेल अन् तुम्ही योग्य त्या 'कॉन्टॅक्ट' मार्फत याल, तर तुम्हाला दिल्लीत किंमत आहे !

ही झाली तंत्र्यांची कथा. ती अगोदर सांगितली, कारण ... ... महादेवाचं दर्शन घ्यायच्या अगोदर नंदीला नमस्कार करावा असा शिरस्ताच आहे मुळी !

### मंत्र्यांना मात्र झोप नाही !

एका परदेशी वकिलातीतील एक बडे अधिकारी माझे स्नेही आहेत. ते मला म्हणाले, " भारतात लोकशाही खऱ्या अर्थानं स्थिर झाली आहे असं आता म्हणजे नेहरू निधनानंतर निश्चितपणानं म्हणता येतं. Democracy has come to stay in India ! पं. नेहरू होते तोपर्यंत परकीयांना पुष्कळदा असं वाटायचं की केवळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वावरच भारतातील लोकशाहीचा डोलारा उभा आहे ... ... पण ते खोटं ठरलं. जगातली सर्वांत मोठी लोकशाही म्हणून आता भारतानं जरूर अभिमान बाळगावा ! "

हे अधिकारी पुढं आणखी जे काही म्हणाले ते तर मला अगदी समर्पक वाटतं. " भारतात आता एक प्रकारानं सामुदायिक नेतृत्व आलेलं आहे. पंतप्रधान शास्त्री, परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंग, अर्थमंत्री कृष्णमाचारी, संरक्षणमंत्री चव्हाण आणि अन्नमंत्री सुब्रह्मण्यम् ही पंचकडी आज फार महत्त्वाची ठरलेली आहे नि भारताचा कठीण राज्यशकट ती कुशलतेनं हाकत आहे यात मुळीच शंका नाही.

दिल्लीतील सर्वसाधारण जनतेलाही असंच वाटतं. या पाच मंत्र्यांना धड झोपही घेता येत नाही, इतकं जोखमीचं आणि प्रचंड कार्य त्यांच्यापुढे सतत उभं असतं.

नेपाळ, ब्रम्हदेश, अफगाणिस्थान आणि सिलोन या चार शेजारी राष्ट्रांचा दौरा करून श्री. स्वर्णसिंग यांनी अलीकडेच जे भरघोस यश मिळविलं त्यामुळं त्यांच्या मुत्सद्देगिरीबद्दल जनतेत आदर निर्माण झाला आहे.

अर्थमंत्री कृष्णमाचारींनी देशाची तिजोरी छान सांभाळली आहे. भारताला मदत देणाऱ्या आणि देऊ इच्छिणाऱ्या देशात भारताची पत त्यांनी आपल्या कार्यकुशलतेनं निश्चितच वाढविली आहे. चौथ्या पंचवार्षिकयोजनेवर एकवीस ते बावीस हजार कोटी रुपये खर्च व्हाव-



Democracy has come to stay in India!

याचे आहेत. एवढी अवाढव्य योजना आपल्या देशाला पेलू शकेल असं कृष्णमाचारींना वाटतं हेही त्यांच्या आत्मविश्वासाचं द्योतक आहे.

श्री. यशवंतराव चव्हाण यांनी परवा रशियातून जी विजयमाला आणली तिच्यामुळं त्यांच्या वैयक्तिक कीर्तीत तर भर पडलीच, पण त्यांच्या संरक्षणखात्याची शक्ती आणि इभ्रतही कमलीची वाढली. रशियाची 'मिग' विमानं आतां लवकरच भारतात तयार केली जावयाची आहेत हे तर झालंच; शिवाय आता रशिया भारताला ४८ स्वनातीत लढाऊ विमानांची तीन पथके देणार आहे. २८ हेलिकॉप्टर्स आणि पुष्कळसे रणगाडेही तो देश आपणाला देणार आहे. एकंदर सत्तर कोटी रु. किंमतीची शस्त्रसामग्री भारताला सवलतीच्या अटीवर रशियाकडून मिळणार आहे. अमेरिका आणि इंग्लंड यांनीही भारताला भरपूर साहाय्य देण्याचं यापूर्वीच मान्य केलं आहे. श्री. चव्हाण यांच्या या कर्तृत्वामुळं पाकिस्तानच्या कानाला झिणझिण्या झोंबत आहेत, यावरूनही त्यांच्या या कामगिरीचं महत्त्व कळेल.

अन्नमंत्री सुब्रह्मण्यम् यांची तर सध्या सत्वपरीक्षा चाललेली आहे. भारताची सध्याची अन्नसमस्या सोडविण्यासाठी ते जिवाचा आटापिटा करत आहेत. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणालाही शंका नाही, पण तरीही या प्रश्नाबाबत त्यांनी कोणतीच भूमिका खंबीरपणानं घेतलेली नाही, ही गोष्ट खटकल्याशिवाय राहात नाही. देशभर सक्तीचं रेशनिंग करावं असं ते म्हणत नाहीत, साराच्या सारा धान्य-व्यापार व्यापाऱ्यांनी करावा असं त्यांना सांगायचं नसतं, किंवा सर्वच धान्यव्यापार ( धान्य-व्यापार करण्याकरता जी सरकारी



But Socialism is far away

कॉर्पोरेशन स्थापण्यात येणार आहे त्या) कॉर्पोरेशननं करावा असाही त्यांचा आग्रह नाही. त्यांचं अन्न–धोरण बरचसं धरसोडीचं वाटतं, त्यामुळं त्यांच्या प्रामाणिक परंतु पद्धतिशून्य धोरणांना यश येईलच असं दिसत नाही. ते स्वत: तर हे मंत्रिपद गळचात पडल्यापासून उत्साहहीन झाल्यासारखे दिसतात.

पंतप्रधान शास्त्री नि परराष्ट्र-मंत्री स्वर्णसिंग कैरो येथील अपक्ष–राष्ट्र–परिषदेवर भारताचा खोल ठसा उमटवतील याबद्दल कोणाला शंका नाही. पण त्यांचं हे यश किंवा सर्वच मंत्रिमंडळाचं यश खुद्द देशात टिकाऊ ठरेल ते एका कसोटीवरच ! आणि ती कसोटी आहे अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्याची !

**धान्यप्रश्न आणि मंत्री**

भारतातल्या तीस ते चाळीस कोटी जनतेला सध्या अर्धपोटी राहावं लागतं ही गोष्ट सत्य आहे आणि या सत्यस्थितीला जगात फार मोठी प्रसिद्धी मिळालेली आहे. देशोदेशीच्या आपल्या वकिलातीकडून ही गोष्ट शास्त्री यांना कळत असेलच. उपाशी प्रजा भूकेची कळ सोसेल पण राज्यकर्त्यांना धन्यवाद देणार नाही. आणि जोपर्यंत देशातील प्रजेला आमचे मंत्री निदान पोटभर अन्न देऊ शकत नाहीत तोपर्यंत त्यांच्या इतर क्षेत्रातल्या पराक्रमाबद्दल त्यांना परदेशातहि कुणी शाबासकी देणार नाही !

चौथ्या पंचवार्षिक योजनांची जाहिरात आता खूप मोठ्या प्रमाणात चालू आहे. ही चौथी योजना कार्यवाहित येण्यापूर्वी भारताचा अन्नधान्य–प्रश्न किंचित तरी जर सैल झाला नाही तर या योजनांना जनता हसेल–भारतातील अन् जगातलीही.

"पहिल्या तीन योजनांनी मग आम्ही साध्य तरी काय केलं ? प्रत्येक योजने पाठोपाठ जनतेच्या पोटाची खळगी खोल खोल होत चालली आहेत. औद्योगीकरण केल्यानं जर पोटाचा प्रश्न सुटत नसेल तर ते हवं कशाला ? यंत्रं खाऊन पोटं भरतात का ?"

दिल्लीतल्या एका नामवंत अर्थशास्त्रज्ञानं मजजवळ काढलेले हे उद्‌गार अर्थपूर्ण नाहीत का ?

"सदाचार, सदाचार म्हणून का ओरडता ? अगोदर आम्हांला पोटाला द्या !" असा एक सूर दिल्लीत ऐकायला मिळतो. आजचे ज्वलंत प्रश्न कोणते हे आमच्या दिल्लीश्वरांनी निश्चितपणानं ओळखलं आहे का ? परकीय शत्रूंपासून देशाचं संरक्षण करणं हा एक प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याच्याइतकाच तातडीचा प्रश्न म्हणजे प्रजेला दोन वेळा तरी जेवू घालण्याचा ! या दोनच प्रश्नांवर आज सारं लक्ष अगोदर केंद्रित व्हायला हवं. तसं दिल्लीत होत आहे का ?

"भारताचा अन्नधान्य प्रश्न आमचं सरकार यशस्वीपणानं सोडवू शकेल का ? 'रोम जळत होतं त्यावेळी नीरो फिड्ल वाजवत होता' –अशी काहीशी परिस्थिती आज राजधानीत झाली आहे का ?

या व अशा अनेक प्रश्नांची उत्तरे पुढील लेखात वाचायला मिळतील.

• • •

# जगाच्या पाठीवर

## □ शेजाऱ्याचं मनुष्यबळ

चीनची लोकसंख्या बहात्तर कोटी आहे आज. भारताची आहे पन्नास कोटी. दरसाल एक कोटीनं वाढणारी भारताची लोकसंख्या कशी घटवावी या चिंतेनं आमची झोप उडून गेली आहे. पन्नास कोटी प्रजेला अर्धपोटी ठेवायचं म्हटलं तरी, " अन्नासाठी दाही दिशा, आम्हा फिरविशी जगदिशा " ही पाळी भारतावर आलेली आहे. तिकडे चीनला मात्र आपल्या प्रचंड लोकसंख्येचा अभिमान वाटतो. बरोबरच आहे !

भारताच्या उत्तर सीमेवरील प्रदेश चीनला बळकावयाचा आहे. सिक्कीम, भूतान, जमल्यास नेपाळ हे देश हळूहळू घशात घालावयाचे आहेत. तिकडे रशियाच्या सरहद्दीवरील कितीतरी मोठा भूभाग चीनच्याच मालकीचा असल्याचा दावा चीननं मांडलाच आहे. मंगोलिया (outer Mongolia) हा देश चीन आणि रशिया या दोन देशांच्या मध्यभागी आहे. पण तो एक स्वतंत्र देश आहे. मंगोलियाला रशियाविषयी आपलेपणा वाटतो. कारण त्याला चीनची भीती वाटते. चीनचं म्हणणं असं की मंगोलियानं चीनमध्ये एकरूप होऊन जावं, म्हणजे भांडणाचं कारण नाही ! चीनच्या नकाशात तसं दाखविण्यात आलंच आहे म्हणा !

चीनला अशारीतीनं चोहोकडे हातपाय पसरायचे आहेत. लष्करी सामर्थ्य वापरून त्याला आपली उद्दिष्टं साध्य करावयाची आहेत. लढाईत मरायला माणसं नकोत ? ती चीनजवळ भरपूर आहेत. चीनला आपल्या प्रचंड मनुष्यबळाचा अभिमान वाटावा हे साहजिक नाही का ?

### चीन–पाकिस्तान " भाई भाई ! "

दुसऱ्याच्या अनुभवावरून माणसानं शहाणपण शिकावं असं म्हणतात; पण असं क्वचितच घडतं. " हिंदी-चिनी भाई भाई " हा जप आम्ही वर्षानुवर्षे केला, त्याचा पश्चात्ताप करायची पाळी आता आमच्यावर आली आहे. पाकिस्तानात मात्र आता चीनविषयीच्या प्रेमाला उधाण आल्यासारखं दिसतं. आता लवकरच रावळपिंडी ते पेकिंग हा रस्ता बांधला जावयाचा आहे. बाराही महिने दळणवळणाला टिकू शकेल इतका भक्कम रस्ता होणार आहे हा ! अगोदर नकाशे छापावयाचे, त्यात भारताच्या उत्तर सीमेवरचा बराचसा मुलूख आपला आहे असं दाखवायचं, नंतर सीमेपर्यंत रस्ते बांधावयाचे त्या रस्त्यावरून युद्धसामग्री आणावयाची आणि मग तो मुलूख घशाखाली घालावयाचा, हे चिनी तंत्र भारताला परिचित आहे. पेकिंग ते रावळपिंडी हा रस्ता जर तयार करण्यात आला तर त्याचा अर्थ किती अनर्थकारक होईल हे जाणायला लष्करी तज्ज्ञांचीच जरूरी नाही. रावळपिंडीहून दिल्ली काही दूर नाही अन् म्हणूनही या होऊ घातलेल्या नव्या रस्त्यावर भारतानं नजर ठेवणं अवश्य आहे

### चीनची पाकला आर्थिक मदत

सहा कोटी डॉलर्सची बिनव्याजी आर्थिक मदत पाकिस्तानला देण्याची तयारी चीननं दर्शविली आहे. सीमेंट, साखर, कापडगिरण्याना लागणारी यंत्रसामुग्री इ. वस्तूंच्या रूपानं चीन ही मदत करू इच्छितो. परतफेडीदाखल कापूस आणि ज्यूट याची निर्यात पाकिस्ताननं चीनला करावी म्हणजे झालं. हा सारा व्यवहार येत्या तीस–चाळीस वर्षांत पुरा झाला तरी हरकत नाही, असंही चीन उदारपणानं म्हणतो. काही अनुभवी पाकिस्तानी व्यापारी खासगी संभाषणात म्हणतात, " बोलाचीच कढी, बोलाचाची भात ! "

●

## □ फ्रांकफुर्टचं पुस्तक-प्रदर्शन

सप्टेंबरमध्ये फ्राकफुर्टला भरलेल्या आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनात यंदा एकूण चाळीस देशातल्या २२७१ पुस्तक-प्रकाशकानी भाग घेतला होता ! या प्रदर्शनानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या कॅटलॉगमध्ये १२९३ पृष्ठे असून त्याचं वजन सात पौंड आहे ! आतापर्यंतच्या पुस्तक-प्रदर्शनाच्या इतिहासात यंदाचं प्रदर्शन सर्वश्रेष्ठ ठरलं ! या प्रदर्शनात भारतानही अल्पस्वल्प प्रमाणात भाग घेतला होता.

सगळ्या जगात वैशिष्टचपूर्ण ठरलेलं हे पुस्तक-प्रदर्शन दरवर्षी फ्राकफुर्ट (प. जर्मनी) इथं भरत असतं. ज्ञानाची देवाण-घेवाण करणारी ती एक आंतरराष्ट्रीय बाजारपेठ असते. सांस्कृतिकदृष्टया तिचं मूल्य अमोलच ठरेल. पण आर्थिकदृष्टया–अगदी मोल मोजून घेण्याच्या दृष्टीनही हे प्रदर्शन लाभदायी ठरतं. हजेरी लावण्याच्या दृष्टीनं भारत अलीकडे या प्रदर्शनात भाग घेत असतो हे खरं, पण ते सारं नाममात्रच असतं. भारतीय लेखकाना जगाच्या बाजारपेठेत पुढं आणण्याची हौस आमच्या प्रकाशकांना आहे कुठं ? आर. के. नारायण किंवा मनोहर माळगावकरासारखे भारतीय लेखक जगात आज नावलौकिक कमावून राहिले आहेत, पण त्याना प्रकाशात आणलं ते परकीय प्रकाशकानी !

एखाद्या उत्कृष्ट मराठी कादंबरीला जगाची बाजारपेठ मिळविता येणार नाही का ? नक्की येईल. पण तसं का होत नाही ? कारण उघड आहे. त्या कादंबरीचं सरस भाषांतर निदान इंग्रजीत तरी अगोदर व्हायला हवं. असं भाषांतर करू इच्छिणाऱ्या लेखकानं त्या कामावर वर्ष-सहा महिने खर्चिले पाहिजेत. अशा प्रकारच्या कामाला निदान पाच-सात हजार रुपये हा भाषांतरकर्ता मागणारच. मूळ लेखकालाच पाचसहाशे रुपयांत गुंडाळून घेणारे बहुसंख्य प्रकाशक केवळ भाषांतराकरिता एवढी मोठी रक्कम खर्चण्याचं धाडस करतील तरी कसं ?

सुदैवानं आज महाराष्ट्रातही काही सधन व साहसी प्रकाशक आहेत. अशा उपक्रमाकडे ते शक्य तितक्या लवकर वळतील तर ते



**त्र्यं. न. कुलकर्णी**

लेखकाचंच नव्हे तर स्वतःचं नि देशाचंही केवढं तरी आर्थिक कल्याण साधू शकतील.

## ❑ सैबेरियाचे नंदनवन

" स्टालिनच्या वेळचा रशिया आता विसरा ! क्रुश्चेवच्या रशियात तुम्हाला भरपूर भ्रमणस्वातंत्र्य आहे. तुम्ही कोणत्याही भागात प्रवास करू शकता, कोणाशीही बोलू शकता ! " डॉ. राधाकृष्णन् यांच्याबरोबर परवा रशियाला जाऊन आलेल्या एका उच्चपदस्थ गृहस्थांनी मला सांगितलं. सायबेरिया म्हणजे यमयातना असं समीकरणच झालं होतं. स्टालिनच्या कारकीर्दीत त्यांच्याविरुद्ध ब्र काढणाऱ्या लोकांना सायबेरियात डांबलं जाई नि वेठीला लावून त्याचं मरण लवकर ओढवेल अशी तजवीज केली जाई !

आज सायबेरियाचं नंदनवन घडविलं जात आहे. जलविद्युत-योजना, प्रचंड कारखाने आणि इतर औद्योगिक योजना यांचं एक जाळंच निर्माण केलं जात आहे तिथं. सायबेरियाच्या काही भागावरही चीनची लोभी दृष्टी खिळली असल्यानं या प्रांताच्या भरभराटीकडे लक्ष पुरविणं क्रुश्चेवला आवश्यक वाटलं असावं. सायबेरियातल्या प्रजेला आता भरपूर स्वातंत्र्य आहे. त्यांचं जीवनमान खूपच उंचावलं आहे. आर्थिक उत्कर्षाची प्रसादचिन्हंही तिच्या उंबरठ्यावर उमटली आहेत ! या भागात स्टालिन अतिशय अप्रिय होता. त्याउलट तिथली जनता आता क्रुश्चेवला धन्यवाद देत असते !

दिल्ली-मॉस्को विमानप्रवास आता एअर इंडिया इंटरनॅशनलनं अगदी सुलभ करून ठेवलेला आहे. रशियाला " टूरिस्ट " म्हणून जाणं ही गोष्ट आता पूर्वीसारखी कठीण राहिलेलेली नाही. धनवान भारतीय टूरिस्टनी आता नेहमीप्रमाणं केवळ युरोप-अमेरिकेची वारी करायच्या ऐवजी रशियाकडेही लक्ष वळवायला काही हरकत नसावी.

●

## ❑ मोटारगाड्यांच्या जाचातून मुक्ती ?

भारतात मोटारगाड्यांची फार मोठी उणीव आहे, म्हणून आम्ही तक्रार करतो, तर तिकडे युरोप-अमेरिकेत ओरड चालली आहे, " या आधुनिक राक्षसाच्या जबड्यातून आम्हाला वाचवा हो वाचवा ! " न्यूयॉर्कमध्ये मोटरीनं प्रवेश करणं अशक्य झालं आहे. गाडी सोडायला जागा तर हवी. बाहेरून येणारे लोक शहराबाहेरच गाड्या सोडतात नि टॅक्सीनं किंवा बसनं गावात येतात !

इंग्लंडमध्ये लंडनसारख्या मोठ्या शहरातही गाडी सोडण्याच्या जागेचा–पार्किंगचा–प्रश्न मोठा बिकट झाला आहे. ब्रिटनची लोकसंख्या पाच कोटी अन् तिथल्या मोटरगाड्या किती म्हणाल तर जवळजवळ सव्वा कोटी ! चार माणसांमागे एक गाडी. प्रत्येक कर्त्यासवर्त्या नागरिकाची स्वतःची मोटर असते तिकडे, हाच या आकड्यांचा अर्थ. सध्याच्या वेगानं ही मोटर–हौस वाढत राहिली तर १९८० मध्ये इंग्लंडात तीन कोटी गाड्या रस्ते अडवतील असा अंदाज तज्ज्ञांनी प्रसिद्ध केला आहे.

ब्रिटिश सरकारनं अलीकडेच एका वाहतूक–तज्ज्ञांची नेमणूक केली होती, या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करण्याकरता. ' To workout proposals to save Britain from the tyranny of the Motorcar. " म्हणजेच मोटारगाड्यांच्या ' जुलुमा ' पासून इंग्लंडचं संरक्षण कसं करता येईल याबद्दलच्या योजना सुचविण्याकरता !

एकेकाळी प्रत्येकाला हवीहवीशी वाटणारी ' गाडी ' आता इंग्लंडमध्ये एक मोठी पीडा ठरू लागली आहे, तर सरकारनं नेमलेल्या समितीनं एका लंडनपुरते जे आकडे प्रसिद्ध केले आहेत तेही खचित उद्बोधक आहेत.

प्रत्येक दिवशी सकाळी कमीतकमी एक लाख मोटारी बाहेरून लंडन शहरात येतात व सायंकाळी त्या परत जातात ! प्रत्येक मोटारीतून एकच माणूस कामासाठी शहरात येतो नि जातो. त्याला स्वतःला कामासाठी बसायला जागा हवीच, ती असते. पण इकडे स्वतःचं काम करत असताना आठ तासपर्यंत त्याची मोटरगाडी गावातली कितीतरी मोठी जागा अडवून बसते ! बाहेरून येणाऱ्या या लाख गाड्यांच्या भरीला खुद्द गावातल्या हजारो गाड्या असतातच. या गाड्यांची हालचाल हे तर सकाळसंध्याकाळचं एक विलक्षण दिव्य !

पार्किंगचा प्रश्न सोडविण्याकरता अनेक उपाय इंग्लंडमध्ये चालू आहेत, पण यश काही अजून दृष्टिपथात नाही.

**मोटारीखाली मरा !**

मोटारी जितक्या अधिक तितके त्यांचे अपघात मोठ्या प्रमाणावर, हे ओघानं आलंच. प. जर्मनीची ही आकडेवारी वाचा. प. जर्मनीत दररोज सरासरी चाळीस माणसं मोटारींच्या अपघातात राम म्हणतात ! गेल्या दहा वर्षांत जवळजवळ चाळीस लाख लोक मोटर–अपघातांमुळे निकामी झाले आहेत, ते वेगळेच. कुणाचे हात-पाय तुटले, कुणाचे डोळे गेले, कुणाची डोकी फुटली ! जर्मनीत कामाला माणसं अगोदरच कमी, त्यात दररोज दोन माणसं मरणार नि पाचपन्नास लुळीपांगळी होणार. जर्मन तज्ज्ञ प्रत्येक घटनेचा विचार अर्थ आणि शास्त्र या दोन्हींच्या कसोटचा लावून करतात. त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की या मोटार अपघातामुळं कमी होणाऱ्या मनुष्यबळापायी देशाचं दरसाल तीनशे ते चारशे कोटी मार्क्सचं (साधारणतः तितक्याच रुपयांचं) नुकसान होतं !

भारतात मोटारीची इतकी गर्दी नाही हा शाप मानावा की वर ?

● ● ●

# पहारा

ब. मो. पुरंदरे

ऐन मध्यरात्र. टिपूर चांदणं पडलं होतं. वारं मळाळत होतं. मी गडावर पोहोचलो. सर दरवाजा उघडाच होता. मोठा थोरला दगडी उंबरा ओलांडून मी बालेकिल्ल्यात प्रवेशलो. सारा गड सुन्न होता. मी आणि माझी सावली, याशिवाय त्या प्रचंड पुरंदर-गडावर कोणीहि नव्हतं. सर दरवाजाकडून राजगादीकडे मी चाललो होतो. इतक्यात—

" थांबा तथंच ! "

कडाडून दरडावणी उठली ! घुमली ! प्रतिध्वनी उमटला. मी विलक्षण दचकलो. तटाला माझी पाठ न कळत भिडली. मी एकदम वळून आवाजाच्या रोखाने बुरुजाकडे वर पाहिले. एक धिप्पाड काळी आकृती माझ्याकडे बोट करीत उभी होती. माझी छाती न कळत वाढत्या वेगाने धडधडत होती. पापणीही न लवविता मी त्या आकृतीकडे बघत होतो. माझ्यापासून पन्नास-साठ पावलं दूर आणि उंच बुरुजावर ती आकृती होती. एक क्षण गेला, दोन क्षण गेले, तीन क्षण गेले अन् ती आकृती एकदम हसू लागली. ते हसणं घुमू लागलं. ती आकृती बुरुजाच्या पायऱ्या उतरत खाली येऊ लागली. मला घाम फुटत होता अन् त्या आकृतीने हसत हसत मुजरा केला. मी मांबावलो. तेवढ्यात ती आकृती मोठ्याने बोलली,

" जोहार सरकार ! जोहार जोहार ! "

माझा जीव भांड्यात पडला. तो आमचा राजबा होता ! म्हाताऱ्याने माझी चांगलीच गम्मत केली. मी घाम पुसत पुसत पाऊलभर पुढं झालो. राजबा पुढं येत हसून म्हणाला,

" सरकार, राग तर न्हाई आला ?"

मी हसत हसत मानेनं नाही म्हणत 'च्यॅक्' केलं. राजबा पायऱ्या उतरून खाली येत होता. वहाणा, तांबडी झाक मारणारं जाड-भरडं धोतर, अंगात कुडतं, खांद्यावर कांबळ, डोक्याला मुंडासं, हातात काठी अन् डाव्या मनगटात चांदीचं कडं हा नेहमीचाच त्याचा वेष होता. मध्यरात्रीची वेळ अन् हा म्हातारा ह्यावेळी इथं !

पण आश्चर्य कसलं त्यात ? उन्हा-पावसाचं अन् अंधाराचं भय राजबाला नाही. कधी भर वैशाखी उन्हात, तर कधी आषाढी अवसेच्या काळोखात, तर कधी हस्ताच्या मुसळधार पावसातहि तो गडाच्या तटाबुरु-जावरून हिंडताना दिसेल. मी त्याला ह्या तीनहि प्रकारच्या वेळी गडावर पाहिलंय. अगदी तो वेडा आहे ! पण त्याला वेडा कसं म्हणू ? कारण माझी त्याची तिथे गाठ पडतेच ना ?

राजबाचं घर गडाखालच्या वाडीतच आहे. शेतीवाडीचं कामधाम नसलं की राजबा गडावरच सापडायचा.

तरी पण मी म्हटलंच त्याला, " नाईक ! तुम्ही इथं ? यावेळी ?"

राजबाला नाईक म्हटलं कीं, फार बरं वाटतं.

" हा सरकार ! आलो सहजी. म्हनलं नदर टाकावी बालेकिल्ल्यावरून. गेल्या चार दिसात येनं झालं न्हाई !"

चार दिवसांत गडावर येणं झालं नाही तर राजबाला चुटपूट लागते ! मला आता राजबाचं सारं तन–मन–धन माहीत झालं आहे. मी उगीचंच डिवचण्याकरिता त्याला म्हटलं, " पण काय आहे नाईक आता ह्या दगडाधोंड्यात ? शिवाजी महाराज गेले आणि त्यांचं रामराज्यहि गेलं !

मी एवढं म्हणायचा अवकाश, राजबा असा आवेशानं उफाळला, जणू सुरुंगालाच मी वत्ती दिली होती.

" म्हंजी ? काय काय बोलतायसा सर-कार तुम्ही ? तुम्हास्नी ठाव न्हाई ? ह्या, ह्या सर दरवाजावरचा भगवा झेंडा माझ्या बापजाद्यांनी जिवाचं मोल देऊन संभाळ-लाया ! आन् हिथं हिथं—"

असं म्हणत म्हणत राजबा तावातावानं दरवाजाच्या उंबऱ्यापाशी गेला आणि हातानं दाखवीत म्हणाला,

" हिथं मुडदं पडलं त्यांच लढता लढता. महाराज गडावर आलं की पहिला जोहार आम्ही करीत होतो म्हाराजान्ला ! म्हाराजां-च्या वंजळीतली मानसं आम्ही! गडाला इसरू? गेलं आसल राज्य म्हाराजाचं ! पर आमच्या हिदयांत म्हाराजंच राज्य करत्यात ! "

पण राजबानं माझं ते लटकं बोलणं तेव्हाच ओळखलं, त्यानं मिशातल्या मिशात हळूच हसून लगेच मला म्हटलं.

" अन् सरकार ! तुम्ही तरी का म्हनून वो उन्हाताऱ्हाचं न् पावसापाण्याचंबी गडावर येता ? "

मी आता काय उत्तर देणार ? राजबानं माझं काळीजच पकडलं. मी नापास झालो ! उत्तरच नाही ! क्षणभर तटाच्या भिंतींना टेकून मी मुकाच राहलो अन् मग म्हटलं, " काय सांगू नाईक ? तुम्ही अन् मी——"

" सारखंच ! तुम्ही अन् मी म्हाराजांचीच मानसं. खरं ना ? " राजबानं चटकन म्हटलं आणि मग आम्ही दोघेहि मनापासून मनसोक्त हसलो. आम्ही महाराजांची माणसं ! महाराजांच्या ओंजळीतली !

मी पुढे चलत चलत म्हटलं,

" रायगडावर खडे पसरले शिवरायाच्या पायी ।

तीच आम्हाला माणिक मोती दुसरी दौलत नाही ।। "

माझ्याबरोबर चालत राजबानं मान डोलावली, " अशी खरं ! अशी खरं ! "

राजबा आता फार थकलाय. त्याचं वय सत्तरीला टेकलंय. केस पांढरेशुभ्र झालेत. दातांनीहि राजीनामा दिलाय. त्याच्या त्या काळ्याभोर चेहऱ्यावर सुरकुत्यांची दाटी झाली.

" आन् इकल्या रातीचं तुम्ही गडावर येनं केलं ? काय वेतावर येनं केलं ? " राजबानं चालता चालता पुसलं.

" हं ! लिहायचं होतं काही, म्हणून—"

" लिव्हा. लिव्हा. वाचू द्या समद्यास्नी आपल्या गडाची कीर्त."

आम्ही दोघंहि चालत होतो. आमच्या दोघांच्याहि सावल्या डाव्या बाजूने जमिनी-वरून लोळण घेत घेत आमच्याबरोबर पुढे पुढे सरकत होत्या. चालताना आमचं एक-मेकांना अंगाला अंग लागणार नाही याची खबरदारी राजबा घेत होता. तो नेहमीच घेतो. कारण ? सांगूच का ? —राजबा जातीनं महार आहे ! समजा मला तो शिवला, तर मला त्याचा राग का येणार आहे ? पण तो मला कधी शिवणार नाही. आणि मी त्याला शिवलो तर ते त्याला आवडणार नाही ! राजबा अजून जुनाच आहे. त्यामुळं राजबाच्या धाकानं मला सोवळं ओवळं फार सांभाळावं लागतं

" वरं का सरकार ! औंदाच्या पाऊस-काळ्यात पखालीगत धार आभाळातून वरसत व्हती; पर गडाच्या तटाचा एक दगडबी निखळला न्हाई — आली राजगादी ! "

राजगादी आली. राजबानं पायताणं काढली. मीही. मी मुजरा केला. एका जोत्या-वर दगडाधोंड्यांचा ढीग पडला होता. गवत अन् कार्वीचं रान त्यावर माजलं होतं तिथं. हीच ती राजगादी ! इथं आमचे छत्रपती शिवाजी महाराज बसत असत ! आजची तिची ही तऱ्हा आहे. इमारत पडून गेलीय. आता साप राहतात इथं. राजबानं मुजरा घातला. राजगादीपाशी आलो की नेहमी आम्हा दोघांना काही तरी बोलायचं असतं, पण नुसतेच आम्ही एकमेकांकडे बघतो अन् न बोलताच पुढं जातो. काय बोलायचं ?

आम्ही तिथून पुढं आलो. आता अगदी नाकासमोर थेट लांब तिकडे पश्चिम टोकाला असलेलं केदारेश्वराचं देऊळ दिसू लागलं.



तीनशे वर्षांपूर्वी अधिक काळ गड उभा आहे. बुरुजाचे चिरे... सुटे झाले होते, परंतु ढासळलेले नव्हते. राजबाचे हे धन होते. ........विद्यार्थी सहल आली. एक एक चिरा ढकलला जाऊ लागला. राजबा कळकळून म्हणाला— " असं नका करू राजानू....! " ते फिदीफिदी हसले आणि....

निळ्या मखमलीवर काळ्या रेशमात कशीदा काढावा तसं ते केदारेश्वराचं दगडी देऊळ निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर खुलतं होतं.

"पर सरकार ! एक मोठ्ठ खराब घडल औंदा ! "

"काय नाईक ? " मी काळजीच्या कुतूहलानं मान वळवून विचारल.

"आपल्या केदारेसराम्होरली दीपमाळ पावसानं कोसळली. " राजबाच बोट केदारेश्वराकडे रोखलं गेल होतं.

"अर्रर्रर्र ! खरच की दिसत नाही दीपमाळ ! "

"कोसळली. पार कोसळली. आता कार्तिकी पुनवेला म्या पनती कुठ लावावी ? "

राजबा गडाची एकेक दु:खं सागत होता. जणू काही मी पुरंदरचा किल्लेदारच आहे, अशा समजुतीनं तो गडाची सारी गाऱ्हाणी माझ्यापुढं गात होता.

"महाराजाच्या साऱ्या गडकिल्ल्यांचीच मसणवट झालीय, तेथं एका पुरंदराचंच काय ? "

"लई काळीज हळाळतं ! लई लई ! का करावं ? मोप पैका हवा हुता माझ्यापाशी, म्हंजी म्हाराजांची पडलेली राजगादी म्या बाधली असती शिमिटात ! पर का कराव ? आमचं इठुबा पैका घेऊन दामाजीपंतासाठी बेदरच्या बाच्छावाकड गेल्याती; ते रसिदा घेऊनशानी कवा माघारी येत्याल तवा व्हायाचं आमच काम !"–आणि राजबा कससंच हसला.

राजबाची सारी कळकळ अशीच. ह्या राजबाचं घराणं फार जुनं आहे. मोठं इभ्रतीचं खानदान आहे त्याच. तुम्ही म्हणाल, जातीचा महार अन् त्याचं खानदान हो कशाचं, कपाळाचं ? पण तुम्हांला ठाऊक नाही. शिवाजी महाराजांच्या वेळेपासून, पेशवाई बुडेपर्यंत पुरदरच्या ह्या सर दरवाजावरचा झेंडा सांभाळण्याच काम राजबाच्या घराण्याकडं होतं. मुरारबाजी देशपांड्याचे बरोबरच त्याचे पूर्वज प्राण अर्पून गेलेत त्यासाठी. सर दरवाजातून आत येताना राजबा मुजरा घालीत घालीत आत येतो तो त्याच्या पूर्वजासाठी. आम्ही पुरदरे मंडळी पुरंदरच्या माचीवर येण्याआधी, दोनशे वर्षापासून, त्याचं घराणं गडावर नादतंय. खुद्द शिवाजी महाराजहि ह्या महारांना फार मान देत होते. 'नाईक' म्हणून मोठ्या भारदस्त शब्दात त्याना सारेच जण मान देत होते. 'नाईक' म्हणून संबोधलं की राजबाच काळीज पेढेबर्फीन भरलेल्या ताटागत आनदानं भारावत त्याच कारण हे आहे.

मी आणि राजबा गडाच्या शेंदरी बुरुजावर आलो. हा बुरुज मोठा बुलद आहे. इथून गडाची अजस्र तटबदी अन् अफाट पसारा चौफेर दिसतो. मी गडाच ते शिवशाही वैभव न्याहाळीत होतो. आहे सारं पडकं, मोडकंच, पण तीच आम्हाला माणिकमोती !

'पगा पगा येकदा ही आमच्या म्हाराजांची दौलत ! हाये का दिल्लीला असं ?" राजबान गडाच्या चौअंगाला हात फिरवीत मलाच विचारलं.

पुरदरावर गेलो की मला राजबाच्याच तोडून तिथला इतिहास ऐकायची भूक लागते. तो राजबाच्याच तोंडून ऐकावा आणि मग हा शेंदऱ्या बुरुज कसा बाधला हे तोच सागेल.

शिवाजी राजे अठरा वर्षांचे असताना, विजापूरचा सरदार फत्तेखान गडावर कसा चालून आला अन् वरून मावळ्यानी घोडे ढकलून त्याच्या फौजेचा कसा चेदामेंदा केला हे तुम्ही राजबाच्याच तोंडून ऐकायला हवं.

शिवाजी महाराजांची राणी सईबाई, पुरंदरावर १४ मे १६५७ रोजी बाळंत झाली. सभाजीराजांच्या जन्मजातकाच्या सोहळ्याच वर्णन राजबा अगदी जाईजुईसारख्या नाजूक शब्दानी करतो. तो ते बारशाचं वर्णन करू लागला की असा भास होतो की राजबाची रसवती, भरजरी शालू पैठणी नसून राणीसाहेबासाठी बाळंतविडाच घेऊन निघाली आहे.

शाळकरी पोरं गड पाहायला पुरंदरवर येतात. पोरं राजबाला गडाची माहिती विचारतात. राजबा कधी कटाळा करीत नाही. मोठ्या हौसेनं हा म्हातारा पोराचा घोळका घेऊन, "या पोरानो, दावतो तुमास्नी समद !" असं म्हणून सगळा गड हिंडतो. मोठ्या मायेनं सगळं सागतो. अन् मग त्याचे ते कथन ऐकून भारावलेली पोरहि गड उतरताना 'आपले इतिहासाचे 'सर' अगदीच कसे बुवा हे आहेत ! ' काहीतरीच इतिहास शिकवतात, याबद्दल एकमेकांत कुजबूज करताना आढळतात.

बुरुजावरच्या तोफेला टेकून मी उभा होतो. राजबाचं बोलणं मी कानानी वेचीत होतो. मी एकदम मध्येच म्हटलं,

"नाईक, तुमच बोलणं सारखं ऐकतच राहावसं वाटत ! खरच नाईक–"

मी बोलता बोलता थबकलो.

"जी धनी ! "

"नाईक, तुम्ही आम्हांला हे सागता ना, ते सार एकदा लिहून काढा म्हणतोय मी !"

अन् मग राजबा खूपच मोठ्यानं हसला व हसतच राहिला.

"म्हंजी चागलं ! आता म्हातारपणी गळयात पाटी घालून साळंतच लिवण शिकाया जाऊ म्हणा की !"

खरंच, राजबा फार उशिरा जन्माला आला. त्याने तीनशे वर्षांपूर्वी जन्मायला हवं होतं.

मागं एकदा कॉलेजवाली मडळी गडावर आली. घोटयाच्यावर वीतभर पॅंटा फोल्ड करून नाचत बागडत होती. होते सात–आठजणच. ही मंडळी बालेकिल्ल्यावर आली अन् कदकड्यावरून तटाचा एकेक चिरा त्यानी खाली लोटायला सुरुवात केली. करमणूक ! एकेक चिरा लोटावा अन् हसावं, ओरडावं. चालला होता खेळ. राजगादीवरून राजबानं हे पाहिलं.

"आं ? अरं का बाबांनू गडाचं दगड लोटाताया ? आपल्या म्हाराजाची आठवण म्हणून न्हाऊ द्या ! " राजबानं हात जोडून म्हटल.

पण मंडळी सुशिक्षित होती, त्याना हे पटेना.

"नगा नगा अस करू ! आपल्या शिवाजीराजाचा गड हाये हा !"

पण त्यानी राजबाचीच टिंगल आरभिली. तरीही राजबा लोण्याहून मऊच राहिला.

'या, या! म्हातारबाबा, तुमचा पण 'मोरया' करतो ! '

एका चिरजीवानी सिगारेटचा झुरका सोडीत म्हटल.

"टाका ! मला टाका खाली; पर गडाचं धोड लोटू नगा राजानू !".

अगदी आर्जवी शब्दात राजबा विनवीत होता. मंडळी हसतच होती अन् मग काय

विचारता ! राजबाचा अवतार पालटला ! बुद्धाचा नरसिंह झाला. त्याचे डोळे मोठे झाले रागारागाने जमिनीकडे पाहत पाहत राजबाने आंब्याएवढा दगड उचलला !

" गाडविच्च्यांनू ! × × × × × " खणखणीत फाल्गुनी शिवी हासडून त्याने ताडकन् दगड हाणला.

" अग्ग्ग्ग् मेलो ऽ ! मेलो ऽ ! " ज्याच्या गुडघ्यावर तो गोटा बसला होता, तो, तो गुडघा दोन्ही हातांनी पोटापाशी पकडून एका पायावर कोंबडयासारखा नाचतच राहिला.

बाकीच्या मंडळींची गडबड उडाली. " म्हातारेबाबा, प–प–प – पाटील ऽ ऽ ! " त्यातले एक एक बहाद्दूर काही बोलणार, तेवढयात राजबाने हातातली काठी तडाखा मारण्यासाठी वर उचलली. एक दोघांचा पार्श्वभाग त्याने निसटता सडकला. दाणादाण उडाली. पोरं ओरडत बोंबलत पळत सुटली. पहाडी आवाजात राजबाच्या तोंडाचा पट्टा चालूच होता. एकेक दगड उचलून तो त्यांच्यावर भिरकावीत होता. सारे पुढे पळत होते. राजबा मागोमाग पाठलाग करीत होता. ती पोरं बालेकिल्ल्यावरून पार खाली पळत होती. बूट, सँडल्स्, चपला घसरत होत्या. पडत होते. उतार फार होता. वेग आवरत नव्हता. एकमेकांना मिठ्या मारल्यामुळेहि काहीजण गडगडत गेले.

राजबा दरवाजापासून माघारी फिरला. पाहातो तो त्या माणसांचे फराळाचे डबे आणि इतर थोडं फार सामान तिथंच तटावर पडलेलं. ते पळाले. सामान राहिलं. राजबाला पेच पडला, आता हे सामान कुणी सांभाळायचं ? आणि ही पळालेली माणसं खातील काय ? हीही काळजी राजबालाच.

राजबा लगेच बालेकिल्ल्यावरून त्या मंडळींच्याकडे निघाला. गडाच्या उतारावर एका झाडाखाली जखमी झालेली ही फौज हाशहुश करीत अन् एकमेकांना किती लागलं याचा अहवाल विचारीत बसली होती. एक दोघे तर उताणे पडले होते.

राजबा झपाझपा गडावरून खाली त्यांच्या रोखानं येत होता. उतार असल्यामुळे स्वाभाविकच त्याच्या चालण्याला पळण्यासारखी थोडी गती होती. राजबा त्या मंडळींपासून सुमारे दोन फर्लांगावर आला– अन् त्यातल्या एकानं त्याला पाहिलं. त्यानं किंकाळी मारली, "अरे आला तो परत ! सारे धडपडत धावत सुटले.

" आर पळू नगा बावांनू, म्या मारीत न्हाई ! तुमचं भाकरीचं डब्ब– ! " राजबा ओरडू ओरडू सांगत होता. पण कोण ऐकतो? त्यांनी पायथा गाठला. गड पाहिलाच नाही. पायथ्याच्या भडभुंजाकडून चुरमुरे घेऊन खात मोटारीनं मंडळी निघून गेली.

आम्ही बोलत बोलत केदारेश्वरापाशी आलो. गारवा फारच झोंबत होता. मी देवळाच्या भिंतीला टेकून बसलो. सारा गड दुधाळ चांदण्यात न्हाताना दिसत होता. राजबाने भराभरा भवतीच्या काटक्याकुटक्या जमवल्या.माझ्यापुढे आणल्या. चकमक झाडली अन् शेकोटी पेटवली. त्या केशरी उजेडात राजबाच्या चेहऱ्यावरचं हास्य वेगळंच होतं.

राजबा हा असा आहे ! गडाचा पहारा करतो आहे.

ते त्या मंडळींचं सामान अजून राजबाच्या घरी पडलं आहे. डब्यांच्या शिवाय, टॉवेल, दोन फेल्ट हॅट्स, एक थर्मास, एक वॉटर बॅग, एक फ्ल्यूट, एक आरसा, कंगवे आणि तोंडाला लावायच्या पावडरची एक डबी आहे. ज्यांची ही मालमत्ता असेल त्यांनी घेऊन जावी ! ● ●


कॅल्शियमयुक्त

**बिटको**

**ग्राइप**

नेहमी दिल्याने

लहान मुले सशक्त बांधेसूद

व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

**बिटको**

**काळी टूथ पावडर**

नेहमी वापरल्याने

दात मोत्यासारखे स्वच्छ

व चकचकीत होतात.

**बिटको केमिकल इंडस्ट्रीज, नाशिक रोड.**

## सांग जासुदा एवढं

जात्या येतेल्या जासुदा
द्यावा सांगावा आईला
पानपोत सोनीयाची
करीन म्हणते मजला.

लहेंदीची हौसमौज
मनी भारीच वाटली
बिल्वरांत कंगणीच्या
जशी नटून उठली.

कारल्याची वज्रटीक
करीन करीन म्हणाले
नाही कधीच जमले
जे मी मनात बोलले.

दंड भरावा वाकीनं
गळा सजावा ठुशीनं
बेत तुझ्या मनातला
नाही मानला लेकीनं.

सूनबाळं साजयीणी
यदा यायची घराला
तिच्या माझ्या हौसेतला
बेत आधीच मी केला.

यंदा पिकला ऊसमळा
नाही तोटा ग कशाला
म्हणून सांगते तुजला
नको आंदण पानमळा.

थांब जासूदा जासूदा
रेघ धाडीते मातेला
येग संसार बघाया
तुझ्या लेकीचा भरला.

ह्याला सांगून ठेवीलं
आई येतेल्या वेळेला
असा मोकळचा मनानं
राग टाकून उतावळा.

पोराबाळांना बोलले
आज्जी यायची घराला
घ्यावं गाठोडे आणीलं
पुडा सोडीत थाकला.

आहे मुखी मी घरात
सांग जासूदा आईला
म्हणून घेऊनी जा तू
संग बुत्तीच्या खुणेला.

शेत शेलक्या वारूला
जाशी दौडत गावाला
सांग जासूदा एवढं
माय माझ्या मालणीला.

—सरोजिनी बाबर

## ' मज कळले नाही '

मी लाट भरतीची होउनिया खळखळले
तुज भेटायाला उरोउरी रे फुटले
मज ठाउक नव्हते–तू तर एक किनारा–
गेलास दूर मी जो, जो जवळी आले ।। १ ।।

मी व्यथा होउनी मीरेची गद्‌गदले
प्राशून वीष अन् उभी उभी रे जळले
मज कळले नाही–सूर–स्वप्न तू एक
त्या घननीळाच्या बासरीस स्फुरलेले ।। २ ।।

मज माहित नव्हते–तू क्षितिजाची रेषा
लागेल ठाव ना तुझा जरी मी सरले ।। ३ ।।

—सौ. सुनेत्रा ओक

## गोड तुझ्या चाहुलीने

गोड तुझ्या चाहुलीने, जाई-जुई बहरली ।
अस्फुटशा ओठांतून हिरे मोती ओघळली ।। १ ।।
प्रीत गंध काठोकाठ रंध्र उफाळून फुटे ।
दशदिशा सुवासाला, इवलीशी थिटी होते ।। २ ।।
अवखळ चाल तुझी, मेंदी ठसे उठवीत ।
रंगरोग मात्र पूरा, रोम रोम तुडुंबते ।। ३ ।।
निळ्या नेत्र सरोवरी, लवलवे सोन-मासा ।
पापणीच्या जाळ्यामध्ये, गवसावा सांग कसा ? ।। ४
गूढ तुझ्या किमयेचा, अर्थ मना उकलेना ।
मिटलेल्या नयनात, लपविती भावनांना ।। ५ ।।
कल्पनेची ही ग मिठी, शांतवेल सांग कशी ।
मृगजळी आभासाने, मात्र होय कासाविशी ।। ६ ।।

—सौ. इंदिरा कुलकर्णी

## अनोख्या वाटेवर

अनोळखी वाटेवर होते मी हरवलेले
कळीचा उंबरठा सोडून स्वैरतेने होते फुलले
पायरवी नव्हती धरती, वर नव्हते आकाश
स्मरत होते फक्त मी माझे, अधीरे श्वास निश्वास
शंख शिंपल्याची वाट होती मला शोधत
वाळूवरचे बालविश्व होते मला खुणवत
सरलेल्या ह्या वाटेवरून पाय निसटले होते
यौवनाच्या डोहात मी बुडालेले होते...

—सुधा कुलकर्णी

## विसावा

तुझ्या दारी कधी
येता विसाव्यास
देशील का घास
अंतरीचा.
तुझ्या अंगणात
शेवटली झेप
नको पुन्हा खेप
अतृप्तीची.
तुझ्या मंदीरात
जळो माझे दुःख
हेचि आता सुख
उरलेले.
तुझ्या मानसात
किती आले गेले
राहो त्यांत ओले
भाव माझे.


## संपवावा जन्म माझा

मी जळावे मी जळावे
समईच्या स्नेहामध्ये
होऊन तेजाळ ज्योत
पोत तम स्वतःमध्ये.

मी जळावे मी जळावे
उदबत्ती सुगंधात
उधळून गंध द्यावा
स्वतःचीच राख होत.

मी जळावे मी जळावे
तुझ्या अभंग भक्तीत
संपवावा जन्म माझा
तुज जीवन वहात

—सौ. सुधा ओक



## पाण्या तुझे रडणे

पाण्या तुझे रडणे ऐकले रे,
सायंकाली.
दाटलेली आमराई काजळली
ठायी ठायी.
भरून आला आकाशाचा ऊर
माजले काहूर.
पाण्याच्या मनात उमटे सारे
आकाशाचे दुःख.
पापण्यांच्या कडा कडा बुडाल्या
अंधारी.
पाण्या, पाण्या...तुझ्या काठी
कोण हे रडते ?
तुझ्यासाठी कोण झुरते झुरते,
काळोखाची सावली !
झोंबणारे पाणी मात्र तासन् तास
रडते एकटे.
लोळलोळत जाती पाण्याचे थर
त्याच्या डोळा कोणी
घालावी फुंकर !

## शपथ

नकोस येऊ पहाटस्वप्ना
शपथ तुला या
डोळ्यांची.
असेच ओले धुके असावे
ह्या पाण्यावरती
उसळत.
अशीच व्हावी अखंड सळसळ
पाण्याच्या लाटांची
तळमळ.
असेच जावे विरून त्यावर
ऐकू न यावी पुढची
चाहुल.
अशीच राहिन मिटुन पापणी
क्षितिजाच्या
रेषेवर.

—सुमन करमरमर

# 'नष्टनीड' ते 'चारूलता'

## कथा : रवींद्रनाथ टागोर

१

भूपतीला कसली नोकरी करायची काही जरूरी नव्हती. त्याच्यापाशी पैसा भरपूर होता आणि त्याचा देशहि गरम होता. तेवढ्याचसाठी त्याने एक इंग्रजी वर्तमानपत्र सुरू केले. त्याचा वकील मेव्हणा उमापद आपल्या भगिनीपतीला म्हणाला, " आता एक इंग्रजी वर्तमानपत्र काढ भूपती. ज्या प्रकारची असाधारण बुद्धिमत्ता तुला लाभली आहे, " वगैरे वगैरे.

भूपतीला अवसान आले. त्याने मेव्हण्याला हाताशी घेऊन अल्पवयातच संपादकाच्या गादीवर आरोहण केले.

संपादकाप्रमाणेच राजकारणाचा कैफ अल्पवयात फार जोर धरतो. भूपतीला स्तुती करून चढवणारे लोकहि त्यावेळी बरेच होते.

या मुदतीत त्याची छोटी वधू चारूलता यौवनात पदार्पण करीत होती. संपादक महाशयांना या महत्त्वाच्या बातमीचा पत्ता लागला नव्हता.

श्रीमंताचे घर असल्यामुळे चारूलतेला काही काम नव्हते. फळ येत नसलेल्या फुलासारखी परिस्थिती असल्यामुळे नुसते फुलून उठण्यापलीकडे तिला दुसरे काहीच काम नसे. वर्तमानपत्राच्या कचाटयातून सोडवून नवऱ्याला काबीज करून बसणे तिला अशक्य झाले होते !

तरुण पत्नीकडे विशेष लक्ष देण्याबद्दल कुणी नात्यागोत्याच्या स्त्रीने जर कानउघाडणी केली तर भूपती एकदम उसळून म्हणे, " खरंच ते, चारूला कुणीतरी सोबतीण हवी आहे. बिचारीला कसलंच काम नाही ना ! "

तो आपला मेव्हणा उमापद याला म्हणाला, " तुझ्या बायकोला आमच्या इथेच आणून ठेव ना ! कुणी बरोबरीची सोबतीण नसल्यामुळे चारूला फार ओकं ओकं वाटतं. "

चारूला उणीव होती ती बायकांच्या सोबतीची, असा समज करून घेऊन संपादकांनी मेहुण्याची बायको मंदाकिनी हिला घरी आणून ठेवले, तेव्हा त्याला निश्चित झालो असे वाटले. ज्या काळात नवरा आणि बायको प्रेमाच्या, उदयाच्या पहिल्या अरुण प्रकाशात एकमेकांशी कसल्यातरी अजब आकर्षणाने अधिक जवळ येऊन अखंड नवेपणा अनुभवतात, तो दांपत्यप्रेमाचा सोनेरी किरणांनी उजळणारा प्रभातकाल त्या अचेतन अवस्थेत केव्हा निघून गेला ते कुणालाच कळले नाही. नवेपणाची माधुरी चाखायला न मिळाल्यामुळे उभयता-उभयतांची जुन्या ओळखीच्या सरावाच्या नात्याने वावरू लागली.

लिहिण्या–वाचण्याकडे चारूलतेची स्वाभाविक आवड असल्यामुळे तिचे दिवस फारसे कंटाळवाणे जात नव्हते. ती स्वतःच्या आवडीने वेगवेगळ्या युक्त्या करून वाचनाच्या सोयी करून घेत होती. भूपतीचा आतेभाऊ अमल तिसऱ्या वर्षात शिकत होता, त्याला पकडून चारूलता अभ्यास करू लागली. हे काम पचवण्यासाठी तिला अमलच्या बऱ्याच आवडीनिवडींकडे लक्ष पुरवावे लागत होते. त्याला अधूनमधून हॉटेलात जायची सवय होती. त्यासाठी आणि इंग्रजी साहित्याचे ग्रंथ विकत घेण्यासाठी तिला पैसे पुरवावे लागत होते. भूपती चारूलतेवर कोणताच हक्क गाजवीत नसे. पण अमल याच्या मागणीला अंत नव्हता.

अमल म्हणाला, " वहिनी आमच्या कॉलेजातला राजवाडीचा जावई राजघराण्यातल्या खास हाताने विणलेल्या कार्पेटच्या वाहणा वापरतो. मला ते बघवत नाही. मला कार्पेटच्या वाहणा हव्या. "

चारू म्हणे, " हो तेच तर. मी बसल्याबसल्या तुमच्या वाहणा विणीत मरू होय ? पैसे देते ते घ्या आणि बाजारातून विकत आणा. " अमल म्हणाला, " ते होणे नाही. "

चारूला तसल्या वाहणा विणता येत नव्हत्या आणि अमलजवळ ते कबूल करण्याची तिची तयारी नव्हती. कुणी तिच्याकडे काही मागत नसे. मागत असे काय तो अमल. अमल ज्यावेळी कॉलेजात असे त्यावेळी ती लपून कार्पेटच्या वाहाणा विणायला शिकू लागली.

ते उन्हाळ्याचे दिवस होते. घराच्या गच्चीवर अमलच्या जेवणाची जागा तयार केली होती. अमल आसनावर बसला आणि त्याने झाकण उघडले. पाहातो तो थाळीत नव्याच विणलेल्या लोकरीच्या वाहणांचा एक जोड ठेवलेला होता. चारू मोठमोठ्याने हसत सुटली.

श्रीमंतांच्या संसारात चारूला कुणासाठी काहीच करावे लागत नसे. केवळ अमल मात्र तिला उठल्याबसल्या राबवीत असे. या साऱ्या लहान-मोठ्या हौसेच्या राबण्यापायी तिच्या मनाचे एकप्रकारे समाधान होत असे.

भूपतीच्या अंतःपुरात एक जमिनीचा तुकडा होता. अमल आणि चारू या जमिनीच्या तुकड्याला बगीच्याचे स्वरूप आणण्याची योजना आखीत होती.

अमल म्हणाला, " वहिनी, आपल्या या

**मराठी अनुवाद :**
**कै. भा. वि. वरेरकर**

**कथासंक्षेप आणि अभ्यास :**
**वि. ग. कानिटकर**

बागेला तू स्वत: राजकन्येसारखं स्वत: हातानं पाणी द्यायला हवं. "

चारू म्हणाली, " आणि या कोपऱ्यात एक कुंपण घालायचं आणि त्यात हरणाचे बच्चे ठेवायचे.

अमल म्हणाला, " अन् एक लहानसं डबक तयार करायचं अन् त्यात हंस सोडायचे. "

चारू म्हणाली, " त्यात आपण निळी कमळे लावू. "

अमल म्हणाला, " सरोवरावर पूल बांधू आणि घाटावर एक होडी ठेवू. "

चारूची भावजय मंदा माडीवरून तिला हाक मारीत म्हणाली, " एवढा वेळ बागेत काय चाललंय् तुमचं ? "

चारू म्हणाली, " पिक्के आवळे शोधतेय्."

चारू हसली. अमलहि हसला. बागेचे कारस्थान त्या दोघांपुरतेच होते. हेच त्यांच्या साऱ्या संकल्पांच्या कल्पनेचे, आनंदाचे आणि गौरवाचे साधन होते.

चारू म्हणाली, " अमल, तू लेखक असतास तर बरे झाले असते. मग आपला या बागेचे वर्णन करून तुझ्याकडून एक गोष्ट तरी लिहून घेतली असती. तू लिहायचा प्रयत्न तर करून पाहा. खात्रीनं तुला लिहिता येईल. "

अमल रहस्यपूर्ण आव आणून म्हणाला, " मला लिहिता येणार नाही असं का वाटतं तुला ? "

चारू उसळून म्हणाली, " मग खात्रीनं यापूर्वी तू काहीतरी लिहिलंय्स. मला दाखव पाहू. "

अमल म्हणाला, " आज राहू दे. "

" नाही आजच दाखवायला हवं. शपथ आहे माझी. "

तो आपली चोपडी घेऊन आला. जरा



**' चारूलता ' चित्रपटातील एक दृश्य**

**भूपती**, दत्त [ शैलेन मुखर्जी ] **अमल,** [ सौमित्र चटर्जी ] **चारूलता** [ माधव मुखर्जी ]

' नष्टनीड ' ही मूळ रवींद्रनाथांची बंगाली कथा. कादंबरी वाटावी एवढी ती प्रदीर्घ आहे. सुप्रसिद्ध बंगाली दिग्दर्शक सत्यजित रे यांचा ' चारूलता ' हा नवा चित्रपट याच कथेवर आधारित आहे. रवींद्रनाथांची मूळकथा व सत्यजित रे यांनी केलेले चित्ररूपांतर याचा हा एक वैशिष्टयपूर्ण अभ्यास रंजक तसाच बोधक आहे.

' नष्टनीड ' (विस्कटलेले घरटे) या बंगाली कथेचा मराठी अनुवाद कै. वरेरकर यांनी केलेला आहेच. याच अनुवादाचा अवश्य तेवढा संक्षेप येथे प्रथम दिला आहे व या कथासंक्षेपाच्या पार्श्वभूमीवर ' चारूलते 'चे रसग्रहण शेवटी सादर केले आहे.

वाचक या नवीन उपक्रमाचे स्वागत करतील अशी अपेक्षा.

चेहरा लाल करून, थोडेसे खाकरून त्याने वाचायला सुरुवात केली. झाडाच्या बुध्याला टेकून गवतावर पाय सोडून चारू ऐकत होती. वाचन सपल्यावर ती क्षणभर स्तब्ध झाली अन् म्हणाली, "कोण म्हणेल तुला लिहायला येत नाही ? "

त्या दिवशी त्या झाडाखाली अमलने साहित्याचा मादक रस चाखला. साकी नवीन होती. रसना होती नवीन आणि अमरकालच्या उजेडातून पडणाऱ्या लांबलचक छायेमुळे सारे काही रहस्यमय झाले होते

२

बगीचा करण्याचा सकल्प, इतर बऱ्याच सकल्पाप्रमाणे केव्हा कुठे हरवला त्याचा अमल आणि चारू याना पत्ताच लागला नाही.

एके दिवशी तिसऱ्या प्रहरी अमल कॉलेजातून घरी आला, त्यावेळी त्याचा खिसा बराचसा वर आलेला दिसत होता. चारू म्हणाली, " महाराज, खिशात काय आहे ते बाहेर काढा पाहू ! "

अमल म्हणाला, "काय आहे सांग पाहू?"

बराच वेळपर्यंत चारूला शक्य तेवढे खिजवून शेवटी अमलने खिशातून ' सरोरुह ' नावाचे प्रख्यात मासिकपत्र बाहेर काढले. त्यात अमलचा निबध प्रसिद्ध झाला असल्याचे चारूला दिसून आले

आपली वहिनी ते पाहून फार खूष होईल असे अमलला वाटले होते. पण खुषीचे विशेषसे लक्षण दिसत नाही असे पाहून तो म्हणाला, " सरोरुह मासिकात असल्यातसल्या लेखकाचे लेख येत नसतात. "

ते ऐकून चारू खूष होण्याचा प्रयत्न करू लागली. पण काही केल्या तिला ते जमेना. तिच्या मनावर कुठेतरी कसलातरी आघात झाला होता, पण त्याचे सुसगत कारण तिला अजमावता येत नव्हते.

अमलचे लेखन म्हणजे अमल आणिचारू या दोघांची मिळकत होती. अमल लेखक अन् चारू वाचक ! त्यातला गुप्तपणा हाच त्यातला रसिकतेचा मुख्य गाभा होता. आता अमलला त्याच्या वाचकांचीहि प्रशसापर पत्रें येऊ लागली. ती पाहून चारू जशी खूष होई तशीच दु खीहि होई

भूपती एक दिवस तिला म्हणाला, " बर का चारू, आमचा अमल इतका सुदर लिहितो - हे मला माहिती नव्हतं ."

भूपतीच्या मनात अमलबद्दल मानाची भावना उत्पन्न व्हावी अशीच चारूची इच्छा होती.

३

वाचकवर्गात प्रख्याती झाल्यामुळे अमल आता मान ताठ करून चालला होता. यापूर्वी तो शाळेतल्या विद्यार्थ्यांसारखा वागे. आता तो समाजातील प्रतिष्ठित माणूस होऊन राहिला होता.

आजवर मदाकिनी त्याला विशेष खिजगणतीत घेत नसे. अमल आणि चारू याचे बोलणे चालणे, चर्चा म्हणजे एक पोरखेळ आहे, असे मानून ती उपेक्षा करी, पानाचे विडे लावी आणि घरकाम करी. त्या दोघापेक्षा आपला दर्जा फार वरचा आहे आणि संसारात आपली आवश्यकता अपरिहार्य आहे, असे तिला वाटे. मुख्य गोष्ट अशी होती की एक आश्रित दुसऱ्या आश्रिताच्या डोळ्यांत सलत असतो.

पण आता तो पूर्वीचा अमल राहिला नव्हता. त्याची संकुचित नम्रता नाहीशी झाली होती. या जगात प्रतिष्ठा पावलेला माणूस कोणत्याहि प्रकारे संकोच न करता बेधडक स्वत चा प्रचार करू शकतो ज्याला अशा प्रकारचा निश्चित अधिकार लाभला आहे तो समर्थ पुरुष सहजच बायकांच्या जातीची नजर आकर्षित करायला समर्थ होतो. चोहीकडून अमलचे कौतुक होत आहे, असे ज्या वेळी मंदेला दिसून आले, त्या वेळी अमलच्या तरुण चेहेऱ्यावरची नवगौरवाची दीप्ती पाहून मंदाच्या नजरेलाहि भुरळ पडली. ती आता अमलकडे नव्या दृष्टीने पाहू लागली. न मागता पानाचे विडे अमलच्यापुढे येऊन पडत होते.

मदात झालेला हा अचानक बदल चारूला जाणवत होता. तिला यावद्दल जेवढी चीड येई तेवढी अमलला येत नसे. आपल्याविरुद्ध तोड फिरवलेली एक स्त्री आता पुन्हा आपल्या बाजूला वळत आहे हे पाहून त्याला एक प्रकारचा आवेश येऊ लागला होता.

पूर्वी एकदा चारू आणि मदा पत्ते खेळत बसली होती. इतक्यात आपला लेख हाती घेऊन अमल येथे आला. आपले लेखन चारूला ऐकवण्यासाठी तो उतावीळ झाला होता. पण खेळ बद होत नाहीसे पाहून तो चिडून म्हणाला, " चालू दे तुमचा खेळ. "

अमलला थाबवीत चारू म्हणाली होती, " कुठं चाललास ? थाब ना ? " असे म्हणून तिने घाईघाईने स्वत.च होऊन खेळ बद केला.

मदा म्हणाली, " आता तुमचं वाचन सुरू होणार वाटत ? मग मी जाते तर ! "

चारू साळसूदपणे म्हणाली, " का ? तूही ऐक ना. "

मदा म्हणाली होती, " नाही ग बाई, ते तुमचं मातीमसण मला काही कळत नाही. झोप येते मला ऐकताना, " असे म्हणून अर्धवट खेळ मोडल्यामुळे त्या दोघावरहि चिडून ती निघून गेली होती.

आता तीच मदा अमलला म्हणे, " तुम्ही काय वाचीत होता ते वाचा ना ? थांबला का ? मला भारी आवडतं ते ऐकायला. "

अरसिक मंदाच्या समोर अमलने आपला लेख वाचावा असे चारूला वाटत नव्हते. पण मदानेही आपले लेखन ऐकावे असे अमलला वाटे.

चारू नसताना म्हणूनच एकदा मदा हसून म्हणाली, " जा बाबा, ती नसताना मला लेख ऐकवलास तर पेचात पडावं लागेल. "

४

मंदा आपल्या खोलीत बसून केसाची दोरी विणीत होती. वहिनी म्हणून हाक मारीत अमल खोलीत आला. ती हसून म्हणाली, " अरेरे अमलबाबू, कुणाला शोधायला आलात आणि कोण मिळाली ? असल हे तुमचं नशीब ! "

अमल म्हणाला, " उजव्या बाजूच गवत काय अन् डाव्या बाजूच गवत काय? गाढवाच्या दृष्टीन दोन्ही सारखीच आवडती. " अमल तेथेच बसला. म्हणाला " तुमच्या गावच्या गोष्टी साग पाहू, मी ऐकतो. "

लेख लिहिण्यासाठी विषय मिळविण्याच्या दृष्टीने अमल सर्वांच्या गोष्टी कौतुकाने ऐकत असे. मंदा आपली हकीकत सागू लागली. तो कौतुकाने हसत होता. इतक्यात चारू तिथे आली. तिला वाटले अमलबरोबर खोलीत एकटीच बसून मंदा हसत आहे. कुणी पाहिले असते तर काय म्हटले असते ? पण यासाठी टाकून बोलणे चारूला फार कठीण गेले. कारण मदाने तिचाच दृष्टात देऊन उलट उत्तर दिले तर ? मदा जाळे फेकीत होती यात सशय नव्हता.

तिचा दादा, तो बिचारा तिच्या नवऱ्याचे वर्तमान कसे चालेल या काळजीने रात्रंदिवस खपत होता. आणि इकडे मंदा अमलला मुलवण्यासाठी जाळे पसरत होती. मोठा पेचच होता हा.

पूर्वी अमल ठीक होता. त्याचा नावलौकिक झाला ; तेव्हापासून हा सारा अनर्थ दिसून येऊ लागला होता. आपल्या हातून सुटून आता दहापाच माणसांचा आदर चाखावयास मिळाल्यामुळे अमल असा अनावर झाला होता हे चारूला आता स्पष्टपणे कळून आले होते.

चारू होती फक्त वाचक. तो होता लेखक. लेखकाला सर्व वाचक सारखेच. याचा प्रतिकार करावयास हवा.

५

त्या दिवशी आषाढातले नवे ढग आले होते. चारू उघडचा खिडकीबाहेर झुकून काही तरी लिहीत होती. पाऊल न वाजवता अमल मागल्या बाजूने केव्हा आला ते तिला कळलेसुद्धा नाही. अंधुक प्रकाशात चारू लिहीत होती. अमल वाचीत होता. जवळच अमलने लिहिलेले छापून प्रसिद्ध झालेले एक दोन लेख पडले होते.

" तरी पण मला म्हणतेस की मला लिहिता येत नाही. " अचानक अमलच्या तोंडून निघालेला उद्गार ऐकून चारू बरीच दचकली. चारू म्हणाली, " हे बरे नव्हे. छपून छपून का वाचीत होतास ? "

अमल म्हणाला, " उघड उघड वाचायला मिळत नाही म्हणून. "

चारू लिहिलेले कागद फाडून टाकू पाहत होती. पण अमलने चटकन ते तिच्या हातून काढून घेतले, चारू म्हणाली, " पाहा. वाचलेस तर उभ्या जन्मात तुझं माझं वाकडं येईल. "

अमल म्हणाला, " वाचू नकोस म्हटलंस तरी उभ्या जन्मात तुझं माझं वाकडं येईल. "

शेवटी चारूला हार खावी लागली. कारण आपण लिहिलेले लिखाण अमलला दाखविण्यासाठी तिचे मन उतावीळ झाले होते. पण ते दाखविण्याच्या वेळी आपल्याला एवढी लाज वाटेल याची तिला कल्पना नव्हती. अमलने जेव्हा वाचायला सुरुवात केली त्या वेळी चारूचे हातपाय लाजेने थंडगार झाले. ' मी पान घेऊन येते हं ? असे म्हणत






ती घाईघाईने शेजारच्या खोलीत पानाचे विडे करण्यासाठी निघून गेली.

तो लेख वाचून पुरा झाल्यावर अमल चारूकडे गेला आणि म्हणाला," सुंदर झालंय्. दादाला एकदा ऐकवायला हवं. "

हे ऐकून चारू त्याच्या हातचे कागद काढून घ्यायचा प्रयत्न करीत म्हणाली, " नाही. त्यांना कळता कामा नये. मी लिहिते म्हणून त्यांना सांगितलंस तर मी एक अक्षरसुद्धा लिहायची नाही. "

अमल म्हणाला, " वहिनी तू अगदी चुकतेस. दादा तोंडाने काही बोलो, तुझं लिखाण पाहिलं की तो अगदी खूष होईल. "

चारू म्हणाली, " होऊ देत. मला खुषी नकोय् कुणाची. "

चारूने काहीतरी लिहायचे म्हणून प्रतिज्ञा केली होती. लिहायचे आणि अमलला थक्क करायचे.

मंदापेक्षा आपण अगदी वेगळी आहो हे शाबीत केल्याशिवाय सोडायचं नाही. काही दिवसपर्यंत तिने पुष्कळसे लिहून फाडून टाकले होते. ती लिहायला गेली की ते लिखाण अगदी अमलच्या लिखाणासारखे होई. अमलचीच वाक्येची वाक्ये उचलून घेतल्यासारखी

दिसत. बाकीची कच्ची वाटत. चारूने ते सारे लिखाण तुकडे तुकडे करून फेकून दिले होते.

शेवटी चारूने आपल्या रचनेचा विषय बदलला. चंद्र, मेघ, कोकिळा ही सारी सोडून दिली. तिच्या गावात तळ्याच्या काठाला, झाडाच्या छायेत, काळोखात एक कालीचे देऊळ होते. लहानपणी त्या देवळाची कल्पना तिला भीतिप्रद वाटे. त्या जागृत देवस्थानाच्या पुष्कळ दंतकथा होत्या. त्या सर्व आठवणी मोठ्या विचित्र होत्या. त्या साऱ्या घेऊन तिने लेख लिहिला होता. त्याचे नाव होते ' कालीघाट. '

६

एके दिवशी भूपती येऊन म्हणाला, "चारू, तू लेखिका होणार होतीस याचा पूर्वी कुठे थागपत्ता नव्हता !"

चारू दचकली, गोरीमोरी झाली अन् म्हणाली, " मी लेखिका ? कुणी सागितलं तुम्हाला ? मुळीच नाही. "

भूपती म्हणाला, " अगदी मुद्यासकट गिरफदार. हातोहात पुरावा. " असे म्हणून भूपतीने ' सरोरुह ' मासिकाचा अंक बाहेर काढला.

७

सध्याकाळच्या वेळी खिडकीपाशी चारू बसून राहिली होती. वाऱ्याच्या झुळुकेने तिचे मोकळे केस हळूहळू उडत होते. तिच्या डोळ्यावाटे पाण्याच्या धारा का लागल्या होत्या हे तिचे तिलाच कळत नव्हते.

अशा वेळी भूपती आत आला. हळूहळू येऊन तो तिच्यामागे उभा राहिला. चारूच्या केसात बोटे फिरवीत मायेच्या पाझरलेल्या आवाजाने विचारू लागला, " काळोखात एकटीशी बसून राहिलीयस् चारू ? मंदा कुठे गेली ?"

अनपेक्षितपणे नवऱ्याचा आवाज कानी येताच तिला एकदम रडू कोसळले. काय झाले ते बोलणे कठीण होते. विशेष काहीच झाले नव्हते. अमलने लिहिलेला नवा लेख पहिल्याने तिला न दाखवता मदाला ऐकवला म्हणून काय ती भूपतीकडे तक्रार करणार होती ? या क्षुल्लक बाबतीत काहीतरी तक्रार करण्याजोगा मुद्दा झाकलेला असावा, पण तो शोधून काढणे चारूला अशक्य झाले होते.

भूपती पुन्हा म्हणाला, " सदोदित मला तुझ्याकडे यायला होत नाही. चारू. मी अपराधी आहे त्या बाबतीत. "

चारू अधीर होऊन म्हणाली, " त्यासाठी नव्हे. अलीकडे मदाची वागणूक मला बरी वाटत नाही. "

" का ? काय केलं तिनं ?"

" अमलबरोबर ती कशी वागते ते पाहिल्यावर शरम वाटते मला. "

भूपती एकदम हसत सुटला आणि म्हणाला, " छे, पागल झालीयस् तू. अमल म्हणजे कालचे पोर. तुम्ही बायका म्हणजे भारी सशयी. "

चारू रागारागाने म्हणाली, " बराय्. आम्ही आपले संशयी. "

भूपती मोठ्या स्नेहाने चारूच्या ललाटाचे चुबन घेऊन म्हणाला, " या बाबतीत आता उगीच आरडाओरडा करायची जरूर नाही. उमापद आता मैमनसिंगला प्रॅक्टिस करायला जातो आहे. तो मदाला बरोबर घेऊन जाईल."

चारूची सशयी वृत्ती पाहून भूपती खूषही झाला. घर पवित्र राहावे म्हणून साध्वी स्त्री फाजील तत्पर असते. त्यात जसे एक प्रकारचे माधुर्य असते तसेच महत्त्वहि असते.

८

भूपतीच्या वर्तमानपत्राचा उमापद हा व्यवस्थापक होता. वर्गणी वसूल करणे, छापखान्याचे येणे–देणे, पगार वाटणे वगैरे कामे करण्याचा भाग उमापदवर सोपवला होता.

कागदवाल्याकडून अचानक वकिलाची नोटीस आलेली पाहून भूपती आश्चर्यचकित झाला. भूपतीकडे सत्तावीसशे रुपयाचे देणे निघाले होते ! उमापदला बोलावून भूपती म्हणाला, " ही काय भानगड आहे ? कागदवाल्याचे देणे चारपाचशेपेक्षा जास्त असायला नको होते.

उमापद म्हणाला, " निश्चित काहीतरी चूक झालीय् तुमची. "

उमापद काही दिवसापासून अशीच भानगड करीत होता. नुसती कागदाच्या बाबतीतच नव्हे तर भूपतीच्या नावाने उमापदने बाजारात बरेच देणे करून ठेवले होते.

पैसा वाया गेल्यामुळे भूपतीला तेवढेसे दु:ख झाले नाही. पण अचानक हा विश्वासघातकीपणा नजरेला आल्यामुळे उंचावरून खोलात पाय पडल्यासारखे त्याला वाटले.

दुसऱ्या दिवशी उमापद मैमनसिंगला जायला निघाला. अमलने येऊन विचारले, " काय चालवलय् हे मदावहिनी ? सामानसुमानाची ही बाधाबाध कशाला ?"

मदा म्हणाली, " अरे भाई, जायला तर हवंच. जन्मभर काय इथेच राहायचय् ?"

अमल म्हणाला, " कुठं चाललीस ? इथ कसली अडचण आलीय् ?"

" आम्हाला अडचण कसली ? अडचण होऊ लागली ती दुसऱ्याना." असे म्हणून तिने चारूच्या खोलीकडे नजर फेकली.

अमल गभीर होऊन उगाच राहिला. मदा म्हणाली, " छे, छे ! शरम वाटते. "

अमल अधिक काही बोलला नाही. चारू दादाजवळ असे काही बोलली असेल की ते सांगता येत नसावे, एवढाच ग्राह्यांश त्याने घेतला.

यावेळी भूपती रिकाम्या तिजोरीसंबंधी विचार करीत डोक्यावर हात ठेवून बसला होता. त्याच्या मनातल्या कोरड्या दु खाला दुसरा कुणी भागीदार नव्हता.

अशा वेळी वावटळीसारखा अमल आत आला आणि म्हणाला, " दादा, माझ्याबद्दल तुमच्या मनात कसला तरी सशय आलाय् का ? माझ्या चारित्र्याबद्दल वहिनीने तुमच्यापाशी काही दोषारोप केले आहेत का ?" भूपती म्हणाला, " वेड लागलय् की काय तुला ?"

अमलने पुन्हा विचारले, " वहिनी काही बोलली नाही ?"

भूपती म्हणाला, " तुझ्या लोभामुळे जर काही कमीजास्त बोलली असेल तर तेवढ्यासाठी राग धरून बसायला नको काही. "

अमल एवढेसे तोड करून निघून गेला.

९

एके दिवशी भूपती चारूला म्हणाला, "चारू, अमलला एक फार चागल स्थळ चालून आलय्. वर्धमानचे वकील रघुनाथबाबू आपल्या मुलीबरोबर अमलचे लग्न लावून देऊन त्याला विलायतेला पाठवणार असे म्हणतायत्. "

चारूने आश्चर्यचकित होऊन विचारले, " विलायतेला ? छान झालं. मग तुम्ही एकदा त्याला सांगून टाका. "

भूपती म्हणाला, " मी सांगायच्या पूर्वी तू त्याला बोलावून घेऊन एकदा सांगितलस तर बरं नाही का ?"

चारू म्हणाली,-" मी त्याला काही सांग-

णार नाही."

मग भूपतीने अमलला बोलावणे पाठवले व रघुनाथबाबूची योजना त्याला सांगितली व विचारले, "तुझे काय म्हणणे आहे?"

"तुमची अनुमती असेल तर माझीही कबुली आहे."

अमलचे भाषण ऐकून दोघांनाहि आश्चर्य वाटले. भूपती खूष झाला.

१०

भूपतीला वर्तमानपत्र बंद करावे लागले होते. त्याचा खर्च चालविणे भूपतीला अशक्य झाले होते.

चारू विचार करीत होती, "काय आश्चर्य आहे? अमलच लग्न होतय् ते ठीकच होतय् पण आम्हाला टाकून जावं लागणार म्हणून त्याला मनात एकदासुद्धा कशी खळबळ उडाली नाही? बोलत होता किती गोड गोड? केवढे ते प्रेम? माणसाला ओळखणं कठीण खरं." चारू संतापली होती, दुःखाने उतावीळ झाली होती. पहिल्यापासून अमलचे व तिचे लोभाचे नाते जडले होते. कित्येक लोभाचे झगडे, किती लाडीगोडी! हे सारे आज धुळीत उडवून अमल दूर निघून जाणार होता का? अमलचे मदावर प्रेम तर नव्हते ना? मदा निघून गेली म्हणून तर अमल असा—छे, छे! त्याचे मन इतके क्षुद्र असेल? विवाहित स्त्रीवर काय त्याचे मन गेले असेल?

अमल निघायची वेळ आली. सारी रात्र जागून अमलला निरोप देताना काय बोलायचे ते चारूने ठरवून ठेवले होते. हसरा राग आणि प्रफुल्ल औदासिन्य यांनी घासूनपुसून ती वाक्ये मनातल्यामनात घोळून ठेवली होती. पण निरोप द्यायच्या वेळी चारूच्या तोंडातून त्यातले काही बाहेर आले नाही. ती नुसते म्हणाली "पत्र पाठवशील ना अमल?"

अमलने जमिनीवर डोके टेकून प्रणाम केला. चारू धावतच आपल्या शिबिरात गेली आणि तिने दार बंद करून घेतले.

११

भूपती अमलच्या लग्नासाठी वर्धमानला गेला होता. तिथे त्याला विलायतेला पाठवून तो घरी परत आला. अमलचे लग्न आणि त्याच्या विलायतच्या प्रवासाची सुरुवात याचे विस्तृत विवेचन ऐकण्यासाठी चारू स्वाभाविकपणे उत्सुक झाली असेल असे त्याला वाटत होते. पण तिने एकहि प्रश्न विचारला नाही. त्यामुळे भूपती थोडासा खिन्न झाला. अमल इथे होता तोवर चारू त्याच्याबरोबर हसत, खेळत होती. आता तो निघून जाताच ती त्याच्याबद्दल अशी उदासीन का?

भूपती रात्री चारूला म्हणाला, "मुलगी दिसायला बरी आहे.. झोप आली का चारू?"

चारू म्हणाली, "नाही"

भूपती म्हणाला, "बिचारा अमल एकटाच निघून गेला. गाडी सुटण्यापूर्वी एखाद्या पोरासारखा रडू लागला."

दिवा मालवल्यावर चारू पहिल्याने काळोखात बिछान्यावर पाठ फिरवून झोपी गेली. मग घाईघाईने बिछाना सोडून निघून गेली.

तोही उठला पलीकडच्या व्हराड्यावरून तोंड दाबून रडल्याचा आवाज ऐकू येत होता.

तिचा हा अनावर दु:खावेग पाहून भूपतीला आश्चर्य वाटले. हृदयातला दु:खावेग आपल्यासमोर देखील प्रकट न करण्याइतका चारूचा स्वभाव संकोची होता का?

१२

भूपतीने आपले वर्तमानपत्र बंद करून, ज्यावेळी घरी बसायचे ठरविले त्यावेळी आपल्या भविष्यकालाचे हे चित्र त्याने आपल्या मनात रेखाटले होते. कोणत्याही प्रकारे दुराशेमागे जायचे नाही. हसून-खेळून दिवस काढायचे. परस्पराची करमणूक करायची. घरात शांतीचे साम्राज्य स्थापन करायचे.

प्रत्यक्ष अनुभवाच्या वेळी त्याला दिसून आले, की सहजासहजी मिळणारे सुख तेवढे सहज नसते. चारूशी जमवून घेणे भूपतीला काही केल्या साधले नाही. या कामी तो स्वत:लाच दोष देई. बारा वर्षे सारखी वर्तमानपत्रे चालविण्यात घालविताना स्वत:च्या बायकोबरोबर कशारीतीने गप्पागोष्टी करायच्या हे कळायची विद्या त्याच्या हाताबाहेर गेली होती.

साजवात लागली की भूपती नेमका घरात जाई. तो एकदोन शब्द बोले. चारूहि एकदोन शब्द बोले. त्यानंतर काय बोलायचे हे त्याला काही केल्या सुचत नसे. आपल्या बायकोसमोर दिसून येणारा हा आपला दुबळेपणा जाणून त्याला लाज वाटू लागली. बायकोबरोबर गोष्टी करणे फारसे कठीण नाही असे त्याला वाटले होते आणि आता मूढपणामुळे ते त्याला भारी कठीण जात होते.

भूपतीच्या जिवाची करमणूक करायची सवय यापूर्वी चारूला कधीच लागली नव्हती. सर्वदृष्टींनी चारूशिवाय आपले चालायचे नाही, अशी परिस्थिती त्यानेही उत्पन्न केली नव्हती.

एके दिवशी सायंकाळी भूपती भला मोठा दिवा लावून बसला होता. तो चारूला म्हणाला, "तुला काही वाचून दाखवू का?

चारू म्हणाली, "वाचा ना?"

भूपती म्हणाला, "काय वाचू?"

"तुम्हाला वाटेल ते."

चारू फारसा आग्रह करीत नाही हे पाहून भूपती जरा थबकला. सारे काही फुकट गेले.

१३

जोराचा फटका बसला म्हणजे सुरुवातीला स्नायू सुन्न होतात आणि वेदना जाणवत नाहीत. त्याचप्रमाणे वियोगाच्या सुरुवातीला अमलचा अभाव चारूला तितका जाणवला नाही.

जसजसे दिवस जाऊ लागले तसतशी अमलच्या अभावामुळे उत्पन्न झालेली सांसारिक शून्यता पायरीपायरीने तिला जास्त जाणवू लागली. या भयकर शोधामुळे चारू हतबुद्ध होऊन गेली. घनदाट कुजवनातून ती एकदम कुठल्यातरी सहारा वाळवंटात येऊन पडली होती. दिवस जात होते तसतसा वाळवंटाचा पसारा वाढत जात होता.

ती झोपेतून उठली की एकदम तिच्या छातीत धस्स होई. तिला आठवे; अमल नाही! तिला भीती वाटू लागली होती, असा हा अमल माझा कोण की ज्याच्यामुळे मला एवढे दु:ख भोगावे लागत आहे? ती नुसती प्रश्न करीत होती, चकित होत होती. पण दुःखाचे परिमार्जन होत नव्हते.

हळूहळू असे झाले की एकाग्र चित्ताने अमलचे ध्यान करणे हाच तिचा छुप्या अभिमानाचा विषय झाला.

१४

विलायतेतून पत्र येण्याच्या दिवसावर चारू सदोदित नजर ठेवून राही. पहिल्याने एडनहून भूपतीच्या नावे एक पत्र आले. त्यात अमलने वहिनीस प्रणाम लिहिले होते. सुवेझहून पत्र आले त्यातहि प्रणामच होते. माल्टाहून पत्र आले त्यातही तसेच प्रणाम होते.

चारूला अमलकडून एकही पत्र आले नाही. अमलच्या या उपेक्षेने चारूच्या अंत:करणातील त्याची छाया चूरमार होऊन गेली.

तिच्या अंतरंगात ओढाताण सुरू झाली. संसारातल्या तिच्या कर्तव्याच्या क्षेत्रात पुन्हा भूकंपाचे आंदोलन सुरू झाले.

भूपती उद्विग्न झाला. अर्ध्या रात्री तो उठून पाही तो चारू बिछानावर नसे. दक्षिणेकडल्या खोलीतल्या खिडकीत ती बसलेली दिसून येई. भूपतीला पाहिले की ती घाईघाईने उठे आणि म्हणे, "खोलीत भारी उकडत होते म्हणून इथे वाऱ्यावर येऊन बसले."

अमल विलायतेला पोहोचला. प्रवासात शक्य झाले नसेल, परंतु विलायतेला पोहोचल्यावर तो लांबलचक पत्र लिहील असे चारूला वाटले होते. पण ते पत्र काही आले नाही.

चारूची बहीण तिच्या गावी आजारी होती. तिची खबर काढून आणण्याकरिता भूपती स्टेशनकडे निघाला होता. वाटेत एक ओळखीचा तारेचा शिपाई भूपतीला पाहून बैलगाडीशी आला. त्याने एक तार त्याच्या हाती दिली. विलायतेच्या तारेचे कव्हर पाहून भूपती फार घाबरला. त्याला वाटले, अमल आजारी तर नाही? भीतभीत त्याने तार उघडून वाचली. "मी खुशाल आहे." याचा अर्थ काय? हे तर तारेचे उत्तर होते. चारूनेच विलायतेला तार केली होती... त्याला हे अमलचे उत्तर होते.

गाडी मागे फिरवून भूपती घरी आला आणि त्याने ती तार चारूच्या हाती दिली. भूपतीच्या हातात ती तार पाहताच चारूचा चेहरा गोरामोरा झाला.

भूपतीला वाटलं, "असं करण्याची काय जरूर होती? मलाच सांगितलं असतं तर मीच तार केली असती."

एक अस्पष्ट संशय अगदी न कळत त्याला टोचू लागला होता! तो संशय भूपती प्रत्यक्षपणे पाहू इच्छित नव्हता. तो विसरायचा प्रयत्न करीत होता, पण ती वेदना काही केल्या त्याला सोडीना. त्याच्या ध्यानीमनीहि नव्हते ते आता त्याला जाणवू लागले होते. त्याच्या लेखी सारे जग आता एकदम सुकून, वाळून, कोरडून गेले होते. 'मूढ, मूढ, मूढ!' म्हणून कुणीतरी आपल्याला वेताने मारीत आहे असे वाटे. भूपती परक्यासारखा चारूला दुरून पाहू लागला. त्याने आपल्या जीवनाला चारूच्या जीवनातून दूर करून घेतले होते.

## १६

भूपतीच्या दोस्ताने त्याला विचारले, "काय आहे भानगड? कसली चालली एवढी गडबड?"

भूपती म्हणाला, "म्हैसूरला एक पेपर निघतोय्. मला त्याचे संपादक केलय्."

मित्र म्हणाला, "चारूला बरोबर नेणार आहेस का?"

भूपती म्हणाला, "नाही. मामा इथे येऊन राहणार आहेत."

"तुझा संपादकीचा नशा काही केल्या सुटत नाही म्हणायचा?" भूपतीने उत्तर दिले, "माणसाला काही ना काहीतरी नशा हवीच."

तो निघायच्या वेळी चारूने विचारले, "केव्हा येणार?"

भूपती म्हणाला, "तुला जेव्हा एकटे एकटे वाटेल तेव्हा मला पत्र लिही की मी निघून येईन."

तिचा निरोप घेऊन भूपती जेव्हा दारापर्यंत पोहोचला तेव्हा एकदम धावत जाऊन चारूने त्याचा हात कडकडून धरला. ती म्हणाली, "मला घेऊन जा बरोबर. मला इथ टाकून जाऊ नका."

भूपती थबकून उभा राहिला. मूठ ढिली झाली आणि भूपतीच्या हातातून चारूचा हात खुला होऊन सुटला. भूपती चारूला सोडून व्हराड्यावर उभा राहिला.

'अमलच्या वियोगाची आठवण ज्या घराला वेढून टाकून जळजळत होती, ते घर सोडून चारू पळून जाऊ पाहात होती.—पण तिनं माझ्या मनाचा विचार कुठं केला? मी कुठं पळून जाऊ? सारा दिवस परिश्रम करून सध्याकाळी घरी आल्यावर सुन्न झालेल्या विरहिणीला घेऊन बसलो तर सध्याकाळ भयानक नाही का वाटायची? जिच्या अंतरंगात मृतभार आहे तिला हृदयाशी कवटाळून धरून मला किती दिवस राहता येईल?'

भूपती चारूपाशी आला आणि म्हणाला, "नाही, ते माझ्याकडून होणे नाही."

एका क्षणात, चारूच्या देहातले सारे रक्त खाली आले आणि तिचा चेहरा कागदासारखा पांढराफटक झाला.

त्याचक्षणी भूपती म्हणाला, "चल चारू माझ्याबरोबर चल."

चारू म्हणाली, "नाही. राहू दे."

□

सत्यजित रे याचा बारावा चित्रपट 'चारूलता' हा रवींद्रनाथांच्या नष्टनीड या कथेवर आधारलेला आहे. नुकतेच दिवंगत झालेले मराठीतील ख्यातनाम नाटककार मामा वरेरकर यांनी मराठी साहित्यावर जे फार मोठे ऋण ठेवले आहे ते त्यांनी मराठीत अनुवादलेल्या बंगाली वाङ्मयाचे. शरदबाबूंच्या कादंबऱ्यांबरोबरच रवींद्रनाथांच्या कथा वरेरकरांनी मराठीत आणलेल्या आहेत. नष्टनीड ही मूळ कथा एक लहानशी कादंबरी वाटावी एवढी प्रदीर्घ आहे. केवळ लांबी-रुंदीचा विचार हा कथेच्या आणि कादंबरीच्या स्वरूपाचे वेगळेपण सांगत नाही, ही गोष्ट लक्षात घेऊनही 'नष्टनीड' ही कादंबरीच म्हणावी लागेल.

नष्टनीड या कथेचा विचार चारूलतेच्या संदर्भात करण्याचे योजिले असल्यामुळे मूळकथेतील आवश्यक तेवढा सुमारे एक तृतीयांश संक्षेप कै. वरेरकरांच्या शब्दात वर दिला आहे. हा संक्षेप करताना मुख्यत: एकच सूत्र सांभाळले आहे, की या कथेचा जो भाग मुख्यत: सत्यजित रे यांनी चित्रपटासाठी घेतला आहे, तो सर्व या संक्षेपात दिला आहे. याचा अर्थ मूळ कथेचा जवळजवळ दोन तृतीयांश भाग हा चित्रपटाच्या दृष्टीने रे यांना आवश्यक वाटला नाही. जिज्ञासूंनी रवींद्रनाथांची संपूर्ण कथा या दृष्टीने अवश्य वाचून पाहावी.

चित्रपट ही मूलत: कॅमेऱ्याने सांगावयाची कला असल्यामुळे कोणतीही कथा चित्रपटासाठी वापरताना त्यात बदल करावेच लागतात. हे बदल मूळ कथेशी इमान सोडून केले तर मूळ कथेला, अन्यायकारक होते. मूळ कथेशी संपूर्ण इमान राखून पटकथेसाठी जे बदल पटकथाकार करतो ते कधी मूळ कथा अधिक उंचीवर नेणारे असतात किंवा अगदी सामान्य असतात. या दृष्टीने नष्टनीड या कथेवर चित्रपट काढताना सत्यजित यांनी कोणते बदल केले, ते मूळ कथेला मारक ठरले की पोषक याचा विचार यावेळी अभिप्रेत आहे; अर्थात असे करताना चित्रपटाचे कथानक म्हणून जो इंग्रजी तर्जुमा आमच्यापुढे आहे तो व प्रत्यक्ष चित्रपटातील दृश्ये



दिग्दर्शक सत्याजित रे, माधवी आणि शैलेन मुखर्जी यांना 'चारूलता' चित्रातील एक दृश्य समजावून देत असताना

एवढेच मांडवल आमच्यापुढे आहे. चित्रपट बंगाली भाषेत असल्यामुळे चित्रपटातील संवाद मूळ कथेच्या अनुषंगाने ध्यानात आले तेवढेच. त्यामुळे चूकभूल द्यावी घ्यावी !

आपल्याकडे अशा अभ्यासाची संधी यापूर्वी अनेक वेळा उपलब्ध झालेली आहे. कै. माधवराव जोशी यांचे नाटक 'म्युनिसिपालिटी' (किती हसाल ?), पु. ल. देशपांडे यांची नाटके 'अंमलदार' (अमलदार), 'सुंदर मी होणार' (आज और कल), कै. साने गुरुजी यांची 'शामची आई' (शामची आई), कै. चिं. वि जोशी यांचा 'चिमणराव' (लग्न पाहावं करून, सरकारी पाहुणे), द. र. कवठेकर यांची कादंबरी 'रेशमाच्या गाठी' (रेशमाच्या गाठी), पु. भा. भावे यांची कादंबरी 'अकुलिना' (माझा होशिल का ?); याव्यतिरिक्त कै. य. गो. जोशी, महादेव शास्त्री जोशी व अरविंद गोखले यांच्या कथांवर बरेच चित्रपट निघालेले आहेत. यांतील बहुसंख्य कलाकृतींचे पडद्यावरील स्वरूप पाहून लेखकांना भोवळ आली असावी. तरीही 'शामची आई', 'आज और कल', 'लग्न पाहावे करून' व 'माझा होशिल का ?' चित्रपटांबावत असा विचार व्हावयास हरकत नाही.

## निषिद्ध प्रेमाची कथा

रवींद्रनाथांनी आपल्या 'नष्टनीड' या कथेत एका विवाहित स्त्रीच्या आपल्या पतीच्या आतेभावावरील प्रेमाच्या उत्पत्तीचे आणि प्रगतीचे उत्कृष्ट चित्रण केले आहे. या प्रेमाची अखेरीस असह्य अशा यातनामय वासनेत परिणती होते. एका सुशिक्षित व आदरणीय नवऱ्याने बायकोकडे केलेल्या अजाणतेपणाच्या दुर्लक्षामुळे हे प्रेम वाढते. हे प्रेम निषिद्ध आहे. परंतु हे निषिद्ध प्रेम रवींद्रनाथांनी इतक्या संयमाने आणि हळुवारपणे हाताळलेले आहे, की सर्वसामान्य 'गोष्ट शोधू' वाचकाला, कथेतील विवाहित नायिकेचे प्रेम अखेर वासनेत परिणती होते की नाही याचाहि संभ्रम पडावा.

चित्रपटासाठी ही कथा निवडल्यावर विवाहित नायिकेला आपल्या दिराविषयी नेमके काय वाटत होते हे पडद्यावर चित्रित करणे चित्रपटाच्या यशाच्या दृष्टीने आवश्यक होते. त्याचप्रमाणे मूळ कथेत या कथेचा जो सुमारे दोन-अडीच वर्षांचा कालावधी धरला आहे तो कमी करून या सर्व घटना फार थोड्या कालावधीत घडतात असे दाखवणे आवश्यक होते. या दोन बदलांच्या दृष्टीने सत्यजित यांनी चित्रपटाची पटकथा चित्रपटाची नायिका चारूलता हिलाच सर्वस्वी प्राधान्य देऊन लिहिण्याचे ठरवले व कथेत जो निषिद्ध प्रेमाच्या अंतिम परिणतीचा भाग मूळ कथेत फारसा स्पष्ट नाही, तो स्पष्ट करून टाकण्याचाही निर्णय घेतला असावा. त्याचबरोबर अमल कॉलेज-विद्यार्थी असल्यापासून त्याची व चारूलतेची जी गट्टी जमत आली; ती वगळून टाकून लेखक म्हणून यश पावलेला अमल आपली मोठी सुटी घालविण्याकरिता चारूलता व भूपती यांच्या विश्वात येतो. असे दाखवून चित्रपटाची कालमर्यादा निश्चित करून टाकली

## पटकथेची सुरुवात

तेव्हा चित्रपटाची पटकथा अशी सुरू झाली —

१८८० चा काळ. कलकत्त्यामध्ये भूपती दत्त हा सुशिक्षित श्रीमंत तरुण 'सेंटिनल' नावाचे इंग्रजी साप्ताहिक चालवीत असतो. वृत्तपत्राच्या व्यवसायामुळे त्याचे आपली तरुण व कलासक्त पत्नी चारूलता हिच्या आवडीनिवडींकडे दुर्लक्ष होते. तिचा कंटाळा जावा म्हणून भूपती चारूलतेचा भाऊ उमापद व त्याची बायको मंदा यांना आपल्याकडे राहण्यास बोलावतो. उमापद हा वकिली न चालणारा वकील असल्यामुळे तो भूपतीच्या

वृत्तपत्रकचेरीत पैशाचे व्यवहार सांभाळू लागतो. मंदाच्या सहवासात चारूलता खूष राहील अशी भूपतीची भाबडी समजूत असते. परतु मंदाही अशिक्षित, रागडी आहे. अशा परिस्थितीत भूपतीचा आतेभाऊ अमल हा आपली प्रदीर्घ सुट्टी घालविण्याकरिता एकदम दाखल होतो.

चित्रपटाच्या दृष्टीने हा बदल हानिकारक ठरला नाही; कारण अमल हा भूपतीचा नातेवाईकच असल्यामुळे त्याची व चारूलतेची पूर्वीची गट्टी असण्याचा समव शिल्लक राहतोच. मात्र या वेळी तो येतो तो अशा वेळी, की चारूलतेला आपल्या घरातील एकटेपणा खायला उठला आहे. तेव्हा मूळ कथेतील आशयाशी सपूर्ण प्रामाणिकता राखूनच हे दोन्ही बदल केलेले आढळतात.

मूळ कथेत अमलचे अस्तित्व घरात फार प्रदीर्घ काळ अखडितपणे गृहीत धरल्यामुळे चारूलतेच्या त्याच्यावरील प्रेमात जी धग एकदम निर्माण होते तिचे स्वरूप चटकन लक्षात येत नाही. उलट चित्रपटात अमल चारूलतेच्या ससारातून दूर गेलेला आहे, भूपतीला तिच्याकडे लक्ष देण्यास फुरसत नाही, यामुळे तिला वेळाचे काय करावे हे न समजून चारूलता निराश आहे, अशा परिस्थितीत होणारे अमलचे आगमन हे अधिक प्रभावी व प्रेक्षकाना जिंकणारे ठरते.

अमलचे आगमन निश्चित झाल्यावर त्याच्या आगमनातील चारूलतेला वाटणारे अगत्य वाढवण्याच्या दृष्टीने चित्रपटाची सुरूवात ही चारूलतेवर जे रिकामटेकडेपणाने वेळ काढण्याचे विचित्र संकट कोसळले आहे, याच्या निर्देशनातून केली पाहिजे, ही गोष्ट निश्चित झाली. चारूलतेची व्यथा, त्याबाबत भूपतीचे दुर्लक्ष आणि अमलचे आगमन या तिन्हीतील परस्पर वीण स्पष्ट करणारी ही चित्रपटाची सुरुवात पाहा—

चित्रपट सुरू होतो. श्रेयनामावली सुरू असतानाच आपल्याला कोपऱ्यात दोन हात हातरुमालावर कशिदा काढताना दिसतात. नवऱ्याच्या नावातील 'B' या आद्याक्षराभोवती दोन वेलबुट्टया तयार होत असतात. हे हात चारूलतेचे आहेत. १८८० च्या सुमाराची नवऱ्यावर प्रेम व्यक्त करण्याची ही रूढ पद्धत दाखवून सत्यजित रे यांनी दोन तरुण विवाहित स्त्रीपुरुषाचे परस्परावर प्रेम असण्याची शक्यता फक्त प्रेक्षकाच्या मनात ठसवून टाकली आहे.

## चारूलतेचे रिकामपण

श्रेयनामावली संपली की टाके घालण्याचे काम सपवून चारूलता आळस देते. वेळ घालवण्याकरिता काय करावे या दृष्टीने सगळीकडे दृष्टी टाकते. मग उठते. काही क्षण इथे उभी राहते. काही क्षण तिथे. तिचे दुःख प्रेक्षकाना समजते. 'या वेळाचे करायचे हो काय ?' इतक्यात तिला रस्त्यावरून माकडवाल्याचा आवाज ऐकू येतो. ती खुदकन् हसते. जाऊन दुर्बिण आणते. ती दुर्बिण आणायला जाते तेव्हा ज्या प्रशस्त आणि सुसज्ज दालनातून जाते, त्याची नुसती क्षेत्रफळे पाहिली, की समजते, चारूलतेचा नवरा अतिशय श्रीमंत आहे. घरात सगळी सुबत्ता आहे. दुर्बिणीतून चारुलता रस्त्यावर पाहते, एक भलताच लठ्ठ माणूस हातात छत्री घेऊन तोंडावर तूप माखल्यासारखा चेहरा करून संथपणे जात असतो. त्याला ती एकदा या शटरमधून पाहते, मग धावत जाऊन पुढच्या शटरमधून पाहते. माकडवाला तर लाबच असतो. तिला थोडी गमत वाटते, पण तेवढेच ते !

माकडवाला दूर निघून जातो· शेजारच्या खोलीतून तिचा नवरा येतो. बुटाचा आवाज करीत, गभीर मुद्रेने विचारात असल्यासारखा तो या दालनातून त्या दालनात जातो. पुस्तक घेऊन परत ते चाळीत पहिल्या दालनाकडे जातो. चारूलता यावेळी आसपास आहे हे त्याच्या लक्षातही येत नाही. चारूलतेच्या चेहऱ्यावर निराशेची एक लाट सरकून जाते.

या नंतरच्या दृश्यात उमापद व मंदा याचे आगमनन आहे. मंदा व चारूलता पलगावर पत्ते खेळत असतात. डाव कसला ? गड्डी डाव. नुसती पानावर पाने टाकायची. मदबुद्धी मदा हिरीरीने खेळत असते आणि चारूलता जांभयावर जांभया देत असते. म्हणजे खेळ केवळ मदाकरिता चालू असतो. तिचे दु.ख यत्किंचितही कमी झालेले नाही.

उलट ते वाढलेले आहे. मदा येण्यापूर्वी घरातली घरकामे तरी चारूलता करीत असे. तेवढाच वेळ जाई. आता ही सर्व कामे मंदा करते, उत्साहाने करते. म्हणजे औषधाने रोगच वाढला !

## अमलचे आगमन

तेवढ्यात अमल येतो. न बोलावता अचानक सुट्टी घालवण्याकरिता. तो आल्याबरोबर घरात चैतन्य शिरते. हे दाखवण्याकरिता. घरात एकदम वारे शिरते व निचेष्ट वस्तू एकदम वाऱ्याने उडू लागतात; असे दृश्य सत्यजितानी दाखविले आहे.

अमलच्या केशरचनेतून, पोशाखातून, चेहऱ्यावरील प्रफुल्लतेतून त्याचा आत्मविश्वास व रसिक वृत्ती एकदम समजते.

भूपती त्याला म्हणतो, "बरे झाले तू आलास. आता चारूलतेचा कंटाळा तुला काढला पाहिजे."

चित्रपटातील ही सुरुवातीची सर्व दृश्ये, ह्यांचा जन्म सत्यजितांच्या कल्पनागर्भात आहे. यातील एकही प्रसग मूळ कथेत नाही. असे असूनही चित्रपट सुरू होऊन अर्धा तास उलटतो न उलटतो तो सत्यजित यानी मूळकथेच्या वाटचालीतले केवढे अतर कापून टाकले पाहा.

चारूलता व तिचा नवरा भूपती यांच्यात जी दरी उभी आहे, तिचे पहिले दर्शन आता प्रेक्षकाना घडले आहेच. या दरीची सपूर्ण कल्पना येण्यासाठी भूपतीची व्यक्तिरेखा स्पष्ट करणारी काही दृश्ये यानतर येतात. पत्नीची काय भूक आहे याची त्याला कल्पनाही असत नाही. जे साधेसोपे सहवासाचे सुख तिला हवे आहे, त्यात फारसे विचारकरण्यासारखे काही नाही असे तो समजतो. त्याला नशा आहे ती संपादक म्हणून गाजण्याची. मोठमोठी संपादकिये लिहावीत, 'सेटिनलपत्र' सत्याचा पाठपुरावा करणारे म्हणून गाजावे, निर्भीड पत्रकार म्हणून आपला बोलबाला व्हावा या नशेचे सुख त्याला आघळे करते. हे सर्व दाखवण्यासाठी भूपतीच्या तोंडी वारवार इंग्लिश राजकीय नेत्याचे उल्लेख यतात. To be outspoken does not meen to be disloyal असे मध्येच तो आवेशाने म्हणतो. तो आपल्या विश्वात गुग आहे. त्याची व बायकोची भेट जेवताना किंवा शयनगृहात काय ती पडते. परतु या अल्पभेटीत तिचे व त्याचे असे वेगळे, केवळ त्याचे असे विश्व जन्म पावू शकत नाही. याउलट अमल आणि चारू यांनी मात्र हा हा म्हणता आपले स्वतत्र विश्व कसे निर्माण केले हे एका सूचिक दृश्यात सत्यजित यानी

दाखवले आहे.

बंगल्याच्या मागल्या परसदारी मोठाले वृक्ष आहेत. वर दाट पर्णसंभार आहे. पायाखाली पाचोळ्याचा गालीचा आहे. एका फांदीला हिंदोळा आहे. अमलसाठी चारू एक चटई आणि कागद-शाई इत्यादि लिहिण्याचे साहित्य आणते. आपण हिंदोळ्यावर बसते. अमलला झोका देण्यास सांगते. अमल तिला मोठा झोका देतो व तो लिहिण्याकडे वळतो. चारूची इच्छा असते त्याने लिहावे व मग तिला वाचून दाखवावे. झोका उंच जातो, खाली येतो. उंच जातो, खाली येतो. या अनुषंगाने अमलची आकृती क्षणात तिच्या जवळ येते. तर क्षणात लांब जाते. झोक्याला गती दिलेली असते अमलने ! या एका दृश्यात सत्यजितानी किती गोष्टी साधल्या आहेत. चारूलतेचे मन अमलवर बसले आहे, याचा सुगावा या दृश्याने प्रेक्षकाला लागतो. मूळ कथेत हा प्रसंगही नाही.

**वासनेत रूपांतर**

अमलवर आपले गेलेले मन ही गोष्ट योग्य नाही हे चारूलतेला समजत असते. परंतु नकळत त्या दोघांचेच एक विश्व उभे राहते. वाचक म्हणून प्रशंसेसाठी, त्याच्या लहानसहान आवडी सांभाळणारी म्हणून चारूलता अमलला हवी असते. भूपतीकडून तिच्या नेमक्या याच अपेक्षा होत्या. परंतु भूपतीचे तिच्यावाचून काही अडतच नाही. यामुळे नवऱ्याचे व आपले एक निराळे जग असावे, प्रशंसेसाठी त्याने इतर कुठे जाऊ नये व त्याच्या लहानसहान गोष्टी आपल्याकरिता अडाव्यात, या संसारातल्या छोट्या छोट्या अपेक्षा चारूलतेच्याही असतात. भूपती त्या पुऱ्या करू शकत नाही आणि अमल मात्र तिच्या या सर्व अपेक्षा नकळत पुऱ्या करतो. चारूलतेला अमलच्या फाटलेल्या अंगरख्याला चार टाके घालून तो त्याच्या अंगावर फेकताना दाखवून सत्यजितानी तिची नेमकी भूक सांगितली आहे.

नवऱ्याने पुऱ्या करावयाच्या सर्व अपेक्षा अमल पुऱ्या करीत असताना नकळत चारूलतेच्या प्रेमात वासनेचा गर्द रंग मिसळला गेला तर त्यात आश्चर्य कोणते ?

प्रेमाची सख्खी बहीण, म्हणजे मत्सराची भावना. 'सरोरुह' मासिकात अमलचे लेख छापून येतात. तो कुणीतरी मोठा माणूस होऊ घातला आहे, हे घरात वावरणाऱ्या आडमुठ्या मंदाच्या ध्यानात येते. तिचा अमलकडे पाहण्याचा दृष्टिकोन पालटतो. अमलची प्रशंसेची भूक ही काही चारूलतेपुरती मर्यादित नसते. त्यामुळे तो तितक्याच उत्साहाने आता अधूनमधून मंदाशी हसतो बोलतो.

चारूलतेला हे सहन होत नाही. मंदापेक्षा आपण पुष्कळ निराळे आहोत, हे सिद्ध करण्याकरिता ती आता लेखनाचा आटापिटा करते. कागदच्या कागद फाडले जातात. अखेर बऱ्याच प्रयत्नानंतर ती कालीघाट हा निबंध लिहीत आहे व सरोरुह मासिकात तो छापून येत आहे.

हातात अंक घेऊन चारूलता अमलच्या खोलीत येते तेव्हा तो पाठमोरा लिहीत बसलेला असतो. दोन्ही हातानी तो अंक चारू त्याच्या डोक्यावर आदळते. तिला विजयाचे हसू फुटत असते. त्याच्या कौतुकाकरिता ती आतुर असते. अमल तिची नवी कर्तबगारी पाहून चकित होतो. तो अंक चाळीत असताना ती पान तयार करते व तो काही बोलू लागण्यापूर्वी ते पान त्याच्या तोंडात कोंबून ती त्याचे तोंड बंद करते. हे सर्व करीत असताना आपण त्याला पुन्हा जिंकले आहे, याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर ओसंडत असतो.

अमल म्हणतो, "हे मी दादाला दाखवितो. फार आनंद होईल त्याला."

चारूलतेचा सारा उत्साह एकदम मावळतो. उसने अवसान गळू लागते. भावनांचा कोंडमारा होऊन ती म्हणते, "नको! कुणाची खुषी नको आहे मला......"

हे सांगता सांगता ती एकदम रडू लागते. भावनावेगात ती अमलजवळ जाते व आपले मस्तक त्याच्या छातीवर ठेवून त्याला बिलगते. अमल स्तब्ध उभा असतो. त्याचे हात तिच्या अंगाभोवती पडत नाहीत.

मूळ कथेत हा प्रसंग नाही. छापून येण्यापूर्वीच चारूला आपले लिखाण त्याला दाखवण्याची इच्छा असते आणि तिला लाजही वाटत असते. परंतु या दृश्यातून चारूलतेची अमलवर कबजा मिळविण्याची जी ईर्षा होती ती व्यक्त झाली नसती. कारण तिचे लिखाण छापून आल्यानंतर तिचे वेगळेपण निर्विवादपणे सिद्ध होणार होते. म्हणून सत्यजितानी मूळ प्रसंगात सूक्ष्म बदल केला. चारूलता आपले लेखन छापून आल्यानंतर एका विलक्षण उन्मादात ते अमलला दाखवते. यामधून औत्सुक्य, स्त्रीसुलभ लज्जा आणि विजयाचा आनंद या तिन्ही भावनांचा त्रिवेणी संगम त्यांनी या सूक्ष्म बदलाने साधला.

**विश्वासघाताची जाणीव**

यापुढचा महत्त्वाचा बदल कथेत आढळतो तो उमापदच्या अफरातफरीच्या प्रकरणात. मूळ कथेत उमापद हा अफरातफर करतो, परंतु पळून जात नाही. तो व्यवस्थित हुज्जत घालून घर सोडतो. चित्रपटात सत्यजितानी काय बदल केलाय् तो पाहा—

भूपती आपल्या मित्रांबरोबर गाण्याच्या बैठकीत असतो. गाणे चालू असते. मध्येच उमापद उठून जातो. तिजोरीतील सर्व पैसे काढून घेतो. दुसऱ्या दिवशी पहाटे बायकोला घेऊन तो गावी जाणार असतो. गाणे संपल्यावर जमलेल्यांपैकी कुणीतरी चारूलतेच्या लेखाचा उल्लेख करतो व भूपतीचे अभिनंदन सुरू होते. आपल्या बायकोने काही चांगले लिहिले आहे याचा पत्ता तोपर्यंत भूपतीला नसतो. चारूचे लेखन एकदम छापून आल्याचा जो सूक्ष्म बदल सत्यजितांनी केला त्याचा फायदा पुन्हा या प्रसंगात घेतलेला आढळतो. चारूने आपल्याला ही गोष्ट सांगू नये याचा विषाद भूपतीला जाणवलाच नसेल का ? परंतु चारूचा नवरा म्हणून मित्र अभिनंदने करीत असताना काय वाईट चेहरा करता येतो थोडाच ?

पहाटे उमापद मंदासह जायला निघतो. अमल मंदाला विचारतो, "हे काय! निघाला कुठे ?" तेव्हा जाताजाता मंदा त्याला सांगते, 'आमचे इथे राहणे चारूलतेला कुठे पसंत आहे ?"

चारूलतेच्या मनात आपल्याविषयी आसक्ती आहे, आपण कळत न कळत या आसक्तीला उत्तेजन दिले आहे, याचा साक्षात्कार मंदाच्या डिवचण्याने अमलला होतो.

उमापद निघून गेल्यानंतर कागदवाल्याच्या दुकानात भूपती जातो व तिथे त्याला उमापदने कागदाच्या व्यवहारात बरीच अफरातफर केल्याचे लक्षात येते. विमनस्क मनाने तो घरी येतो. तिजोरी उघडून पाहतो. तिजोरी रिकामी असते. विषण्ण मनाने तो उमापदने केलेल्या विश्वासघाताचा विचार करीत डोके हातात धरून काळोखात बसतो.

अमल तेवढ्यात तेथे येतो. दुःखित मनाने उमापदने केलेला विश्वासघात भूपती त्याला सांगतो. अमलच्या हे लक्षात येते, की उमापदने भूपतीचे फक्त पैसेच नेले परंतु आपण मात्र त्याची पत्नी चारूलता हिलाच त्याच्यापासून दूर केली आहे, हा विश्वासघात उमापदाच्या विश्वासघातापेक्षा शतपटीने मोठा आहे.

त्याच दिवशी रात्री भूपतीच्या नावे एक चिठ्ठी ठेवून अमल निघून जातो.

मूळ कथेत चारूलतेचे आपल्यावर प्रेम आहे, त्यात वासनेचा गडद रंग मिसळू पाहत आहे, याचा थागपत्ता अमलला नाही. अमलला जो संशय येतो तो असा की मंदा व आपण परस्परावर अनुरक्त आहोत ह्या भीतीने चारूलतेने भूपतीकरवी मंदाची उचलबांगडी केली. यामुळे सांगून आलेल्या मुलीशी लग्नाला होकार देऊन तो विलायतेला निघून जातो.

सत्यजित यांनी हा केलेला महत्त्वाचा बदल मूळ कथेत बरीच ढवळाढवळ करणारा असूनही चारूलतेचे निषिद्ध प्रेम हा जो रवींद्रनाथांचा कथेचा विषय, त्याला यामुळे यत्किंचितही धक्का लागत नाही. या मोठ्या बदलामुळे अमलचे लग्न, त्याची विलायतवारी या सर्व कथाभागाची आवश्यकताच उरली नाही. अमलचे जाणे महत्त्वाचे नव्हते तर तो गेल्यानंतर, चारूलतेवर त्याचा जो परिणाम होतो, तो महत्त्वाचा होता. तेव्हा या मोठ्या बदलामुळे पटकथा तर अधिक सुटसुटीत झालीच व कथा अधिक गतिमान झाली.

## नष्टनीड, घर विस्कटले

अमल निघून जाताच चारूलतेवर विलक्षण आघात होतो. त्याने आपली उपेक्षा करावी याचे दुःख तिला जाळू लागते. तिने त्याच्यासाठी तयार केलेल्या वेलबुट्टीच्या सपाता ती उचलून दृष्टिआड करते व आपले पत्नीकर्तव्य पार पाडण्याचा चंग बांधते.

मूळकथेत भूपतीचे वृत्तपत्र बंद पडते. तो कर्जबाजारी होतो व वृत्तपत्राचा नाद सोडून संसारातले लहानसहान सोपेसोपे सुख शोधू लागतो. परंतु या सुखनिर्मितीची विद्या त्याला साधत नाही. तो हताश होतो, या सर्वांचे खूप मोठे चित्रण मूळ कथेत आहे.

चित्रपटात हा सर्व भाग सत्यजित यांनी फक्त एका दीर्घ दृश्यात संपविला आहे. भूपतीला चारूलतेचे दुःख आता समजले आहे, थोडी सुटी काढून (वर्तमानपत्र वगैरे काही बंद पडलेले नाही) तो तिला घेऊन एका समुद्रकिनाऱ्याच्या गावी जातो. समुद्रकिनाऱ्यावर दोघे बसली आहेत, असे दृश्य सुरू होते. समोरच्या सागराइतकीच विलक्षण खळबळ पत्नीधर्माच्या नियमानुसार उरात कोंडून चारूलता नवऱ्याशी बोलत आहे. वरून ती शांत आहे.

सुटी संपवून ती दोघे परत येतात, येऊन पाहतात तो अमलचे पत्र असते. त्यात तिलाही मजकूर असतो. त्याचे हस्ताक्षर व पत्र पाहताच तिचे कोंडलेले परंतु असहाय्य दुःख, उफाळून वर येते. तिचे मन तिला आवरता येत नाही. ती ओक्साबोक्शी रडू लागते. आपला नवरा बाजूला उभा आहे याचे भानही तिला राहत नाही. भूपती हादरतो. अमलवर आपल्या बायकोचे मन गेलेले आहे व आपल्यापुढेही तिला भावनांचे कढ आवरता येत नाहीत; येवढी आर्तता या आसक्तीत आहे हे लक्षात येताच त्याला समजते, की आपले घर आता कोसळले आहे, घरटे विस्कटले आहे. व्यभिचारी पत्नीपासून दूर जावे या विचाराने भूपती घर सोडतो.

मूळ कथेत ही सर्व घटना फार वेगवेगळ्या रीतीने घडते. त्या अनुषंगाचा सर्व भाग या पटकथेत नाही. मूळ कथेत भूपती जेव्हा घर सोडतो तेव्हा तो पत्नीला सांगतो, "तुला जेव्हा एकटे वाटेल तेव्हा मला पत्र लिही. मी परत येईन." म्हणजे भूपतीचे निघून जाणे हे अखेरचे न मानता रवींद्रनाथांनी त्याच्या परत येण्याची शक्यता ध्वनित करून ठेवलेली होती. कारण 'नष्टनीड' झाले म्हणून घर सोडणाऱ्या भूपतीने "आपण खऱ्या अर्थाने घरटे कधी बांधले होते का ?" या विचारासरशी आपली चूक उमगून मागे फिरणेच न्यायाचे झाले असते.

## अखेरचे दोन बोटे अंतर

सत्यजितांनी चित्रपटाची अखेर कशी केली आहे पाहा—

भूपती घराबाहेर पडतो. घोड्याच्या गाडीत बसून स्टेशनकडे तो जात असतो. मागे रेलून विषण्ण मनाने तो बसला आहे. डोळ्यातून अश्रूंची धार लागली आहे. चारूचे व आपले असे स्वतंत्र विश्व आपण निर्माणच केले नाही ही गोष्ट त्याला समजली आहे. त्याचे अश्रू दुःखापेक्षा पश्चात्तापाचे आहेत. तो खिशातून रुमाल काढतो. डोळे टिपण्यासाठी रुमालाची घडी वर येते. त्याचे लक्ष जाते त्यावर दोन वेलबुट्ट्या आहेत. त्यामध्ये त्याच्या नावाचे आद्याक्षर आहे. त्याचा हात क्षणभर थबकतो. त्याच्या लक्षात येते, जी चारू आपल्यासाठी रुमालावर अक्षरे विणीत वेळ काढीत असे, तिचे आपल्यावर प्रेम नव्हते असे कसे म्हणता येईल ? ती आपल्यावर प्रेमच करीत होती. आपण मात्र आपल्या नशेत होतो. चूक आपलीही आहे तिला टाकून आपण दुसरी चूक करीत आहोत.

तो परत फिरतो. अजून उंबऱ्यातच चारू उभी असते. ती हात पुढे करते. तो हात पुढे करतो. हात जवळ येतात आणि काष्ठवत होतात. हे अखेरचे दोन बोटे अंतर तोडावे की तोडू नये ? अखेर हेच अंतर महत्त्वाचे असते. खूप जवळ आलो आणि हे शेवटचे अगुळभर अंतर तुटले नाही तर?...

चित्रपट इथेच संपतो.

सत्यजितांनी केलेली चित्रपटाची अखेर रवींद्रनाथांच्या कथेच्या शेवटाशी अजीबात विसंगत नाही. रवींद्रनाथांनी जे ध्वनित केले होते ते फक्त सत्यजित यांनी अधिक स्पष्ट केले. काही कुत्सित टीकाकारांनी म्हटल्याप्रमाणे ही प्रेक्षकांशी केलेली बाजारी तडजोड निश्चितच नाही. सुरुवातीला रुमालवर विणल्या गेलेल्या दोन वेलबुट्या आणि त्यातील चारूलतेच्या नवऱ्याचे इंग्रजी आद्याक्षर याचा अखेरीस जो अत्यंत कल्पकतेने उपयोग केला आहे, तो पाहून सत्यजिताच्या कलेविषयी प्रेक्षकाच्या मनात उदंड आदर निर्माण होतो.

चित्रपटाची मूळ कथा आणि त्यातून निर्माण झालेली ही पटकथा यात अगदी जवळचे नाते आहे. परंतु पटकथेची निर्मिती ही सत्यजित यांची एक स्वतंत्र कलाकृतीच आहे; हे सहज लक्षात येईल. खेद याचाच होतो, की बंगाली भाषेच्या अडचणीमुळे या कलाकृतीचा संपूर्ण आस्वाद आम्हाला पुरेसा घेता आला नाही.

मात्र एक गोष्ट निश्चित की 'नष्टनीड' म्हणजे चारूलता नव्हे. चारूलतेत रवींद्रनाथ आहेत आणि शिवाय सत्यजितही !

● ● ●

# सवलतीच्या दोन आकर्षक योजनांची

## लोकाग्रहास्तव केलेली मुदतवाढ



# राजा शिवछत्रपती

भाग एक ते दहा

लेखक : ब. मो. पुरंदरे

प्रसिद्धी : डिसेंबर १९६४

दीड हजार पृष्ठांच्या ज्या साधार पण ललितरम्य शिवचरित्राने मराठी वाचकाला आजवर एक अपूर्व मोहिनी घातली,

जो ग्रंथ प्रत्येक मराठी भाषिकाच्या घरी असावा यासाठी आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी अव्वल आणि मातब्बर मंडळी लेखद्वारा, पत्रद्वारा, संभाषणांतून वा भाषणांतून आपला अमोल शब्द वेचीत आहेत,

तो हा ग्रंथ सर्वसामान्य परिस्थितीतील मराठी माणसाला विकत घेऊन संग्रही ठेवता यावा म्हणून —**राजहंस प्रकाशन संस्था**

सवलतीच्या पुढील दोन योजना जाहीर करीत आहे.

**१ : राजहंस प्रकाशन संस्थेकडे पाच वर्षांसाठी शंभर रुपयांची ठेव ठेवणारास हे संपूर्ण शिवचरित्र व्याजाच्या मोबदल्यात विनामूल्य घरपोच दिले जाईल. पाच वर्षांनंतर ठेव परत करण्यात येईल. यासंबंधी अधिक तपशील हवा असल्यास पत्रकाची मागणी संस्थेकडे करावी.**

**२ : या तृतीय आवृत्तीच्या संपूर्ण शिवचरित्र संचाची किंमत प्रसिद्धीनंतर रुपये पस्तीस राहील. १५ नोव्हेंबर १९६४ पर्यंत रुपये पंचवीस फक्त पाठवून प्रसिद्धिपूर्व ग्राहक होता येईल.**

**[ संच पोस्टाने हवा असेल तर रजि. पोस्टखर्चासाठी अडीच रुपये अधिक पाठविणे. ]**

ठेवीची वा प्रसिद्धिपूर्व ग्राहकाची रक्कम ' राजहंस प्रकाशन ' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

चेक असल्यास शक्यतो पुणे-मुंबई येथील बँकेवरचा पाठवावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास वटणावळ ७५ न. पै. अधिक पाठवावेत.

चित्रकार दीनानाथ दलालांची शंभरहून अधिक रेखाचित्रे व आकर्षक मुखपृष्ठे, ऐतिहासिक स्थळांची व व्यक्तींची छायाचित्रे, पांढरा शुभ्र कागद, मोहरेदार छपाई, टिकाऊ बांधणी—या व इतर वैशिष्ट्यांनी युक्त असल्याने, एका सुबक पेटीतून वाचकांच्या भेटीस येणारा हा संच म्हणजे प्रत्येक कुटुंबाचे, प्रत्येक ग्रंथालयाचे एक भूषणच ठरणार आहे.

## राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

# नवरदेव

वा. म. पात्रीकर

## नवरदेव आले —

[ लग्नमंडपाच्या प्रवेशद्वारासमोरील भाग. प्रवेशद्वाराच्या आजूबाजूला रंगविलेल्या कनाती लावल्या असून प्रवेशभागी *तोरण व तोरणात नारळे वगैरे* लटकविलेली आहेत. लांबून बँडचे सूर ऐकू येतात. बँडच्या जवळजवळ येणाऱ्या आवाजावरून नवरदेव येत असल्याचे सूचित व्हावे. समोरून आतला मंडप अंधुक दिसतो; ओवाळण्याचे तबक *बाजूला ठेवून स्थूल* देहाच्या विमलाबाई थकून खालीच बसल्या आहेत. सुहास आणि सिंधू ह्या समवयस्क मुली नट्टापट्टा करून नवरदेवाच्या येण्याची वाट पाहात उभ्या आहेत. बँडचे सूर ऐकून– ]

सिंधू : (केसावरून हात फिरवीत, ते नीट करीत) आलेत एकदाचे.

सुहास : (भानावर येत. साडीचा पदर नीट करीत) कोण ? कुठे ?

सिंधू : नवरदेव. इथे. बँड नाही ऐकू येत?

सुहास : *अगबाई खरंच !* (हातातील तबक देत) येवढं धर हं. मी आत्ता येते. (आत पळते.)

*विमलाबाई . इथला नवरामुलगा नाही हा.*

सिंधू : कशावरून ?

विमलाबाई : इतकी लग्न होत आहेत गावात, इथल्या इथेच तर तीन आहेत.

सिंधू : आवाज तर इकडेच येतोय्, शिवाय वेळही झाली.

विमलाबाई : (अजून बसलेल्याच) ते खरं ग, पण बँड चांगल्यापैकी दिसतो म्हणून शंका वाटते. (किंचित थाबून) पण एखाद्या वेळेस सुटायचे देखील पैसे त्याच्या हातून. काय नेम ! बघ बरं, बंडोपतच असतील तर उठते.

[ सिंधू एका बाजूला जाऊन रस्त्याकडे पाहून येते. बँड एका मोडीवर वळण घेऊन दुसरीकडेच दूर दूर निघून जातो ]

सिंधू : तुम्ही म्हणालात तेच खरं. कोठारीकडचा *नवरामुलगा आहे.*

विमलाबाई : (आनंदून) म्हटलं ना ! अग शितावरून तांदूळ ओळखावा. उगीच उठ*बस झाली असती.*

[ येवढ्यात वाजंत्रीवाल्यानी वाजविलेल्या 'संगीताचे' वेडेवाकडे कर्कश्य सूर ऐकू येऊ लागतात. ह्या कल्लोष मोहरमचे वाघ नाचतात त्या धर्तीचा. ]


विमलाबाई : (ह्या 'धनक् धनका धनक् तीती' ऐकून) आता मात्र आलेत हं ! उठा आता.[ कमरेवर हात ठेवून कष्टाने उठतात. ]

सिंधू : ( धांदल उडाल्यागत ) सुहास, ए सुहास– अगबाई, ये ना लौकर. ते आलेत. [ सुहास घाईघाईने येते. तिच्या तोडाला भुतासारखे पावडर फासलेले. सिंधू ते निरखून पाहाते. ]

सिंधू : काय ग ! कशाला आत गेली होतीस ?

*सुहास : पाणी प्यायला. तहान लागली होती.*

सिंधू : (हसून) तोडाला पावडर लागली



## — ल ग्ना ला  च ला

आहे. नीट पुस.

सुहास : (वरमून, शरमून) इश्श्य, मी पावडर लावायला थोडीच आत गेले होते !

सिंधू : पण त्याकरातही गेलीस तर बिघडलं कुठे ? कसं बोल्ड असावं माणसानी.

विमलाबाई : माणसांनी. पण ती बाई आहे.

सिंधू : म्हणून काय झालं. हे पाहा मी पण जाऊन येते.

[ जाते. पाठोपाठ विमलाबाईही जाऊ लागतात. ]

सुहास : विमलाबाई, तुम्ही कुठे जाता–?

विमलाबाई : (चाचरत) पाणी प्यायला... तहान लागली.

सुहास : (हसून) थांबा थांबा. ह्या किल्ल्या घ्या. पावडरचा डबा कपाटात आहे.

[ विमलाबाई परततात. कसनुसं हसून सुहासजवळून किल्ल्या घेतात व आत जातात. सुहासला एकटी बघून बंडू येतो, तिच्याशी बातचीत करायला. ]

बंडू : (चोरटेपणाने) हं ! हे घे. ठेव.

सुहास : (इकडेतिकडे बघून, सावधगिरीने त्याच्या हातून पत्राची घडी घेत.) काय आहे रे ?

बंडू : प्रेमपत्र प्रिये...

सुहास : (पत्राची घडी उकलीत, ती चारपाच पाने पाहून) बापरे ! हे कसलं प्रेमपत्र ! हे तर वर्तमानपत्र ! परवा दिलेलं अजून वाचायचंच् आहे.

बंडू : अद्याप वाचलंच नाही ?

सुहास : सुरुवात केलीय्.

बंडू : कसं वाटलं ?

सुहास : अक्षर पण गचाळ आहे तुझं.

बंडू : (नर्व्हस होऊन) प्रिये...

[ येवढ्यात बाहेरून हाका ऐकू येतात. बंड्या ऽ ए बंड्या ऽ ]

सुहास : (पत्र पर्समधे टाकीत) तुझे मामा आलेत वाटतं.

बंडू : मामा नसतील. ते व्हिटॅमिनयुक्त बोलतात.

सुहास : कुणी का असेनात. तू जात का नाहीस ?

बंडू : भग पण, इथे लग्नात वयाच्या सहाव्या वर्षापासून तर सव्विसाव्या वर्षापर्यंतचे डझनभर बंडूलोक आहेत. हे संबोधन माझंच कशावरून ?

[ मागून " बंड्या, ए गधड्या ऽ कान फुटलेत का ? " ]

बंडू : मामाच वाटतं. वाक्यांत व्हिटॅमिन सापडलं.

सुहास : कुठलं ?

बंडू : व्हिटॅमिन् 'जी.' गधड्या.

सुहास : इश्श् ! ते तर अॅड्जेक्टिव्ह आहे. क्वालिफाईंग द नाऊन बंड्या.

[ बाहेरून एक मुलगा धावत येतो. ]

मुलगा : अहो ते तुम्हांला बोलावीत आहेत, टांग्याचे पैसे द्यायला.

बंडू : करेक्ट. गृहस्थाचा दुसरा गुणधर्म

सापडला. मामाच ते.

[हातात पेटी आणि वळकटी घेऊन मामा प्रवेशतात.]

मामा : (चिडून) मघापासून शंखनाद करीत होतो—

बडू : मी आत होतो.

मामा : इथे गप्पा हाणीत होतास ! पाहिल्याशिवायच बोंबलत होतो का ?

बंडू : बऽर. पाहून झाल ?

मामा : शेवटी मलाच सामान उचलावं लागलं. तुम्हा तरुणाचा उपयोग काय रे ?

बडू : माझ्या तारुण्याचा उपयोग तुम्हाला काय *मामा ? (सुहासला) नाही का ग ?*

सुहास : (अभावितपणे) होय ना.

[हाती टिफिन्‌चा डबा घेऊन मामाची मुलगी शोभा टांग्यातून उतरून येते.]

बडू : आहहो ! प्रसगाला शोभा पण आली काय ? मला वाटलं मामाच आले.

शोभा : काय बडोबा, परीक्षेला बसलास ना ?

बंडू : " प्रथमग्रासे मक्षिकापातः "

शोभा : बसला नाही वाटतं !

बंडू : छ्या, बसतात बायका आणि निरुद्योगी माणसं. आम्हाला सर्व्हिस लागली आता. बूचअली, बाटलीअली अँड सोडावाला कंपनीत. मस्त पगार, झकास इम्प्रेशन—

शोभा : (तिकडे दुर्लक्ष करून) बाबा, तो टांगेवाला कोकलतोय्‌ ना.

[हे ऐकल्यावर बडू लगेच पेटी आणि वळकटी घेऊन आत पसार होऊ पाहातो पण मामा चपळाईने त्याचा शर्ट पकडतात.]

मामा : अरे थाब ! जातोस कुठे ?

बडू : खरच. आता मार्ग कोठला ?

मामा : सर्व्हिस लागली ना तुला ? मग मोड दे एक रुपयाची. (बंडूने नाही म्हणायच्या आतच) आहे तुझ्याजवळ (पाकीट काढतात).

बडू : (पाकिटातली चिल्लर मोजून) चौदाच आणे आहेत.

*मामा : चालतील. टांगेवाल्याला बारा* आणेच द्यायचे आहेत.

बडू : बरं. रुपया आणा इकडे.

मामा : अरे मला वाटल असेल एखादा रुपया सुटा. पण दहाचीच नोट आहे. जा टांगेवाल्याला बारा आणे देऊन ये. (आत जाऊ लागतात)

बडू : थांबा —

मामा : काय ?

बडू : मी दहाची बारीक आणून देतो. कामात येईल तुमच्या.

[नाखुषीने मामा दहाचा पत्ता देतात खुषीने तो घेऊन बंडू बाहेर जातो. वाजंत्रीचा आवाज फार निकट येतो. पुढे वाजंत्रीवाले, मागे घोड्याचा लगाम धरून घोडेवाला, घोड्याच्या पाठीवर नवरदेव व पाठोपाठ बायाचा घोळका येतो. आता मरेल की मग मरेल अशा स्वरूपाचा अस्थिपजर हा घोडा. शेपूट प्रेक्षकाकडे बाया आत जातात. आतून धावत शास्त्रीबुवा येतात.]

शास्त्रीबुवा : *(घोडेवाल्याला)* हां हां, तिकडे नाही. पूर्वेकडे तोंड पाहिजे नवरदेवाचं.

घोडेवाला : म्हंजे घोड्याच.

शास्त्रीबुवा : (रागावून) हो हो, फिरव घोड. [नवरदेव लगामीला हिसका देतो. घोडा विंगकडे तोड करून उभा राहातो.]

शास्त्रीबुवा : (नवरदेवाला) हा हां बडोपत " करीन ती पूर्व " म्हणून कस चालेल. (प्रेक्षकांकडे बोट दाखवीत घोडेवाल्यास) पूर्व इकडे आहे. फिरव घोड.

घोडेवाला : (घोड्याच तोड प्रेक्षकाकडे करीत) घोड घोड काय म्हता साहेब. घोडा म्हना की !

*शास्त्रीबुवा : शामकर्ण की नाही तो !* टक्के मोजून घेशील आणि घोड हे असं आणल मरतुकडं. कुणा गाढवान ठरवल रे हे घोडं ?

घोडेवाला : (शास्त्रीबुवाकडे पाहात आणि अभावितपणे घोड्याऐवजी घोड्यावरील नवरदेवाकडे अगुलिनिर्देश करीत) जनावर थोड पतल आहे साहेब, पन जातिवत आहे ह्योचा बाप रेसमधी धावत हुता आन्‌ माय सर्कशीत व्हती कामाला.

शास्त्रीबुवा : अरेरे, येवढ्या घरदाज आईबापाच लेकरू ! त्याचा सत्यानाश केला तू.

घोडेवाला : आता थोडस झटकल आहे इकतच—

शास्त्रीबुवा : अरे सुदामदेव आहे सुदामदेव—

घोडेवाला : (चिडून) आसू द्या साहेब. सुदामदेव जरी असला तरी असे छप्पन नवरदेव बसवीन पाठीवर. बोला, ठीक आहे त्वाड.

शास्त्रीबुवा : कोणाच ?

घोडेवाला : आनखी कोनाचं. घोड्याच !

शास्त्रीबुवा : घोड्याचं ठीक आहे

घोडेवाला : आनि शेपूट. ते कुनकडे ठिवू.

शास्त्रीबुवा : (हे सहन न होऊन) अबे चूऽप बकरीच्या ! (संतापाने थरथरत) ह्या... ह्या तुझ्या अश्वाची मातु:श्री सर्कशीत होती ना ! मग कर दक्षिणेकडे पुच्छ आणि पूर्वेकडे मुखचद्रमा. दे ना उत्तर.

[सारेजण हसू दाबतात. सुहास आणि सिंधू पुढे होऊन नवऱ्या मुलाला ओवाळतात. टाचा उच करून विमलाबाईही ओवाळायला जातात पण त्याचा हात पुरत नाही, कारण नवरदेव पूर्वीप्रमाणे वाकत नाही.]

*विमलाबाई : अहो खाली उतरा ना !*

नवरदेव : नाही उतरणार.

विमलाबाई : मग वाका तरी !

[नवरदेव थोडा वाकतो पण तरीही त्याच्या कपाळापर्यंत त्याचे हात पोचत नाहीत.]

विमलाबाई : अहो वाका ना आणखी.

नवरदेव : ह्यापेक्षा जास्त वाकता येणार नाही.

विमलाबाई : (हसून) काय हो, वरती हवाबिवा कशी काय आहे. गरम तर नाही ?

सुहास : (हसून) आता तुम्हीच चढा घोड्यावर.

शास्त्रीबुवा : (संधी साधून, घोडे*वाल्याला) काय* रे खाचरा, *मग राहिल का* कंवरड साबूत तुझ्या घोड्याच ? दे उत्तर.

घोडेवाला : (खाली मान घालून) नाही साहेब.

[चिडलेल्या विमलाबाई कसेबसे ओवाळणे आटोपून घेतात.]

शास्त्रीबुवा : हां बंडोपत, उतरा आता खाली.

वाजंत्रीवाला : (लगेच पुढे होऊन) भटजीबुवा, ब्याड वाजवू का ?

शास्त्रीबुवा : (गरम होऊन) भटजी कुणाला म्हणतो रे भाडचा ! शास्त्रीबुवा म्हण.

*वाजत्रीवाला : चुकलो. ब्याड वाजवू का—* शा...

शास्त्रीबुवा : शास्त्रीबुवा पूर्ण म्हण.

वाजत्रीवाला : ब्याड वाजवू का शा स्त्रीबुवा.

शास्त्रीबुवा : एकही गाण धड नीट वाजवता येत नाही तर हातातल्या बासऱ्या फेकून का देत नाही रे कोवडीच्यांनो !

वाजंत्रीवाला : बासरी नाही, सनई आहे शास्त्रीबुवा ही.

शास्त्रीबुवा : ती असेल रे सनई, पण ती आहे तुझ्याजवळ म्हणून सनईवाला म्हणू काय तुला ?

वाजत्रीवाला : सगरे बँडमास्तर म्हणतेत. तुमी बी तेच म्हणा. वाजवू का व्याड ?

शास्त्रीबुवा : अरे व्याड व्याड काय करतो ? खत्रूड वाजत्रीवाला तू. मेहेनत करावी लागते वाजवणं शिकायला, तोड वाजवून नाही होत. वाजत्री बडवता येत नाही घड, म्हणे बँड वाजवू काय ? मागाडा लेकाचा–

[ येवढयात शोभा आतून येते. केस मोकळे सोडलेले. पाठोपाठ मामाही येतात. वाजत्री-वाला सनई घेऊन ड्रमवाल्याच्या शेजारी जाऊन बसतो. त्याच्या विडीने स्वतःचे थोटूक शिलगावतो ]

शोभा : शास्त्रीबुवा, तुम्हाला आत बोला-वलय् मेव्यासाहेबानी.

[ शास्त्रीबुवा आत जाऊ लागतात तेव्हा सनईवाला सनई फुकून एक दोन विचित्र स्वर सनईतून काढतो. ]

शास्त्रीबुवा : (रागाने परतून) अबे चूऽप कोवडीच्या.

[ ते पुन्हा: आत जाऊ लागतात, तेव्हा ड्रम-वाला ड्रमवर टिपरा ठोकून 'ढम्म्ऽ' असा असा आवाज करतो. उगीचच. ]

मामा : (नवरदेवाकडे पाहून) अरे ह्या गरिवाला का असं ताटकळत ठेवलं ? अन् शोभे, केस असे मोकळे सोडण शोभा देत नाहीत.

शोभा : मी रिबिन विसरले घरीच. पैसे द्या मला रिबिना आणायला.

मामा : दहाची नोट घेऊन बड्र गेला तो आलाच नाही अजून. (इकडे तिकडे पाहातात. कुणी योग्य माणूस दिसत नाही म्हणून नवर-देवालाच) जावईबापू–

नवरदेव : काय देवा !

मामा . तुमच्याजवळ काही पैसे आहेत का हो.

नवरदेव : किती ?

मामा · काय ग शोभे, दोनच वेण्या घाल-तेस ना तू ?

शोभा : वेण्या दोनच घालते पण निळया, आकाशी, लेमन आणि अबोली रंगाच्या साड्यांना मॅचिंग रिबिना हव्यात, शिवाय घरी वापरायला दोन जोड.

मामा : (नवरदेवाला) साडेतीन चार रुपये लागतील फक्त. असतील ?

नवरदेव : (चेहरा आणखी . पाडून) आहेत. पण इकडच्या खिशात आहे कोटाच्या. मी लगामावरचा हात सोडला तर घोडं बिचकेल.

घोडेवाला : नाही बिचकणार. मी आहे.

नवरदेव : पण मला भीती वाटते.

मामा : तुम्ही राहा तसेच. मी काढून घेतो.

[ घोडयाला फेरी मारून नवरदेवाच्या 'त्या' बाजूला जातो व त्याच्या कोटाला झोंबतो नवरदेव रडवेला होतो. येवढयात बड्र येतो. ]

बड्र : थावा–

[ सगळे दचकून पहातात, मामाचा चेहरा खलास झालेला. बड्रच्या हाती रुमालात बाघलेले काहीसे पाहून. ]

बंड्र : मी चिल्लर आणली आहे. दहा रुपयाचे एक हजार नये पैसे. (गठडी मामा-जवळ देत) मोजून घ्या तिथे बसून. जेवणाची वेळ झाली की येईन मी बोलवायला.

[ हताश मामा ओटीवर बसतात व एक एक पैसा मोजू लागतात. ]

शोभा . (मामाजवळ जात) द्या ना पैसे! मी रिबिना आणते.

मामा : (वसकन ओरडून) चूऽप. विना रिबिना वेण्या घालता येत नाही की काय ? तुझ्या आईच्या वेळेस कुठल्या आल्या होत्या रिबिना ? हा एक आणा घे आणि आगूळ घेऊन ये. जाऽ.

[ एक आणा घेऊन चिमणीच्या तोंडाने शोभा दुकानाकडे जाऊ लागते, पण लगेच परतून ]

शोभा : बंड्र, मघाशी तुझ्या नोकरीबद्दल काय म्हणत होतास रे तू ?

बड्र : (उत्साहाने) अग नोकरी काय, ऑफिसरकी आहे नुसती. बोतल अलीचं माझ्यावाचून पान हलत नाही, बूचअली माझ्या अवतीभवती घोटाळत असतो आणि सोडावाला माझा पिच्छा सोडायला तयार नसतो. कंपनीचे हे तीन डायरेक्टर्स बोतलअली, बूचअली अॅन्ड सोडेवाला असे बेहद्द खूष आहेत माझ्यावर. पगार ? तोही थोडाथोडका नाही. एकशे पासष्ट रुपये देतात पूर्ण. शिवाय वर्षाला वाढ दीड रुपयाची. ग्रॅज्युएट्सना तरी कुठे मिळतात इतके पैसे आज ? मी म्हणजे त्याना–

शोभा : (त्याच्या उत्साहावर पाणी पडावे ह्या हेतूने) पुरे झाल रे तुझं कौतुक. ही काय वेळ आहे हे वर्णन करण्याची ? पुन्हा: ऐकीन केव्हातरी.

[ निघून जाते. बड्र चिडतो. पैसा पैसा मोजणारे मामा बड्रकडे बघून हसतात.

घोडेवाला : अरे मेरेकू कबतक खडा रखेंगे ? (नवरदेवाकडे बोट दाखवून) और इनकू कबतक टाँगके रखोगे ?

[ नवरदेव चुळबुळतो. आतून शास्त्रीबुवा येतात. ]

नवरदेव : अरे अजून तुम्ही घोडयाच्या पाठीवरच का ? उतरा ना आता जगाच्या पाठीवर.

नवरदेव · नाही उतरणार.

शास्त्रीबुवा : नाही उतरणार, का बुवा ?

नवरदेव : मी नाही सागणार.

शास्त्रीबुवा : (ओरडून) अहो नानाजी, अहो नानीबाई ! धावा –

[ आतून नानाजी – वघूपिते धावत येतात. ]

नानाजी : (घाबरून) शास्त्रीबुवा, काय झालं ?

शास्त्रीबुवा : नानाजी, नवरदेव कोपला.

नानाजी : आँ ? म्हणजे झाल काय ?

शास्त्रीबुवा : घोडा सोडायला तयार नाहीत.

नानाजी : जावईबापू, घोड आवडल का ?

घोडेवाला : पन् मी इकनार नाही.

नानाजी : तू चूप रे ! जावईबापू, आव-डल का घोड ?

नवरदेव : नाही.

नानाजी : मग झाल काय ?

नवरदेव · ते सागता येणार नाही.

नानाजी : सागा तर जावईबापू ! असं काय करता ?

बड्र : अहो नानाजी, 'काही पाहिजे का ?' अस विचारा म्हणजे खुलतील.

नानाजी : (जुनेच पालुपद) जावई झालं काय ?

[ "मी सागते काय झाल" असे म्हणत एक सोवळी आजीबाई आतून येते. कवर वाकलेली, डोळयावर ऐनक, डोक्यावर पदर

असा थाट. तिच्याकडे साऱ्यांचे लक्ष केंद्रित झाल्यावर ].

आजीबाई :(नानाजींना) सागू काय झाल?

नानाजी : क् काय ?

आजीबाई : (एक हात कमरेवर, दुसऱ्या हाताने ओवाळीत) हीच का रीत मुलाकडच्यांशी वागण्याची तुमची ? परवाला मला गुरुवार होता, काल चतुर्थी झाली. आज मला शनिवार आहे. माझ्या फराळाची केली कुणी चौकशी ? म्हातारी उपाशी तळमळत होती अन् तुमची जेवणं उठत होती. मी मेले तर तुमच काय जाणार, पण वामनाची माया माझ्यावर. (नवरदेवाकडे पाहत) जाऊ दे बेटा वामना. राहीन मी उपाशी. माझ्यासाठी तू नको लग्नात विघ्न आणू, येवढी माया करतोस तेवढंच पुरे.

नवरदेव : (चिडून) ही म्हातारी कोण आहे ? हिला मी ओळखतही नाही.

आजीबाई : (चमकून) वामन्या, मेल्या मला ओळखत नाही ? मी बनूमावशी—बानाबाकोडचाची.

नवरदेव : मला कुणी मावशीबिवशी नाही. आणि सागून ठेवतो, मला वामन म्हणू नका.

शास्त्रीबुवा : आजी, कुठल्या लग्नाला आल्यात तुम्ही ?

आजीबाई : (भावावून) कुळकर्ण्यांकडच्या.

शास्त्रीबुवा : मग चुकल्या आजी तुम्ही. ते लग्न तिथे आहे. "गृहस्थी मंगल कार्यालयात."

आजीबाई : (केविलवाणी होऊन) चुकली बापा. दोन दिवस पोटात काही नाही. डोळ्यांनी बरोबर दिसत नाही. गाव पण नवखं. वामनानी पैसे दिले म्हणून साबुदाणा आणायला बाहेर पडली तर इथे येऊन पडली मुताडखान्यात— [ जाऊ लागते. ]

मामा : ( पैसे मोजणे थाववून ) थांबा आजी. आत चलून फराळ करून घ्या, मग मी पोचवून देईन.

[ आजीचा हात धरून आत घेऊन जातात ]

नानाजी : (जुनच पालुपद) बोला जावईबापू, काय झालं ?

बडू : अजी नाही काजी नानाजी. काय पाहिजे तेवढं विचारा—अंगठी ?

नवरदेव : नाही.

बडू : घड्याळ ?

नवरदेव : अ हं.

बडू : सायकल ?

नवरदेव : छट्.

बडू : (चिडून) हे घोड मिळणार नाही. (हताश होऊन नानाजींना) नानाजी, विचारा, रेडियो ... सोफासेट... मोटरसायकल. अहो जाता कुठे ?

नानाजी : (आत जात) हिचा सल्ला घेतो.

घोडेवाला : (बडूला) समजावाना साहेब ! तुमचे मित्र आहेत.

बडू : अडलय् माझ घोडं.

घोडेवाला . पण माझ घोडं अडलय् ना साहेब ! दुसऱ्या दुल्याला न्यायचा टाइम झाला. आतून मुलाची आई येते. मध्ये केव्हातरी नानाजी पण येतात. ]

मुलाची आई : (घोडेवाल्याला) मारणार तर नाही बाबा ! पक्क धरून ठेव. (मुलाला उद्देशून) उतर ना बडूनाना ! शहाणा ना तू ?

नवरदेव : आमी नाही उतरणार.

मुलाची आई : हे काय बंडूनाना ? मार उडी.

नवरदेव : नाही उतरणार.

बडू : (आवाज चढवून) बड्या, उतर खाली.

नवरदेव : आवाज चढवू नको. बिचकेल घोडं.

नानाजी : उतराना बडोपत.

नवरदेव : नाही. उतरणार नाही इतक्यात.

मुलाची आई : रस्त्यातून आणखी फिरवून आणायचं का तुला ?

नवरदेव : नाही ! नाही !! नाही !!!

घोडेवाला : नानाजी, माहा टाइम झाला. मज जाऊ द्या.

नानाजी : तू पाहातोच आहेस बाबा. काय ग्रहदशा फिरली देवास ठाऊक !

बडू : आणखी नवरदेवास ठाऊक ?

नानाजी : (घोडेवाल्याला) आता तूच साग, मी काय करू ?

घोडेवाला : हूंटर आना—

नानाजी : अस नको बोलू रे बाबा !

घोडेवाला : आजी, घोड्यासाठी म्हतो मी. घोड्यास बदडलं की आत्ता पटकीन नवरदेवास—

मुलाची आई : असं नको करू रे बाबा.

घोडेवाला : ठीक मग. जातो मीच.

मुलाची आई : लेकराला घोड्यावर एकट सोडून ?

घोडेवाला : घोड्याला सोडून जाऊ अन् बाकीच्या दुल्यांना माझ्या पाठीवर बसवू का कडेवर घेऊ ? मी घोडं बी नेनार आन् तुमच्या लेकरास बी नेनार.

मुलाची आई : (रडकुडीला येऊन) कुठे ?

घोडेवाला : लाब नाई. येथल्या चौरस्त्यावर. तेथ असं घोड नाचवतो की बास्. हा चल रे बेटा. क्च् (घोडा वळवू लागतो)

नवरदेव : (घाबरून) अरे थाब थाब !

घोडेवाला : उतरता ?

नवरदेव : (रडक्या सुरात) कसा उतरू ?

घोडेवाला : घात्तिच्या ! तेला भीत होता ? ठेवा इथे पाय.

नवरदेव : नाही ठेवणार. हे तुझं घोड आहे का मोर ?

घोडेवाला : काऊन बा ?

नवरदेव : रस्त्यानी किती नाचत होता !

घोडेवाला : नाही नाचायला ते काय टांग्याचं घोडं आहे ?

नवरदेव : पण थय्थय् नाचायला तो काय मोहरमचा वाघ आहे ? असा धागडधिंगा नाचायचं आणि ते पण भरचौरस्त्यात?

घोडेवाला : अजि कथ्थाक डास व्हय तो !

नवरदेव : अरे, पण माझी किती पचाईत झाली. फुटबॉलसारखा खालीवर उडत होतो सारखा.

घोडेवाला : ती चूक माही नाही साह्येब. वाजत्री टापात होती. त्येंनी कथ्थाक वाजिवला. घोड्यानं राग वरखला आन् जनावर आल रगात. तस पाहाता ह्या रेटात घोड कथ्थक नाचत नाई.

नवरदेव : अरे पण माझी आफत् झाली ना !

घोडेवाला : काय झालं ?

नवरदेव : अरे घोटाळा झाला.

घोडेवाला : अजि सागून तर !

नवरदेव : कस सागू ? अरे ह्या कथ्थकात माझ धू धोतर सुटलं.

| | |
|---|---|
| सुहास : | ईऽऽ |
| सिंधू : | आई गऽ |
| बंडू : | बापरे ! |
| शास्त्रीबुवा : | राम ! राम !! राम !! |

घोडेवाला : (फक्कन् हसून) अ र्‌ र्‌ र्‌ रा राऽ...

[ केविलवाण्या नजरेने नवरदेव सगळ्यांकडे पाहातो. मग कोपऱ्यात नजर स्थिरावून पडदेवाल्याला सतापून म्हणतो—'एऽवैह्यताडा! आता पडदा पाड ना ? आणखी शोमा...' ]

**पडदा पडतो.**

● ● ●



बकरं बहुधा झोपी गेलं असावं. बाबूनं त्याच्याकडे धोंडा फेकला. नेम बरोबर लागला. बकरं बेंबटायला लागलं आणि आम्ही वाट पाहायला लागलो—

# आणि वाघ आलाच नाही!

गो पा ल नी ल क ण्ठ दा ण्डे क र

लिहून लिहून कंटाळलो होतो, मी आणि मोहन दोघेही. काही बदल हवा होता नित्य-क्रमात. गडावर फिरणं नित्याचंच झालं होतं. उन्हाळ्याचे दिवस. संध्याकाळी पुणे दर-वाजाच्या बुरुजावर जाऊन टुकत बसावं. कुणी खालून चढतंय् का ? कुणी गाडीतून उत-रतंय् का ? कितीजण आहेत ? बोजे किती आहेत ? असं मोजणं गमतीचं असे. तेवढाच विरंगुळा. त्या बुरुजावरून थेट खडकवासल्या-पर्यंतचं सगळं लख्ख दिसे.

एके दिवशी आमच्याबरोबर गडावरला बाबू येऊन बसला. म्हटलं,

" का बाबू, आज विशेष ? "

" काई न्हाई ! उगा ! "

" छे रे बाबा ! तू उगीच कुठला येऊन बसायला ? कुणाची वर्दी असेल . "

" व्हय्. दादा येत्याल. "

" अरे वा ! एकटे ? "

" न्हाई–इंदुतायबी ! "

वाहवा ! या बाबूनं बातमी मोठी नामांकित सागितली. निरखून पाहू लागलो. थोडक्याच वेळात ती खरी ठरलेली दिसली. खाली एक गाडी येऊन उभी राहिली, अन् सताठ पाढरे भुरके निळे ठिपके गड चढू लागले.

कडुस पडता सगळे लोक येऊन हजर झाले. जयंतराव या माणसाला सिंहगड चढण एखादा जिना चढण्याइतक सोपं वाटत असल पाहिजे ! किती फेऱ्या झाल्या असतील त्याची काही गणती नाही. कुणाला संध्याकाळचं एखादं कोल्हंविल्हं या झुडपातून त्या झुडपात जाताना दिसतं. तसाच उठून तो थेट पुण गाठतो. धापा टाकीत सागतो.

"दादा, जनवार उठल ! म्या सवता पघितलं ! "

"खरं सागतोस ? "

"आईच्यान् ! "

वाघाच नाव घेतलेलं नसल्यामुळं आईची शपथ वाहायला कुठलीच अडचण नसते. कुठलं का होईना, जनावर दिसलेलं असतंच. जयंतरावाना तेवढ निमित्त पुरतं. ते काडतुसांचा पट्टा गळयात अडकवतात. पांडूजवळ बदूक देतात, अन् तडक गड गाठतात. बातमी देणाराला माहीत असतं. दादा आले आहेत. गेला वाजार चारदोन ससाना तरी मरण नाही. दादा एकटे काही खात नाहीत. आपला वाटा पडायचाच !

येताक्षणी जयंतरावानी मला विचारल,

"काय बेत ? "

"आता बेत तुम्ही सांगायचा का आम्ही? आम्ही हे असे खुषीचा कारावास भोगीत असलेले. म्हाताऱ्याच्या हातच्या जळकट पोळ्या खाऊन खाऊन अगदी कंटाळलो. इंदुताई आल्या, हे फार बरं झालं. एखाददोन दिवस चांगली सुरेख फोडणी दिलेली आमटी तरी ओरपता येईल."

"शिकारीला चलता का उद्या ? "

शिकारीचं नाव ऐकताच मोहन हरिखला. त्याचे डोळे लुकलुकू लागले. जिभल्या चाटीत त्यानं विचारल,

"कसली शिकार ? "

"डुकरं आहेत म्हणे. जाऊ उद्या सकाळी. दिवसभर रानात हिंडाव लागेल. सध्याकाळी परतू. दिसली डुकरं तर हाणू, न दिसली तर संध्याकाळी परतताना चारदोन ससे आणू गोळा करून ! "

एखाद्या उदार सरदार–दरकदारासारखं मोहन म्हणाला,

"मजूर ! "

ससात जरी माझा वाटा पडणार नव्हता, तरी रान काढीत हिंडण्यापर्यंतचा भाग मलाही मान्य होताच. तेव्हा मीही प्रसन्न मनानं समत्ती देऊन टाकली.

दुसरे दिवशी पहाटेच निघालो सगळे. तीन तुकड्या केल्या. बाबूबरोबर मोहननं जायचं. पाडूबरोबर जयतरावासवे आलेल्या मुबैकर पाहुण्यान. जयतरावाचा साथी मी. पाहुण्याचा नोकझोक पाहून मी चाटच पडलो. स्वत साठी मुलगी बघायला निघताना करावा, तितका थाटमाट केला होता त्यान. जयंतराव हसून कुजबुजले,

"तासा दोन तासात हा गडी परतणार बघा !"

"कशावरून ?"

"अहो हौसेनं शिकारीची वर्णनं वाचून आला आहे. रानाची गाठ पडली, म्हणजे कळेल हिसका. ते केसाना फासलेलं ब्रिलियंटाइन, तोडाला चोपडलेल ते क्रीम – सगळ पाघळायला लागेल."

"मग कशाला घेताय् बरोबर बिचाऱ्याला ? "

"येऊ द्या की ! फार दिवस माग लागला आहे उमगू द्या शिकारीतलं सुख "

पुणे दरवाजा उतरून घारजाईकडे निघालो. चागल मैलभर जाईपर्यंत रस्ता सोडला नाही. मग तुकड्या फुटल्या. तिन्हीनी तीन आडवाटानी निघून धारजाईखालच्या लवणात जनावरं कोंडायची, असं ठरल. वाट सोडून जयतरावाबरोबर मी टेपाड चढू लागलो.

जयतराव एका मित्राची गोष्ट सांगू लागले. त्यालाही शिकारीबरोबर हिंडायची हौस. काढला म्हणे रानात. दिवसभर रान तुडवीत हिंडवला. पार विझरच्या अगच्या घळीपर्यंत दामटला कसाबसा मुईवर पायान रेघोट्या ओढीत चालला. सध्याकाळी तिथच बसकण मारून गडी म्हणाला,

"जयतराव, विंझरहून पुण्याला एस्टी आहे ना ?"

"का हो? शिकार तर व्हायच्येय अजून !"

"घड हातापायानी घरी जाईन रोज तूपदूध खाईन. वट्टमुट्ट होईन. हजार दण्ड अन् बैठका काढीत जाईन. मग येईन शिकारीला. अहो, आता इतका थकलोय्, की मनात आलं, तुम्हाला बदुकीत गोळी आहेनास विचाराव"

"कशाला बाबा ? "

"उगीच हिंडवून जीव कशाला घेता ? झाडाखाली उभा राहतो – चालवा गोळी !'

हसून हसून माझं अगदी मुसकट पडल.

रान काढीत निघालो. प्रत्येक जाळीत धोंडे फेकायचे, आरडाओरडा करायचा. हाकारा घालीत चालायचं. जयतराव शिकारीचा दरेस भरून आले होते. त्याच्या पायात होते हंटिंग शूज. मी मात्र गबाळासारख नुसतच धोतर वर खोचलेला. पायात साधीच जुती. त्यामुळं जाळ्यांमधून हिंडताना अन् टेपाड चढता उतरताना भरपूर ओरखडे निघून मोहरममधल्या वाघासारखा दिसू लागलो. धोतर फाटल्यानं फकिराचीही कळा आली. असा फुकटात मेकप झाला.

ओरडायला मात्र भरपूर मिळाल. सभ्यतेचा मुखवटा पांघुरला, म्हणजे ही एक मोठीच अडचण असते. ठणाणा करता येत नाही. त्या दिवशी भरपूर किचाळून घेतल. धोंडे फेकफेकून हात दुखू लागले. दहापाच जाळ्यातून तित्तिर अन् लावे उडाले. डुकराचं मात्र शेपूटही दिसल नाही

कच्ची करवंद खात बाराच्या सुमारास लवणात पोचलो. दादा आले, हे ऐकताच मासकडाला लालचावलेली आणखी आठदहा पोर खालून नळी चढून हाके घालीत लवणात आली होती, त्यानी एक स्फूर्तिदायक चित्तथरारक वार्ता आणली होती.

"दादा, वाहाग हाये !"

"हात लेका ! कुठला वाघ ? एखादा रानबोका बघितला असशील !

"खड्डुबाच्यान् दादा ! म्या सवता घळीत पघितला. बंदूक न्हवती, तव्हा म्होर गेलो न्हाई."

"कुठल्या घळीत !"

"ह्या खालच्या !"

हिरडीखाली बसत जयंतरावानी मला विचारल,

"काय हो साहित्यिक, वाघावर बसणार काय आज रात्री ?"

वाघावर ? हे : ! काहीतरीच ! थट्टा करायची झाली, तरी असली ? मी गलबलून म्हणालो,

"चावला म्हणजे ? काडकन् पाय फोडलान् तर ? "

जयतराव खळखळून हसले. सगळ्या पोरानीही दात काढले. मग वाघावर बसणं म्हणजे वाघाच्या मागावर बसणं, हे त्यानी समजावून सागितल. कल्पना एकदम आवडली.

या वाघान मला फार छळल आहे. लहान होतो तीन साडेतीन वर्षांचा, तेव्हा दिगंबर-वेशात घराबाहेर रडत बसायचा. बंगल्याच्या मालकान एक वाघाचं–पट्टेदार–पिल्लू पाळलं होतं. ते साखळीहून सुटलं, की नेमकं मजकडे धावत यायच. माझ्या पाठीवर पजे ठेवून उभ राहायच. इथपर्यंत चाललं असतं एकापरी. पण ते मागून माझे गाल चाटायच, तेव्हा त्याच्या मिशा लागून गुदगुल्या व्हायच्या. हे मला साफ नामजूर होत. मग मी चागला मोकळा लख्ख गळा काढून रडायचो.

मोठेपणीही चारदोनदा वाघाची गाठ पडली होती. ऐन जगलात. त्यावेळी किती घाम फुटला होता, इत्यादि गोष्टी प्रकटपणं सागण्याजोग्या नाहीत. पण एकूण वाघ हे जनावर वाईटच. याचा कधी तरी बदला घ्यावा, म्हणजे कुणीतरी वाघ मारावा, मग मी जाऊन त्याच्या मिशा उपटाव्यात, अन् एक मुस्कुटात भडकवावी, असा बेत फार दिवसापासून बाळगला होता. आज तो पुरा होणार, हे पाहून फार बरं वाटल. ● ● ●

मी शिकारीवर निघणार हे ऐकताच इंदुताई गालातल्या गालात हसल्या. म्हणाल्या,

"अहो काय म्हणता ? याना नेता ? मग मीही येते की !"

त्याच्या म्हणण्यातला श्लेष तत्क्षणी माझ्या ध्यानी न आल्यामुळ मी आनदून म्हटलं,

"चला, चला !"

रात्र अधारी असली, तरी चादिणं लख्ख होतं. जयतरावानी आपला फ्लॅशलाइट असलेला कॅमेरा माझ्याजवळ दिला. म्हणाले,

"हा घ्या. एक फोटो वाघाचा काढा. मग वाघावर–मेलेल्या–तुम्ही बसले आहात असा तुमचा एक फोटो काढू."

बाबूच्या हाती एक बकरू, अन् खांद्यावर बदूक. पाडूजवळ दुसरी. जयतरावाच्या बदुकीच्या टोकाला फ्लॅश अडकवलेला. मुबईचा पाहुणा पुन. सकाळसारखा थाटमाट केलेला. हाती भाला घेतलेल्या, कॅनव्हासचे बूट घातलेल्या इदूताई. मोहन अन् गळ्यात कॅमेरा अडकवलेला मी. असे जेवून खाऊन आठ वाजता त्याच वाटेनं पुन. बाहेर पडलो. चालू लागल्यावर जयंतराव सूचना देऊ लागले.

"हे पाहा धारजाईच लहानस देऊळ आहे. पत्र्याचं सप्पर. इतक्याजणाना बसायजोगी जागा तिथं नाही. कुणातरी दोघांना बाहेर थांबावं लागेल–"

मी घाईघाईनं विचारून टाकलं,

"दोघाना म्हणजे कुणाला ?"

"ते तिथ गेल्यावर ठरवू. त्या देवळासमोर बकरू बाधायचं. देवळाला त्या आगी एक लहानस छिद्र आहे. तिथ बदूक लावून मी बसेन. सगळे आताच खोकून आणि शिकून घ्या. शिकारीला बसल्यावर कुणी थुकायशिकायच नाही. श्वाससुद्धा मोठ्यानं सोडायचा नाही–"

मुबईच्या पाहुण्याच्या मनी शका उपजली,

"नै म्हणजे स्मोकिंग केल तर–"

"ज्या काय धुन्या पेटवायच्या, त्या इथं पेटवून घ्या. तिथ मी काहीही करू देणार नाही ?"

"किती वेळ ?" पाहुण्याची दुसरी उपशंका.

"अर्धी रात्र उलटून जाईपर्यंत !"

"बाप रे ! म्हजे तसं कठीणच आहे !"

"तर मग माग फिरा बघू !"

"बरोबर द्या ना कुणीतरी !"

आम्ही सगळ्यानी त्याला समजावलं, की तिथं एका अरूल्या साखसुरत वाघाचा जीव जायचा आहे, तेव्हा इतका स्वार्थत्याग आपल्याला सगळ्याना केलाच पाहिजे. मग हे त्यालाही पटल.

सगळे मकाणावर रुजू झालो. तिथ पोचेपर्यंत सगळ्यानी खोकून, ठसके काढून घेतले. मोहनन नाकात सूत घालून शिकासुद्धा काढल्या. डेंजर झोन सुरू झाल्यावर जयतरावानी इशारा केला. मग सगळे चुपचाप चालू लागलो.

दिवसा रान वेगळ दिसतं. रात्री वेगळं. नाही म्हटल, तरी एक अनोख अद्‌भुतपण त्याच्या अंगी घुमू लागतच. त्यात ही अशी अळीमिळी गुपचिळी. पायतणाचाही आवाज जाणवू लागला. एका अज्ञात आशकेनं सगळ्यानाच –पण सगळ्याच मला माहीत नाही, मला तरी घेरल.

धारजाईच देऊळ आल. डोंगराच्या एका धारेवर मधोमध ते पत्र्याचं टप्पर आहे. त्याच्यासमोर बऱ्याच लाबपर्यंत सथ उतार धावत गेला आहे. दोबाजूस लवणं. मागं चढा डोंगर. सगळे धारजाईसमोर उभे राहिलो, जयतराव मजजवळ आले. फुसफुसत म्हणाले,

"काय हो, वाघाचा फोटो घ्याल का ?"

ही कल्पना मला एकदम आवडली. मी विचारलं–फुसफुसतच,

"म्हणजे तो मेल्यावर ना ?"

"नाही, तो बकरू खात असताना–"

ही कल्पना तर पहिलीपेक्षा अधिक रोमहर्षक !

"घेईन की !"

"मग बाहेर थांबलं पाहिजे !"

क्षणभर विचार करून म्हणालो,

"कुणी शिकारी द्याल सोबतीला, तर थाबतो."

तोवर बाबू कुऱ्हाड घेऊन बाजूला गेला होता, अन् त्या भरवशाच्या म्हाताऱ्या शिकाऱ्यानं करवंदीची पाचसात फादोरी तोडून ओढीत आणली होती. पाडू देवळापासून पंधरावीस फूट अतरावर असलेल्या खुंटीला बकरू बांधून आला. ते आपलं मुकाट्यानं चारी खूर टेकून बसलं, अन् घरच्यासारखी त्यान पायात मुंडी खुपसली !

बाबूनं देवळालगत करवंदीची फादोरी रचून त्यांचं घोलं केलं. घोलं म्हणजे चहूंबाजूनी काट्यांनी वेढलेली कामचलाऊ तटबदी. त्या घोल्यात मला अन् दुसऱ्या एकाला बसण्यापुरतीच जागा होती. जयंतराव बाबूला म्हणाले, फुसफुसून,

"तू बाहेर थाबशील ? तू अन् दाडेकर ?"

"थाबेन की !"

मग मी एकदम निर्धास्त झालो. या म्हाताऱ्याच्या भरवशावर मी वाघाच्या तोंडातसुद्धा मजेत झोपलो असतो. आम्हापासून वीसेक फुटावर बकरू बाधल होतं. घोल्यात बदुकीत काडतुस भरून, ती सावरून तो निधड्या छातीचा शिकारी बसला. त्याच्या अगाला अग घाशीत कॅमेरा सरसावून मी अंदाजानं फोकसिंग केल. टाइमिंग नीट जुळवल. कॅमेरा चार्ज केला अन् आता उरलं केवळ वाघाच येणं !

तिकडे शेजारी टपऱ्यातल्या धारजाईला साक्षी ठेवून बाकी शिकाऱ्यानी आपापली आसनं जमवली होती. म्हणजे काय ? ते एकमेव छिद्र, त्यातून बंदूक सारून जयंतराव पालथे पडले होते. त्यांच्या शेजारी त्याच

[पृष्ठ ४३ वर पाहा]

## झुंझार वृत्तीचा ज्येष्ठ आणि श्रेष्ठ

# दिग्दर्शक जॉन फोर्ड

लेखक : के. टी. देशमुख

चित्रपटसृष्टीची प्रगती होत आहे की अधोगती ? आता जमाना बदलला आहे. इतकेच आपण म्हणू. नायिकेच्या शरीरसौष्ठवावर आता गल्ला ठरू पाहात आहे. चित्रपट अनेक रंगी हवाच ! चित्रपटात खर्चिक देखावे पाहिजेत. नायक नायिकेचा उच्छृंखल शृंगार त्यात हवाच. त्यात रोम दिसले पाहिजे. त्यात लंडन हवेच. त्यात पॅरिस दिसले पाहिजे. मग त्यात काय नको ? त्यात कथानक नको !

उडाणटप्पू नायक आणि संस्कारहीन सौंदर्यवती नायिका याच्या बेजबाबदार प्रेमाचे थेर सारा वेळ पडद्यावर चालू असताना त्यात अधूनमधून राष्ट्रप्रेम, कुटुंबप्रेम, मातृप्रेम इ. मिश्रणाचे रसायन छटाक छटाक कुठे तरी सोडीत राहिले म्हणजे पुरे.

दुबळी कथानके आणि दुबळे संघर्ष यांनी निर्माण केलेल्या छोटया वर्तुळाच्या परिघात चित्रसृष्टी अनेक चित्रात गिरक्या खाताना दिसते. तंत्र सुधारले आहे हे खरे, परंतु मंत्र लोपला आहे !

प्रेक्षकाची अभिरुची दिवसेदिवस हीन पातळीवर येत असताना, या भयावह अशा वातावरणात एक मातबर कलापुरुष ठामपणाने उभा राहून आपल्या कलाकृती मूक जमान्यापासून आजतागायत वर्षानुवर्षे जनतेस सादर करीत आहे. त्याने नवे तंत्र आत्मसात केले आहे. परंतु आपला जुना मंत्र राखून ठेवण्याविषयी तो दक्ष आहे !

### सर्वांत अधिक बक्षिसांचा मानकरी

अमेरिकेच्या मोशन पिक्चर ॲकॅडमी ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्सेस् या मान्यवर संस्थेने त्याच्या एक नव्हे, दोन नव्हे तर सहा हेतुप्रधान चित्रांना आतापावेतो उत्कृष्ट दिग्दर्शनाचे पहिले मानाचे ऑस्कर बक्षीस बहाल केले आहे. १९३५ साली त्याच्या 'इन्फॉर्मर' या संस्मरणीय अशा चित्रकृतीस अकादमीचे बक्षीस पहिल्याने मिळाले. त्यानंतर 'ग्रेप्स ऑफ राथ' १९४०, 'हाऊ ग्रीन वॉज माय व्हॅली' १९४१, 'क्वाएट मॅन' १९५१, या तीन चित्रपटांस आणि युद्धकाळात त्याने बनविलेल्या दोन अनुबोधपटांना अकादमीने पहिली बक्षिसे दिली. हॉलिवूडमध्ये जॉन फोर्ड हा एकच दिग्दर्शक असा आहे की ज्याने सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाची सर्वांत अधिक बक्षिसे उपटलेली आहेत !

सत्तेचाळीस वर्षांपूर्वी, १९१७ साली जॉन फोर्डने 'कॅक्टस माय पॉल' हा आपला पहिला मूकपट गाजविला. गतवर्षी त्याचे 'मॅन हू शॉट लिबर्टी व्हॅलन्स' हे चित्र जगभर गाजले. इतकेच नव्हे तर या चित्राने जगभर उत्पन्नाचे नवे उच्चांक गाठले. मुंबईत एक्सेलसिअरमध्ये हा चित्रपट नऊ-दहा आठवडे तुफान गर्दी खेचीत होता. त्याचे अलीकडील नवे चित्र 'चेयेन्ने ऑटम्' युरोप-अमेरिकेत प्रचंड यशस्वी ठरले आहे आणि ते आता मुंबईकडे प्रकाशनाच्या मार्गावर निघाले आहे. त्याने दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांची एकूण संख्या एकशेवीस झाली आहे. परंतु त्याने हाताळलेली प्रत्येक कथा लोककल्याणाच्या भावनांवर अधिष्ठित आहे.

### राष्ट्रकल्याणाची प्रेरणा

धीरोदात्त व्यक्तीच्या जीवनामधील संघर्षाच्या स्फूर्तिशाली ओजस्वी चित्रण करण्यात तो कुशल आहे. स्वार्थी, श्रीमंती आणि कष्टमय गरिबी ही पुरातन चौकट त्याच्याही चित्रांत आढळते तद्वतच कायदा, न्याय, सुविचारांना धाब्यावर बसवून मस्तवाल दुर्जन-सज्जनांना पीडतात, छळतात असेही कथाविषय आहेत. गरिबांच्या हालअपेष्टा अगर सज्जनांची असहाय्य परिस्थिती आपल्या हृदयात कणव निर्माण करते हे स्वाभाविक आहे. परंतु ती असहाय्यता, अगतिकता खुलविणे हा त्याचा धर्म नव्हे. धैर्याने, नेकीने, चिकाटीने पुढे मार्ग काढणाऱ्या कर्मवीरांना त्याने गौरविले आहे. संवेदनाक्षम, भावनाविवश म्हणून निष्क्रीय, असा नायक त्याने कधी रंगविला नाही. त्याच्या कथा रडूबाईच्या हळव्या कथा नाहीत तर आशावादी, क्रियाशील, चारित्र्यसंपन्न आणि धैर्यशाली कर्तृत्वावर त्या केंद्रित होत असतात.

राष्ट्राच्या अभ्युदयासाठी, उत्कर्षासाठी, राष्ट्राचा संसार सुखी, आनंदी आणि समृद्ध व्हावा, अशा तीव्र तळमळीतून त्याची चित्रे निर्माण झाली आहेत. चांगल्या संस्काराचे बीजारोपण करणाऱ्या त्याच्या कथा प्रेक्षकाच्या अन्तःकरणाला हलवून सोडतात. ज्या धीरोदात्त, ध्येयनिष्ठ, न्यायनिष्ठूर, कर्तव्यकठोर अशा पात्राचे पडद्यावर आपणास दर्शन घडत असते ते वीरपुरुष अमेरिका देशाचे ! आपणास त्यांचे कौतुक कशाला ! परंतु अशी तुटकपणाची, अलगपणाची भावना आपल्या हृदयास स्पर्शही करीत नाही आणि म्हणूनच त्याचे प्रत्येक चित्र जगामधील सर्व देशाच्या चित्ररसिकाचे आवडते चित्र ठरते !

### करडे आणि कोमल व्यक्तिमत्त्व

वयाने एकोणसत्तर, प्रकृतीने दणकट, सव्वासहा फूट उंचीचा, रागीट, करड्या शिस्तीचा हा दमदार गडी दर्शनाने उग्र वाटतो.



जॉन फोर्ड

आपल्या प्रत्येक चित्रात वीर पुरुषांच्या कथा आजवर तो मोठ्या तळमळीने रंगवीत आला आहे. कलात्मक पातळी समतोल राखण्याच्या कौशल्यामुळे त्याचे चित्रपट प्रचारी थाटाचे वाटत नाहीत. वीरश्रीयुक्त आणि ध्येयप्रवण अशी त्याची चित्रे ही राष्ट्राची एक अमोल संपत्ती म्हणून मानली गेली आहेत. त्याचा पिंड हा केवळ कलाकाराचा नसून तो विचारवंताचा, देशभक्ताचा आहे.

त्याच्यावरोबर काम करणारी कलावंत मंडळी, तंत्रज्ञ, कामगार त्याचेवर खूप प्रेम करतात. परंतु ते त्याला खूप भितातही. अगदी वचकून राहतात. हा रागवला म्हणजे असा काही खेकसून ओरडतो, की यापेक्षा त्याने एखादा टोला दिला असता तर दुःख कमी वाटावे. सेटवर असताना तोंडामधल्या पाईपशी हातांनी चाळा चालू असतो. रुमालाचे एक टोक दातामध्ये पकडून दुसरे टोक हाताने ओढण्याचा खेळ सुरू झाला, तर ओळखावे; ह्याला काहीतरी मनोरम कल्पना स्फुरत आहे ! प्रसंगांचे चित्रीकरण मनासारखे होत असले तर तो खूप असतो. परंतु त्याची ती खुषी स्मिताने प्रकट होत नाही. सौम्य आवाजात किरकोळ शिव्या तो पुटपुटत राहतो ! करडया आवाजात वेगवेगळे हुकूम ओरडून सांगत असताना, मधेच 'महाराज !' असे संवोधून कुणावरोबर औपचारिक नम्रतेस सुरुवात झाली की ओळखावे, स्वारी खूप गरम होऊन रागाने तपमान वरती चढते आहे.

करडया शिस्तीचे, रागीटपणाचे अवसान तो नेहमी मुद्दाम आणीत असतो. परंतु त्याचे अन्तःकरण कोमल आहे, मृदु आहे, कवीचे आहे. म्हणूनच चित्रपटातील भावरम्य आणि ओजस्वी प्रसंगांचे चित्रण तो इतक्या सफाईने करू शकतो. कलावंतांकडून हवी असणारी दृश्ये आपल्याप्रमाणे वठवून घेण्यात तो पटाईत ठरला आहे. अचूक सौंदर्यदृष्टी हे त्याला लाभलेले एक वरदान असल्यामुळे निसर्गसौंदर्याचे नयनमनोहर छायाचित्रण हे त्याच्या चित्रपटाचे 'प्रसिद्ध' असे वैशिष्टच आहे !

### वास्तवतेसाठी आटापिटा


कुशाग्र बुद्धिमत्ता आणि चतुर योजकता हे त्याचे प्रभावी गुणविशेष आहेत. त्याच्या 'इनफॉर्मर' या चित्रास अकादमीने सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे वक्षीस पहिल्याने दिले. आयर्लंडमधील क्रांतिकारकाचे वंड ही या चित्राची पार्श्वभूमी होती. व्हिक्टर मॅक्लॅग्लेन या किरकोळ स्वरूपाच्या भूमिका करणाऱ्या कलावंतास त्याने या चित्रात एकदम प्रमुख भूमिका दिली. ह्या भूमिकेत तो व्यग्र-विमनस्क मनःस्थिती सतत दिसावा म्हणून फोर्डने आपल्या मदतनीसास एक खास गुप्त कामगिरी दिली. शूटिंग संपल्यावर दररोज रात्री तो मदतनीस व्हिक्टरला सपाटून दारू पाजण्यास नेई. रोजच्या मद्यपानामुळे आणि बराच वेळ चालत असणाऱ्या या पार्टीमुळे व्हिक्टरला रात्रीची पुरेशी झोप अगर विश्रांती मिळत नसल्याने साहजिकच दिवसा शूटिंगच्या वेळी त्याचा चेहरा तारवटल्यासारखा दिसू लागे. फोर्डला नेमके हे हवे होते. ही भूमिका एका लबाड, संधिसाधू माणसाची असल्याने त्याचे संवाद चाचरत, अडखळत, भांबावल्यासारखे वाटावेत म्हणून संवादाच्या तालमी घडत असतानाच फोर्ड त्याच्या न कळत चित्रण करून टाकी. परिणामी ती भूमिका इतकी वास्तविक, कलापूर्ण ठरली की त्या वर्षाचे 'सर्वोत्कृष्ट प्रमुख भूमिकेचे' अकादमीचे वक्षीस व्हिक्टरला मिळाले ! किरकोळ भूमिका करणारा कलावंत यानंतर 'चित्रतारा' या पदवीस जाऊन पोहोचला.

मुका चित्रपट बोलू लागल्यानंतर प्रत्येक चित्रपटात सुरुवातीला संवादांना एवढे प्राधान्य आले, की पडद्यावरची ही एकसारखी बडबड फोर्डला मान्य होईना. 'आवाजाच्या किमये'ला संयमाने हाताळणारा फोर्ड हा पहिला दिग्दर्शक होय. त्याच्या चित्रांतील संवाद अगदी छोटे, जरूरी असेल तरच ठेवलेले असावयाचे. चित्रपटांच्या रंगतीकरिता वातावरणातील आवाज त्याने प्रामुख्याने घेतले. उदाहरणार्थ, धावत येणाऱ्या माणसाच्या पावलाचा आवाज, पळणारी घोडागाडी इ० फोर्डचे बोलपट पाहात असताना प्रेक्षकांना एक आगळे समाधान वाटत असे.

'ग्रेप्स ऑफ राथ !' हा गाजलेला चित्रपट तयार करताना त्याने 'वास्तवता' इतक्या प्रखर स्वरूपात प्रकट केली होती की, त्या कथेतील मळयामध्ये काम करणाऱ्या मजुरांवर होत असणाऱ्या राक्षसी, अन्यायी जुलुमांकडे साऱ्या अमेरिकेचे लक्ष वेधले गेले ! फोर्डच्या या चित्रासही अकादमीने दिग्दर्शनाचे पहिले बक्षीस दिले आहे. चित्रपटसृष्टीत हे एक संस्मरणीय चित्र मानले जाते. या चित्रपटातील समाजकार्यकर्त्याच्या भूमिकेत नवथर कलावंत 'हेन्री फॉन्डा' प्रथम चमकून चित्रतारा म्हणून उदयास आला.

### स्टुडिओतील दरारा

चित्रीकरणाचे वेळी कामात व्यत्यय येतो म्हणून कोणी पाहुणा सेटवर आला तर त्याला मुळी खपत नाही. एकदा त्याच्या चित्राचे संवाद-लेखक उगाच सेटवर रेंगाळू लागल्याचे पाहून दुसऱ्या दिवशी शूटिंगचे काम स्थगित ठेवून फोर्ड त्या लेखकाच्या स्टुडिओतील खोलीत घुसला. 'तुमचे लिखाण तुम्ही आपले चालू ठेवा' असे म्हणत तो शेजारच्या खुर्चीवर ठिय्या देऊन बसला. त्याच्या एकटक पाहाण्याने



दिग्दर्शक जॉनफोर्ड आपला आवडता चित्रतारा जॉन वेन याला 'डोनोव्हन्स रीफ' या अलीकडच्या चित्रातील एक प्रसंग समजावून सांगत असताना—

लेखक महाशय ओशाळे होऊन लिखाण पुढे चालू ठेवण्यास असमर्थ ठरल्यानंतर फोर्डने गर्जना केली, "मी समोर आहे म्हणून तुला काम सुचत नसेल तर माझ्या कालच्या शूटिंगच्या वेळी सारा वेळ माझ्याभोवती पिंगा घालण्याचे तुझे काय प्रयोजन होते?" लेखक महाशयांना आपली चूक कबूल करून माफी मागावी लागली.

हॉलिवूडच्या स्टुडिओत अशी एक प्रथा आहे की, दररोज सकाळी दिग्दर्शक व कलावंतांनी आदल्या दिवशीच्या चित्रीकरणाची दृश्ये पडद्यावर पाहिल्यानंतर मगच शूटिंगला सुरुवात होते. दिग्दर्शक फोर्डला ही गोष्ट मान्य नाही. अशी दृश्ये पाहिली म्हणजे कलावंत मंडळी एकमेकांवर कुरघोडी करण्याकरिता उगाच फाजील नटवेपणा आपल्या अभिनयात घुसवतात, म्हणून त्याच्या चित्रांत कामे करणाऱ्या कलावंतांना चालू चित्रीकरणाची दृश्ये पाहाण्याची मनाई आहे. प्रत्येक पात्राच्या भूमिका आपल्या कल्पनेप्रमाणे मनासारख्या वठवून घेत असताना चित्र कसा काय आकार घेत आहे याची कल्पना तो इतर कोणालाही येऊ देत नाही.

प्रख्यात कलावंत जॉर्ज सँडर्स एकदा सेटवर त्याला काही सूचना करू लागल्यानंतर फोर्डने कडाडून जे उत्तर दिले ते चित्रसृष्टीत प्रसिद्ध आहे. दिग्दर्शकाच्या खुर्चीकडे बोट करीत फोर्ड गरजला होता, "इथे दिग्दर्शकाची खुर्ची एकच ठेवलेली आहे. तुला काही सांगावयाचे असेल तर त्या खुर्चीवर तू जाऊन बस आणि नंतर सांग. मी कॅमेऱ्यासमोर तुझ्या सांगण्याबरहुकूम भूमिका वठवून दाखविण्यास तयार आहे!"

कुणापुढे नमते घेणे अगर मतलबी स्वरूपाची तडजोड करणे त्याला जमत नाही. आणि बंडखोरी तर त्याच्या रक्तातच आहे!

## आयरिश क्रांतिकारकाचा पिंड

जॉन फोर्ड जन्माने आयरिश. आयर्लंडमध्ये राजकीय चळवळी चालू असताना अस्थिर वातावरणात त्याचे शैशवापासून कुमारावस्थेपर्यंतचे आयुष्य गेले. त्याने कॉलेजमध्ये प्रवेश केला, त्या वेळी क्रांतिकारकांच्या एका टोळीतही प्रवेश मिळविला होता. काही प्रकरण गळचाशी आले म्हणून तो अमेरिकेस पळून आला. नाटचाचार्य खाडिलकरांनी आपल्या तरुण वयात नेपाळला जाऊन जी राजकीय कामगिरी केली तिचा उच्चार त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही कधी केला नव्हता. फोर्डसुद्धा आपल्या राजकीय उद्योगाविषयी एक अवाक्षरही उच्चारण्यास तयार नाही. अमेरिकेत त्याचा थोरला भाऊ हॉलिवूडच्या चित्रसृष्टीत नोकरी करीत होता. त्याच्या वशिल्याने, मूक चित्रपटांच्या जमान्यात, सेटवरचा मदतनीस पोऱ्या म्हणून फोर्डला स्टुडिओत नोकरी लागली. ते साल १९१५ होते.

दिग्दर्शक— निर्माता कार्ल लॅम्ले याच्या हाताखाली काम करीत असताना एके दिवशी सर्कसच्या तंबूला आग लागते, अशा दृश्याचे चित्रीकरण करण्याची पूर्वतयारी फोर्डला करावयाची होती. बंडखोर वृत्तीच्या छोटचा फोर्डने आग विझविण्यासाठी उपयोगात आणावयाच्या बादल्यात पाण्याऐवजी गुपचूप रॉकेल तेल भरून ठेवले. आगीच्या दृश्यांचे पुरेसे चित्रीकरण आटोपल्यावर दिग्दर्शकाने आग विझविण्याचा हुकूम सोडला. रॉकेल तेलाच्या बादल्या ओतल्या गेल्यावर अशी काही आग भडकली की सबंध तंबू जळून खाक झाला. किंमती तंबूचा नाश झालेला पाहताच दिग्दर्शक लागलेल्या अग्नीपेक्षा जास्त भडकला! परंतु चित्रीकरण सुदैवाने चालूच होते. दुसऱ्या दिवशी सकाळी आगीची दृश्ये पडद्यावर पाहून दिग्दर्शक एकदम खूष होऊन गेले. फोर्डची दिग्दर्शक म्हणून नेमणूक झाली. आठवड्याचा पगार म्हणून त्याला ७५ डॉलर्स मिळू लागले. आपल्या पहिल्या चित्राचा विषय त्याने 'वेस्टर्न' या धाडसी चित्रप्रकारातील निवडला. वेस्टर्न पद्धतीची चित्रे यशस्वी तऱ्हेने हाताळणाऱ्या मातबर



ग्रप्स ऑफ राथ '
या चित्रात
चित्रतारा हेन्री फॉन्डा
शेतमजुरांच्यावर होत
असणारे अत्याचार
पाहून व्यथित
झाला आहे.

कलाकारांमध्ये दिग्दर्शक जॉन फोर्ड ह्यास आज अग्रपूजेचा मान दिला जातो.

## रेअर अ‍ॅड्मिरल फोर्ड

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फोर्डने आपला चित्रव्यवसाय तात्पुरता स्थगित करून तो आरमारात भरती झाला. पुरेसे तांत्रिक शिक्षण घेतल्यानंतर त्याच्या हाताखाली एक आरमारी तुकडी, छायाचित्रकारांचे स्वतंत्र पथक आणि एक लढाऊ जहाज देण्यात आले. त्याच्या आरमारी तुकडीने महायुद्धात अनेक पराक्रमी आणि धाडशी कृत्ये केली. छायाचित्रकारांनी प्रत्यक्ष लढाईची जी दृश्ये घेतली त्यामधून फोर्डने अमेरिकन राज्यसरकारचे वतीने दोन अनुबोधपट तयार केले. अकादमीने त्यांना 'आदर्श' लघुपटाचे बक्षीस दिले. फोर्डला 'रेअर अ‍ॅड्मिरल' हा आरमारी बहुमानाचा हुद्दा मिळाला.

युद्धसमाप्तीनंतर त्याने आपल्या कलाजीवनास पुन्हा सुरुवात केली खरी. परंतु आपल्या आरमारी तुकडीमधील जवानांचे त्याला विस्मरण झाले नाही. दिग्दर्शक म्हणून आपल्या चित्राचा जो मोबदला त्याला मिळाला तो सर्वच्या सर्व खर्च करून त्याने हॉलिवूडमधील सॅन फरनांडो व्हॅलीमधील रमणीय ठिकाणी एक सर्व अद्ययावत सुखसोयींनी उपलब्ध असलेले एक नवीन विश्राम-स्थान तयार करविले आणि त्याच्या शूर जवानांना ते देणगी म्हणून अर्पण करून टाकले ! अलीकडे एका चित्रपटाच्या दिग्दर्शनाचा मोबदला म्हणून त्याला दोन लाख पंचवीस हजार डॉलर्स मिळू लागले होते !

आपल्याबरोबर काम करीत असणाऱ्या सहकाऱ्यांबद्दल त्याचे मनात अपार प्रेम आणि सहानुभूती असते. त्याचा देखावा किंवा प्रदर्शन करणे त्याला आवडत नाही. नेहमी तो आपल्याच ऐटीत असेल हे खरे. परंतु चांगल्या कृत्याची दखल घेण्याची ऋजुता त्याच्या अंगी आहे.

## चित्रताऱ्यांचा निर्माता

सुप्रसिद्ध चित्रतारा जॉन वेन सुरुवातीस फोर्डच्या हाताखाली सेटवरचा मदतनीस पोऱ्या म्हणून राहिला होता. तेव्हाची गोष्ट : एका मोठ्या जहाजाच्या डेकवर शूटिंग चालू असताना इतक्या उंचीवरून खवळलेल्या समुद्रात उडी घेण्यास 'स्टंट'मधील धाडसी 'एक्स्ट्रा' कलाकार धजेनात; म्हणून पेचप्रसंग निर्माण झाला. फोर्डने आपल्याकडे पाहिले म्हणून जॉन वेन पुढे सरसावला. त्याने बेधडक उडी मारली. त्याबरोबर भेदरून, भांबावून गेलेला नटवर्ग ठिकाणावर झाला. साऱ्या मंडळींनी पटापट उड्या मारल्याने चित्रीकरण उत्तमरीतीने पार पडले. फोर्डने या घटनेची नोंद करून ठेवली होती. जॉन वेनला बक्षीस लगेच मिळाले नाही, किंवा काही बक्षीस मिळणार आहे याचीही कल्पना नव्हती.

फोर्डने आपल्या गाजलेल्या 'स्टेज कोच' या चित्रपटात त्याला एकदम नायकाची भूमिका दिली. आज जॉन वेन प्रथम श्रेणीमधील चित्रताऱ्यांत गणला जात असून अनेक यशस्वी चित्रांत त्याने भूमिका केल्या आहेत. प्रत्येक चित्रपटात भूमिका करण्याबद्दल त्याला हल्ली सुमारे साडेसात लक्ष डॉलर्स मिळतात ! 'चित्रताऱ्यांचा निर्माता' अशी कीर्ती हॉलिवूडच्या चित्रसृष्टीत फोर्डने मिळविली. जॉन वेन, हेन्री फॉन्डा, वॉर्ड बाँड, व्हिक्टर मेक्लॅग्लेन हे चित्रतारे फोर्डने तयार केले आहेत. लहानसहान परंतु धाडसाच्या भूमिका करणारे एक्स्ट्रॉ कलावंत त्याचे विशेष लाडके आहेत. त्याच्याबरोबर चित्रपट-दिग्दर्शनाचे करारमदार होत असताना निर्मा-




'मॅन हू शॉट लिबर्टी व्हॅलन्स' या फोर्डच्या हेतुपूर्ण चित्रातील एक प्रसंग.

एक दुष्ट प्रवृत्तीचा नराधम साऱ्या गावाला आपल्या अमानुष कृत्याने धाकात ठेवीत असतो. एक संपादक (बाकावर बसलेली पहिली व्यक्ती) या दुष्टाची कृत्ये उजेडात आणण्याचे धैर्य दाखवतो. त्यामुळे चिडून जाऊन हा गावगुंड संपादकाचा उभा छापखाना जाळून टाकतो.

याच गावात नव्याने वकीली करण्यास आलेला एक तरुण (जेम्स स्टुअर्ट– मांडीवर हॅट असलेली दुसऱ्या रांगेतील व्यक्ती) अन्यायाची व जुलमाची चीड येऊन त्या गुंडाला सरळ गोळी घालून ठार करतो...

पण वास्तविक ही गोळी वकिलाने झाडली नसून दुसऱ्याच एका गावातील व्यक्तीने झाडलेली असते. पण वकिलाला वाटते, आपणच अपराधी आहोत. त्यामुळे गावातील लोक त्याला निवडणुकीसाठी उभे करतात, तेव्हा प्रथम तो आपण गुन्हेगार आहोत या भावनेने नकार देतो. शेवटी ज्याने गोळी झाडलेली असते ती व्यक्ती येऊन या वकिलाचे गुप्तपणे समाधान करते.

तरुण वकील गावचा पुढारी होतो. सार्वजनिक जीवनात त्याची उत्तरोत्तर प्रगतीच होत जाऊन अखेरीस वॉशिंग्टन येथे एक श्रेष्ठ नेता म्हणून त्याला मान्यता लाभते.

एक दिवस ज्याने खरी गोळी झाडलेली असते तो माणूस गावात मरण पावतो व वॉशिंग्टनहून हा आता मोठा नेता मानला गेलेला वकील त्याच्या दफनविधीसाठी मुद्दाम हजर राहतो. तेव्हा सर्वांना मोठे गूढ आश्चर्य वाटते.

वृत्तपत्राचे बातमीदार या नेत्याला याचे कारण विचारतात. तो प्रथम कारण सांगण्याचे टाळतो. पण फारच आग्रह झाल्यामुळे बातमीदारांना एका वेगळ्या दालनात नेऊन मृतव्यक्तीचे पूर्वचरित्र व त्याचे आपणावर झालेले उपकार कृतज्ञपणे त्यांच्यासमोर प्रकट करतो. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून बातमीदारही या गोष्टीची वाच्यता न करण्याचे ठरवून आपापली बातमीपत्रे तेथेच फाडून टाकतात.

या उदात्त पातळीवर चित्रपटाची अखेर होते. ●

त्यांना हे माहीत असते की जुन्या जमान्यातील एक्स्ट्रॉ कलावंतांमधील साऱ्या हयात धाडसी वीरांना कामे द्यावी लागणार आहेत. 'जॉन फोर्ड स्टॉक कंपनी' असे त्या कलावंतांना थट्टेने संबोधण्याचा प्रघात हॉलिवूडमध्ये आहे! वेस्टर्न पद्धतीच्या चित्रपटांत धाडसाची कामे करणाऱ्या अनेक कलावंतांची जरूरी भासते. वेगवेगळया घोडेस्वारांच्या टोळयांची तुफानी घोडदौड, शर्यती, मारामाऱ्या, घोडयावरच्या लढाया, जखमी झाल्याचा अभिनय करीत धावत्या घोडयावरून खाली कोसळून पडणे इत्यादि प्रकारच्या एकंदर व्यवहारात ही मंडळी वाकबगार आहेत. आजवरच्या फोर्डच्या अनेक चित्रपटांत हे धाडसी वीर गेली पंचवीस तीस वर्षे चमकत आले आहेत. कालचक्राच्या फेऱ्यामुळे ते कलावंत फोर्डबरोबरच म्हातारे होत आले आहेत. परंतु हयात असणाऱ्या आणि काम करण्याची ताकद असणाऱ्या सर्व जुन्या सहकाऱ्यांना काम दिलेच पाहिजे, असा त्याचा निर्मात्याशी करार झालेला असतो.

ही मंडळी 'शूर' आहेत असे फोर्ड मानीत आला आहे आणि शौर्याचा आणि वीरतेचा तो उपासक आहे!

### अमेरिकेचे भालजी

आपल्या प्रत्येक चित्रात वीर पुरुषांच्या कथा आजवर तो मोठ्या तळमळीने रंगवीत आला आहे. कलात्मक पातळी समतोल राखण्याच्या कौशल्यामुळे त्याचे चित्रपट प्रचारी थाटाचे वाटत नाहीत. वीरश्रीयुक्त आणि ध्येयप्रवण अशी त्याची चित्रे ही राष्ट्राची एक अमोल संपत्ती म्हणून मानली गेली आहेत! त्याचा पिंड केवळ कलाकाराचा नसून तो विचारवंताचा, देशभक्ताचा आहे!

आपल्या राष्ट्राच्या इतिहासात जे जे काही मंगल, लोकोत्तर, लोभसवाणे, चिरंतन स्वरूपाचे आहे त्याचे चित्रण आत्मविश्वासाने, सातत्याने करीत राहणे ही फोर्डची कामगिरी बिनतोड स्वरूपाची आहे असे महाराष्ट्रात तरी आपणास म्हणता येत नाही. फोर्डचा चित्रपट पाहाताना मला नेहमी ख्यातनाम दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांच्या चित्रांची आठवण येते–मराठेशाहीतील शूर पुरुषांच्या कथा तेही वर्षानुवर्षे जागृत निष्ठेने चितारीत आले आहेत.

राष्ट्राच्या अन्तःकरणाला पाझर फोडण्याचे आणि त्यामधून सदाचारी निर्मल जीवनप्रवाह निर्माण करण्याचे सामर्थ्य विचारवत देशभक्तात आणि प्रज्ञावंत कलाकारात सामावलेले असते.

आदर्शवादाची जागा व्यवहारवाद झपाटचाने घेत असताना चांगल्या चित्रकृती दुर्मिळ झाल्या असल्या तरी चांगल्या चित्राची प्रेक्षकावरील मोहिनी आणि पकड कायम आहे !

दिग्दर्शक जॉन फोर्ड या शब्दांनी केवळ लोकप्रियता मिळविली नसून दबदबा निर्माण करणारी ती एक मुद्रा ठरली आहे. प्रेक्षकाना हवे आहे म्हणून आपल्या कलाकृतीचा दर्जा उतरविण्याची त्याची केव्हाही तयारी नसताना देखील कलाक्षेत्रातील त्याचा भाग्यकाल अद्याप संपलेला नाही !

आपल्या चित्रपटाच्या उद्घाटनाला तो आतापावेतो कधीही हजर राहिलेला नाही. इतकेच नव्हे तर अकादमीची इतकी बक्षिसे त्याला मिळाली ती घेण्यास तो स्वतः एकदाही हजर राहिला नाही. बक्षिसे त्याच्याकडे पोस्टाने रवाना करण्यात येत होती !

**जॉन फोर्ड स्टॉक कंपनी**

त्याच्या अलीकडच्या नवीन चित्रपटाचे चित्रीकरण चालू असतानाची गोष्ट. स्टट कामे करणारी सर्व धाडसी जुनी एक्स्ट्रॉ मडळी मैदानावर ओळीने उभी करण्यात आली होती. बाजूस त्यांची घोडीही तयार होती. फोर्डसाहेब हजर झाले तेव्हा त्याना त्याचे काही आवडते चेहेरे त्यांत दिसेनात. मॅनेजरला बोलावणे गेले. एकंदर मामला गरम दिसतो आहे हे लावून ओळखून तो बिचारा अगदी घावरून गेला. उंच आवाजात हजेरी घेण्यास सुरुवात झाली.

इतक्यात एक वृद्ध कलावंत रांगेमधून दोन पावले पुढे आला आणि नम्रतेने म्हणाला, " मॅनेजरसाहेबाची काही चूक नाही. गेल्या दोन वर्षांत आमच्यातील सहाजण परलोकात गेले आहेत; म्हणून गैरहजर आहेत."

हे ऐकताच फोर्डची नेहमी ताठ असलेली मान काही क्षण खाली झुकली घोगऱ्या आवाजात तो पुटपुटला, "असो, आता तुम्हा उरलेल्यात घोड्यांवर स्वार अजून कोण कोण होऊ शकतो ते दाखवा पाहू."

सगळे म्हातारे तरुणाच्या चपळाईने घोड्यांवर स्वार झाले. बावटळीसारखी निघालेली त्याची घोडदौड पाहात असताना फोर्डचे अन्तःकरण विद्ध झाले. आपला काळा चष्मा त्याने काढून घेतला. रुमालाने डोळे पुसू लागला.

गायीकडे वासरू जसे वेगाने धावत येते त्याप्रमाणे समोरच्या टेकडीला नागमोडी वळणे घेत घोडेस्वार वेगाने परत येत होते.

त्याच्याकडे मोठ्या कौतुकाने पाहात तो उभा होता !

कलाचातुरी आणि कर्तबगारी याच्या जोडीला उदार अन्तःकरण आणि सहकाऱ्याबद्दल वत्सल भावना इथे एकत्र नांदताना दिसत होती म्हणून त्याची चित्रे इतकी यशदायी ठरली– ठरत आहेत ! ● ● ●

---

[पान ३७ वरून चालू]

छिद्रामधून बकऱ्याकडे पाहायला इंदूताई धडपडत होत्या. भिंतीवर जिथं आढ्याशी पत्रा ठोकला होता, तिथं एक अगदी बारकं छिद्र. चिरंजीव मोहनराव चवड्यावर उभे राहात, त्या छिद्रातून एक डोळा बारीक करून एका डोळ्यान बाहेर पाहात होते. मुंबईकर एकदा त्या दपतीजवळ जात होते, एकदा मोहनजवळ जाऊन त्याला दूर ढकलीत होते. मोहन त्याना शूत् म्हणून चापीत होता. कारण त्याच्याजवळ 'सर्वांनी गप्प बसावं', अशा अर्थाचा जयतरावाच्या आज्ञेचा ताम्रपट होता !

बकरू बहुधा झोपी गेलं असावं. जयतरावानी एकदा त्याच्यावर टॉर्च टाकला. ते हातपाय गुडाळून पहुडल होतं. बाबूनं त्याच्याकडे एक धोंडा फेकला. बाबूचा नेम अगदी बरोबर ! ताडदिशी उठून बकरू बेंबटायला लागलं. आम्ही सगळे याचीच वाट पाहात होतो. कारण बकरू आरडल्याशिवाय वाघापर्यंत ती बातमी पोचायची कशी, अन् तो जिभल्या चाटीत, जामया देत, शेपूट आपटीत यायचा कसा ?

आता सगळ जुळलं. थांबून थांबून बकरू बेंबटू लागलं. जयतराव बंदूक ताणून तयार होते. बाहेर बाबूनं बकऱ्याकडे बदूक रोखली होती. माझी स्थिती थोडी अवघड झाली होती खरी. कारण उकिडवं बसूनबसून नडग्या दुखू लागल्या होत्या. मग घोडा एक पाय उचलून उभा राहातो, तसा मी एकदा या पायावर अन् मग त्या पायावर अशी कसरत करू लागलो. पण मीही कॅमेरा सरसावलाच होता. वाघ येण्याचा अवकाश. ते ताबडतोब कळल असत. बकरू केविलवाणं ओरडल असतं. वाघाच गुरगुरणं ऐकू आलं असत. मग त्याची झेप कळली असती. ताडदिशी ती उभा राहून फोटो ठोकला असता. तत्क्षणी जयतरावाच्या बदुकीतून गोळी सुटली असती. तिनं काम भागलं नसतं, तर बाबूनं बार काढला असता.

वारा वाहायचा थांबला. लांब खाली कुतरी थोडथोड्या वेळानं भुंकत राहिली. मधूनच डोंगरावर एक रानपाखरू आरडल. वेळ जात चालला. गुरु मगळ मघाशी या इथं होते, आता त्या तिथ गेले. बाबूजवळची बॅटरी घेऊन घड्याळ पाहिलं. साडेअकरा झाले, चाण्डाळ वाघ काही आला नाही !

त्याचं काय जात होतं ? एका सुविख्यात वर्तमानपत्राचा संपादक नेम धरून बसला होता. शिकारी करता करता म्हातारा झालेला एक तरबेज शिकारीही बंदूक पेलून तयार होता. मुख्य गोष्ट म्हणजे मी ! एवढा उत्तम छायाचित्रकार ! कॅमेरा नीट जोखून माप घेऊन सरसावून टपून होतो. वाघाच काय बिघडत होतं ! त्याचा फोटो छापून नसता आणला एव्हापर्यंत ?

पण तो नतद्रष्ट आलाच नाही. बारा वाजून जाऊन अर्धा पाऊणतास झाला, तरी तो फिरकला नाही. बकरूही बेंबटून बेंबटून पुनः मुडपून झोपी गेल. त्याच्यापर्यंत येऊन वास्तपुस्त करण्याचे कष्टही वाघानं घेतले नाहीत ! शेवटी जयंतरावाची हाक ऐकू आली.

"काय हो दाण्डेकर, चलायचं का परत ?"

ते बाहेर आले. मोहनन ही सधी साधून पाहुण्यावरचा राग काढून घेतला.

" सारखे माझ्या अगात बोटं काय खुपशीत होतात ?"

तो गांगरून म्हणाला,

"अहो मी वाघ आला का म्हणून विचारीत होतो !"

मी विचारलं,

" आता या चार्ज केलेल्या कॅमेऱ्याचं काय करू ?"

जयंतराव मिस्किलपणं हसत म्हणाले,

" आपल्याकडे डोळे मिचकावीत पाहात असलेल्या चांदण्यांचा फोटो घेऊन टाका !" ●

THE RISE AND FALL OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRER
यांच्या पुस्तकावर आधारित लेखमाला

## लेखांक सातवा

*१० एप्रिलला सार्वमताच्या आवरणाखाली ऑस्ट्रियाचे साग्रसंगीत श्राद्ध पार पडल्यावर, फक्त अकरा दिवसांनी ह्मणजे २१ एप्रिलला हिटलरने जनरल कायटेलला आपल्या खोलीत बोलावले व आज्ञा दिली—*

*" हिरवी फाईल घ्या ! "*

*झेकोस्लोव्हाकियाची नवीन कुंडली या फायलीत होती !*

*—' माणूस ' १-१०-६४*



५ नोव्हेंबर १९३७ ला सायंकाळी हिटलरने आपल्या सेनाधिकाऱ्यांपुढे जे गुप्त भाषण केले ( त्याचा वृत्तांत हॉसबॉच याने लिहून ठेवलेला आहे ), त्या बैठकीत झेकोस्लोव्हाकियाची कुंडली त्याने स्पष्ट केली होती. त्या भाषणात त्याने सांगितले होते की, झेकांवरचा हल्ला हा विजेच्या चमचमाटाप्रमाणे निमिषार्धात उरकावा लागेल. याचप्रमाणे ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकिया यांच्या विरुद्ध करावयाची कारवाई ही १९३८ साल संपण्यापूर्वी उरकावी लागेल, असाही निश्चय त्याने केलेला होता. अर्थातच एप्रिल १९३८ मध्ये ऑस्ट्रियाचा प्रश्न निकालात निघताच हिटलरने आपला मोर्चा झेकोस्लोव्हाकियाकडे वळवला यात नवल नाही.

२१ एप्रिल १९३८ ला सायंकाळी जनरल कायटेल व हिटलरचा नवा लष्करी ए. डी. सी. रुडॉल्फ श्मद ( Schmundt) यांनी ' हिरवी फाईल ' या गुप्त नावाखाली झेकोस्लोव्हाकियावरील हल्ल्याचा संपूर्ण आराखडा तयार असलेली फाईल फ्यूररपुढे ठेवली. हिटलरने प्राथमिक चर्चेतच त्यांना एक दोन गोष्टी स्पष्ट केल्या.

(१) झेकोस्लोव्हाकियाशी वाटाघाटीचा घोळ घालून लष्करी हल्ला करावयास, आयत्यावेळी एखादे जुजबी कारण प्रथम निर्माण करावे लागेल.

(२) प्रत्यक्ष हल्ला हा आपण निमिषार्धात आटोपला, तरी जगात गडबड उडाल्याशिवाय राहणार नाही. या दृष्टीने त्यापुढल्या चार दिवसात काय काय घडू शकेल याचा निश्चित अंदाज घ्यावा लागेल.

### झेकोस्लोव्हाकियाचा जन्म

ज्या झेकोस्लोव्हाक प्रजासत्ताकावर प्रहार करण्यास हिटलर आता उद्युक्त झाला होता. हे प्रजासत्ताक कुणी निर्माण केले ? हा देश कसा जन्म पावला ? पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्यावर त्याची दोस्तांनी जी लांडगेतोड केली त्यातूनच या देशाचा जन्म झालेला होता. तोमास मासारिक (Tomas Masaryk) व एड्यूअर्ड बेनेस ( Eduard Benes ) या दोन झेक सुशिक्षित व चलाख माणसांनी आपल्या कल्पनाविश्वातून या देशाची निर्मिती केली. हंगेरी, रशिया व जर्मनी या देशांतील जनतेशी रक्ताची नाती असलेले तीन वंशांचे लोक या देशात एकत्र आले होते. बोहेमियर व मोराव्हिया हे जर्मनीचे भूभाग, स्लोव्हाकिया हा रशियाशी नाते असलेला स्लाव्ह वंशाचा भूभाग आणि उरलेला झेक बहुसंख्य लोकांचा, हंगेरीचा भूभाग अशी या देशाची तीन छकले होती. या देशाला अशाकरता जन्माला घातले होते, की मध्य–युरोपात स्वित्झर्लंडप्रमाणे हे आणखी एक बहुभाषिक व बहुवंशिक राष्ट्र असावे. तेवढाच जर्मनीच्या व रशियाच्या पायात अडसर. हे राष्ट्र जन्माला येताच या राष्ट्राचा खऱ्या अर्थाने जो राष्ट्रपिता तोमास मासारिक हा त्याचा अध्यक्ष झाला व बेनेस हा परराष्ट्रखाते पाहू लागला. १९३५ साली तोमास मासारिक हा मृत्यू पावल्यानंतर एड्युअर्ड बेनेस हा या राष्ट्राचा दुसरा अध्यक्ष झाला.

ज्या वेळी, म्हणजे १९३८ साली या राष्ट्राकडे हिटलरने आपली नजर फिरवली तेव्हा या राष्ट्राला जन्माला येऊन पुरी वीस वर्षे झालेली होती. तीन भिन्न राष्ट्रीयत्वांचे एक घेडगुजरी राष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न या वीस वर्षात वांझोटे ठरले होते. या देशात नांदणाऱ्या तीन वांशिक जमाती देशाबाहेरच निष्ठा ठेवून होत्या. असे

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री



जे प्रश्न असतात त्यांना सोपे नाव असते. 'अल्पसंख्यांकांचा प्रश्न !' १० लाख हंगेरियन लोक हंगेरीकडे नजर लावून काळ कंठीत होते. पाच लाख रूथेनिअन्स रशियाशी नाते जोडण्यास आतूर होते. तीस लाख सुडेटन जर्मन्स हे हिटलरच्या वाटेकडे डोळे लावून होते. पंचवीस लाख स्लोव्हाक्स हे स्लाव्ह वंशाचे असून झेक लोकांनी देशावर राज्य करावे या गोष्टीला त्यांचा विरोध होता. त्यांना स्वायत्तता हवी होती. एक कोट लोकसंख्येची ही प्रमुख छकले होती.

या सर्व लोकांना सांस्कृतिकदृष्ट्या एकत्र आणण्यासाठी काही प्रयत्न होत होता का ? नाही. प्रत्येक जमातीच्या शाळा वेगळ्या, देवस्थाने वेगळी, सण समारंभ वेगळे होते. मासारिक आणि बेनेस यांनी या अल्पसंख्याकांना जी आश्वासने दिली होती ती पाळली गेली नाहीत. राज्यकारभारात या अल्पसंख्याकांना आवाजच नाही ही सर्वांची तक्रार होती.

### सुडेटन जर्मन पार्टी

प्राग या राजधानीमधून बेनेस आता या देशावर राज्य करीत होता. त्याच्या दुर्दैवाने याच सुमारास जर्मनीचे एकीकरण होऊन हिटलरच्या दुंदुभी झडू लागल्या होत्या. झेकोस्लोव्हाकियातील सुडेटन जर्मनांना असे वाटू लागले, की आपल्या बहुसंख्य वस्तीचा भूभाग हा जर्मनीला जोडला जावा. कोनराड हेनलीन ( Konrad Henlein ) याच्या नेतृत्वाखाली सुडेटन जर्मन पार्टी हा राजकीय पक्ष जन्माला आला. या पक्षाला आर्थिक मदत कुठून येत होती ? जर्मनीच्या झेकोस्लोव्हाकियातील परराष्ट्र कचेरीतून सालीना १८०००० मार्कस् येवढी रक्कम या पार्टीच्या नावे जमा होत होती. ज्या वेळी

ऑस्ट्रियांत जर्मन सैन्य आले. त्या वेळी या पक्षाला तीन वर्षे झाली होती. पक्षाचा जोर अतिशय वाढलेला होता.

२८ मार्च १९३८ ला म्हणजे हिटलरने व्हिएन्नात प्रवेश केल्यानंतर बरोबर चौदाच दिवसांनी हेनलीन हा हिटलरला भेटण्यासाठी बर्लिनला गेला. तीन तास ही भेट चालू होती. त्यावेळी रिबेन्ट्रॉप व हेस हे दोघेही हजर होते. हिटलरने सल्ला दिला—

" Demands should be made by the Sudeten German Party which are unacceptable to the Czech Govt. "

[ सुडेटन जर्मन पक्षाने अशा राजकीय मागण्या पुढे कराव्यात की ज्या स्वीकारणे झेक सरकारला अशक्य होईल. ]

हेनलीन परत गेला व त्याने सुडेटन जर्मनांसाठी स्वयंनिर्णयाचा हक्क मागण्यास सुरुवात केली. सुडेटन जर्मनांची चळवळ जोर करू लागताच ३ मे १९३८ ला जर्मनीचा इंग्लंडमधील वकील डर्कसेन (Dirksen) याला ब्रिटिश परराष्ट्रमंत्री लॉर्ड हॅलिफॅक्स यानी कळविले, " आमचे ब्रिटिश सरकार, लवकरच बेनेसला असे कळवणार आहे, की त्याने सुडेटन जर्मनाच्या मागणीचा सहानुभूतीने विचार करावा, " प्रत्यक्षात ७ मे १९३८ ला प्रागमधील ब्रिटिश व फ्रेंच वकिलानी बेनेसला हा सल्ला देऊन टाकला.

बर्लिनमध्ये हिटलरने रिबेनट्रॉपच्या हातावर टाळीच दिली. ब्रिटिश व फ्रेंच सरकार असे काहीतरी करतील अशी त्याची अपेक्षाही नव्हती.

हेनेलीन आता इंग्लंडला यावयास निघाला. वाटेत त्याने रिबेन्ट्रॉपची गाठ घेतली. इंग्लंडमध्ये त्याने काय सूर लावायचा याच्या सूचना त्याला मिळाल्या. हेनेलीनला असे सांगण्यात आले, की लंडनमधील आपल्या वास्तव्यात त्याने, ' झेक सरकारची राजवटच कोसळण्याच्या मार्गावर आहे, ' असे वारंवार सांगावे. यामुळे झेकांच्या मदतीला जाण्याचा इंग्लंडचा उत्साहच मावळेल. त्याचप्रमाणे हेनलीनच्या मागण्या या बर्लीनहून सूचना येईल त्याप्रमाणे माडण्यात येतात ही गोष्ट खोटी असल्याचे त्याने जाहीर करावे.

हेनलीनला लंडनला पाठवून इकडे लगोलग हिटलरने झेकोस्लोव्हाकियावर हल्ला करण्यासाठी किती सैन्य लगेच तयारीत आहे, याची O. K. W. संघटनेकडे चौकशी केली. उत्तर आले, " दहा इनफन्ट्री डिव्हिजन्स यासाठी तयार आहेत, "...१६ मे १९६४

### उचललेले पाउल मागे घेतले

सुडेटन जर्मन मुलुख हा डोंगराळ मुलूख होता. या भागात झेक सरकारने फ्रेंच मॅजिनॉट तटबंदीप्रमाणे झेक मॅजिनॉट तटबदी बांधून पुरी केलेली होती. ही तटबंदी अत्यंत मजबूत आहे व सैन्याला प्रखर प्रतिकार घडेल अशी गुप्त माहिती जनरल झेट्झ्लर (Zeitzler) याने फ्यूररला पुरवली.

२० मे १९३८ ला जनरल कायटेल याने हिटलरशी या प्रश्नावर महत्त्वाची चर्चा केली. दोघानी परिस्थितीचा आढावा घेतला. झेकोस्लोव्हाकियाच्या मदतीला मुख्यत: फ्रान्स व रशिया येण्याची शक्यता होती. त्याचप्रमाणे फ्रान्सपाठोपाठ ब्रिटनही झेकांच्या मदतीला येणार यात संशय नव्हता. हंगेरी व पोलंड ही दोन राष्ट्रे झेक सरकार कोलडमताच, सरहद्दीलगतचा आपापला प्रदेश बळकावल्याखेरीज राहणार नाहीत हीही शक्यता होती.

हिटलर व कायटेल याचे याबाबत एकमत झाले, की फ्रान्स बहुधा इकडची काडी तिकडे करणार नाही. म्हणून पश्चिम सरहद्दीवर फारसे सैन्य न ठेवता सर्व सैन्य झेकोस्लोव्हाकियाच्या सरहद्दीवर आणण्यास हरकत नाही. लुत्वाफच्या सहाय्याने पहिलाच दणका इतका जबरदस्त द्यावयाचा, की हल्ला सुरू झाल्यासून ४८ तासात फौजा बोहेमिया व मोराव्हिया सर करून मागच्या दिशेने दौडत सुटल्या पाहिजेत.

जर युद्धाला तोंड लागलेच तर फ्रान्सची युद्ध घोषणा होण्यापूर्वीच जवळजवळ झेकोस्लोव्हाकिया हा देशच जगाच्या पाठीवरून नाहीसा करावयाचा व सैन्य पुन्हा फ्रेंच सरहद्दीकडे नेण्यासाठी मोकळे करावयाचे.

कशी कुणास ठाउक, पण हिटलर झेकोस्लोव्हाकियावर हल्ला करणार आहे ही वार्ता सर्वत्र पसरली. जर्मन फौजाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत असेही वर्तमानपत्रात छापून येऊ लागले.

१९ मे ला ' लिपृझिग् ' येथून प्रसिद्ध होणाऱ्या पत्रात खालील बातमी आली,

" जर्मन फौजा झेक सरहद्दीकडे निघालेल्या आहेत. सुडेटन जर्मन नेता हेनलीन हा १४ मे ला इंग्लंडहून परतला, तो अद्याप बर्लिनलाच आहे. "

या नवीन दहशती वातावरणाचा परिणाम लगेच दिसून आला. २० मे ला रात्री बेनेस याने प्रागमध्ये मंत्रिमंडळाची खास बैठक घेऊन देशात ताबडतोब सैन्यभरती करण्याचा निर्णय घेतला. बेनेसची ही हालचाल, बर्लिनमध्ये फ्यूररला कळली तेव्हा तो मनात म्हणाला की झेकांच्या देशात अपेक्षेप्रमाणे गडबड तर सुरू झाली !

: बर्लिनमधील इंग्लिश वकील सर हेडरसन याने जर्मन परराष्ट्र वकिलातीत जाऊन लॉर्ड हॅलिफॅक्स यांचा निरोप रिबेन्ट्रॉपच्या कानावर घातला, की परिस्थिती चिघळत आहे.

सर हेडरसन यानी हॅलिफॅक्सचा हा निरोप जर्मन सरकारला कळवताच, बर्चेसगार्डन येथे गेलेल्या फ्यूररचे विचार जागतिक युद्धाच्या विचाराकडे वळले. याचा अर्थ बेनेसच्या मदतीला फ्रान्स व पाठोपाठ इंग्लंड येणार असा होत होता. म्हणजे युद्ध अटळ होते ! काहीतरी कारण घडेपर्यंत झेकोस्लोव्हाकियात सैन्य घुसणार नाही असा निर्णय त्याने मनाशी घेतला असताना पॅरिस, लंडन व मॉस्को येथून त्याच्यावर आक्रमणासाठी सैन्याच्या हालचाली करण्याचे आरोप सुरू झालेले पाहून अर्थातच हिटलर संतापला. २३ मे ला जर्मन वकिलातीने बर्लिनमधील झेक वकिलाला कळवले, " जर्मन सैन्याच्या हालचाली सुरू झाल्याच्या बातम्या सर्वस्वी निराधार आहेत. झेकोस्लोव्हाकियाच्या बाबतीत असे काही करण्याची जर्मन सरकारला गरज काय ? "

हिटलरने एक पाऊल यावेळी मागे घेतले. इंग्लंड, फ्रान्स व बेनेस यांनी निःश्वास सोडले. हिटलरचे डावपेच या मुत्सद्याना अजून उमगू नयेत ना ?

### २ ऑक्टोबर १९३८ पूर्वी

आणखी ४।५ दिवस बर्चेसगार्डन येथे काढून २८ मे ला हिटलर बर्लिनला आला. आल्या आल्याच त्याने आपल्या सहकाऱ्याची बैठक बोलावली. गोअरिंग, कायटेल, ब्राउश, बेक, अॅडमिरल रीडर, रिबेन्ट्रॉप आणि न्यूराथ या निवडक मडळीसमोर हिटलरने घोषणा केली,

" It is my unshakable will that Chechoslovakia shall be wiped off the map. I have resolved to solve once & for all Sudeten question. I therefore order that preparation should be made for military action against the state by October 2.

[ नकाशातून झेकोस्लोव्हाकिया पुसून टाकण्याची माझी दुर्दम्य आकांक्षा आहे. हा सुडेटन प्रश्न कायमचा निकालात काढण्याचे मी ठरवले आहे. मी त्यासाठी अशी आज्ञा करतो, की या देशाविरुद्ध २ ऑक्टोबरला लष्करी कारवाई करण्याच्या दृष्टीने तातडतोब तयारी करण्यात यावी. ]

२ ऑक्टोबर १९३८ ही तारीख ही हिटलरने एकदा ठरवली मात्र आणि असंख्य संकटे उभी राहिली, अडथळे आले, युद्धाच्या खाईत जग लोटले जाणार हे दिसू लागले; परंतु हिटलरने ही तारीख चुकवली नाही. १ ऑक्टोबर १९३८ लाच जर्मन फौजा प्रागमध्ये शिरल्या. मध्यंतरी काय घडले ते पाहू.

बैठकीत जनरल बेक याने हिटलरचा निर्णय ऐकला आणि तो हतबुद्ध झाला. ५ मे १९३८ लाच त्याने कमांडर-इन-चीफ ब्राउश ( Brauchitsch ) याला झेकोस्लोव्हाकियाबाबत गुप्त टिपण सादर केले होते. यात त्याने आपले मत सांगितले होते ते असे—

" जर जर्मनीने झेकांवर हल्ला केला तर त्यातून जागतिक युद्ध भडकेल. ब्रिटन, फ्रान्स, रशिया ही तीन राष्ट्रे जर्मनीला प्रत्यक्ष विरोध सुरू करतील व या राष्ट्रांना शस्त्रास्त्रांची प्रचंड प्रमाणावर मदत अमेरिकेकडून केली जाईल. अशा या युद्धात जर्मनीला यशाची मुतराम आशा नाही. "

बेकचे हे मत झेकोस्लोव्हाकियाबाबत खोटे ठरले तरी पुढे पोलंडच्या बाबतीत ही भविष्यवाणी खरी ठरली. म्हणजे बेकच्या म्हणण्यात बराच तथ्यांश त्या वेळीही होता.

२८ मे या दिवशी जेव्हा हिटलरने झेकोस्लोव्हाकियावर हल्ला करण्यासाठी २ ऑक्टो. चे वेळापत्रकच जाहीर केले, तेव्हा जनरल बेक अस्वस्थ झाला. त्याने ३ जूनला ब्राउशला पुन्हा कळवले,

The new directive is militarily unsound and the Army General Staff has rejected it".

[ हिटलरचा नवा आदेश हा लष्करीदृष्टचा साफ चुकीचा आहे व जनरल स्टाफला तो स्वीकारता येत नाही. ]

जनरल बेकचे हे मत स्पष्टपणे ब्राउश, फ्यूररला सांगत होता का ? याचे उत्तर ' नाही ' असे येते. बेकचे म्हणणे जसेच्या तसे त्याने हिटलरला सांगितले नाही, तरी चर्चेच्या वेळी हिटलरला त्याने काही शंका खास विचारल्या असल्या पाहिजेत. म्हणूनच १८ जूनला, ' हिरव्या फाइलीत ' फ्यूररचा नवा आदेश दाखल झाला.

" There is no danger of war against Germany. I will decide to take action only if I am firmly convinced that France will not march and that, therefore, England will not intervene. "

[ जर्मनीविरुद्ध युद्ध सुरू होण्याची शक्यता नाही. फ्रान्स आपली सैन्यें झेकोस्लोव्हाकियाच्या मदतीकरता, जर्मनीत घुसवणार नाही व यामुळे अर्थातच ब्रिटनही मध्ये पडणार नाही, अशी जेव्हा माझी



बेनेस

खात्री होईल तेव्हाच मी झेकांवरच्या हल्ल्याचा अंतिम निर्णय घेईन ].

परंतु फ्यूररची पहिल्यापासूनच येवढी खात्री होती, की फ्रान्स काहीही करणार नाही. त्यामुळे जागतिक युद्धाचे भयही खरे नाही. त्यामुळे हा नवा आदेश देऊनही हिटलरने O. K. W. संघटनेला झेकोस्लोव्हाकियावरील हल्ल्याबाबत सर्व तयारी पुढे रेटण्याची घाई चालवली.

### हिटलरविरुद्ध सेनानी

जनरल बेकला आता राहवेना. अखेरचा प्रयत्न म्हणून १६ जुलैला त्याने ब्राऊशसाठी पुन्हा टिपण तयार केले.

" जनरल स्टाफच्या सर्व अधिकाऱ्यांचे असेच मत आहे, की झेक प्रश्न सैन्याच्या मदतीने सोडवण्याचा विचार सोडून देण्यात यावा. सैन्याच्या बळावर प्रश्न सोडविण्याची ताकद अजून आलेली नाही."

हे टिपण घेऊन बेक स्वतः ब्राउशकडे गेला. त्याने ब्राउशला सांगितले, " फ्यूररने जर सैन्याधिकाऱ्यांचा हा सल्ला ऐकला नाही तर सर्व अधिकाऱ्यांनी आपले राजीनामे सादर करावेत. जर सैन्याचे नेतृत्व करायला आपण जाग्यावर नसलो तर फ्यूरर युद्ध कुणाच्या बळावर करील ?"

या प्रश्नामागे एक सनातन प्रश्न उभा राहिलेला होता. सुप्रीम कमांडर म्हणून जी कुणी शक्ती असेल, मग तो हिटलरप्रमाणे सैन्यप्रमुख व सर्वाधिकारी असो वा पंतप्रधान असो वा देशाचे पार्लमेंट असो, सेनाधिकाऱ्यांनी वरून आलेले आदेश फक्त पाळावयाचे हेच तत्त्व स्वीकारले पाहिजे काय ? त्यांच्यावर जबाबदारी असते ती ओळखून जर त्यांची सदसद्विवेकबुद्धी त्यांना सांगू लागली, की हा आदेश अन्यायकारक आहे वा चुकीचा आहे तर त्याप्रमाणे वागण्याचे

स्वातंत्र्य सेनाधिकाऱ्यांना आहे की नाही ? जर्मनीच्या पराभवानंतर पुढे न्यूरेम्बर्ग खटल्यात सर्व युद्ध आरोपींनी एकच गोष्ट सांगितली, की आम्ही जे केले ते फ्यूररच्या आज्ञेनुसार ! ही आज्ञा काय आहे, चुकीची आहे की बरोबर हे पाहण्याचे काम सेनाधिकाऱ्यांना करावयाचे नसते. आलेली आज्ञा पार पाडणे एवढेच त्याचे कर्तव्य असते. सबब आम्ही निर्दोष आहोत.

आरोपीचा हा जबाब कोर्टाने ग्राह्य मानला नाही व सर्वांच्या मानेभोवती फाशीचा फास आवळण्यात आला. त्याचा आवाज बंद झाला, म्हणून त्यांनी निर्माण केलेला प्रश्न मात्र सुटलेला नाही. काश्मीर युद्धबंदीरेषेवर हिंदी फौजा थांबविण्याचा निर्णय दिल्लीत घेतला गेला. आज जवळजवळ १७, १८ वर्षांनंतर प्रत्येकजण हे म्हणत आहे, की हा निर्णय अयोग्य होता. पण हा चुकीचा निर्णय सैन्याने पाळलाच ना ? मग याकरिता या सेनाधिकाऱ्यांना कुणी दोषी ठरवील काय ?

जनरल बेकने आपला प्रश्न ब्राउशला विचारला तो याच दृष्टिकोनातून. सर्व सेनानींनी राजीनामे दिले तर फ्यूररला काय करता येईल ? परंतु ब्राउशचा पाठिंबा बेकला मिळेना. त्याने अखेर १६ जुलैला फ्यूररची गाठ घेतली व आपले विरोधी मत नोंदवले.

हिटलरला सैन्यात काय शिजत आहे याचा थोडासा सुगावा यामुळे लागला. त्याने यावर काय उपाय केला ? जनरल स्टाफखेरीज सर्व तरुण जनरल्सची एक खास बैठक १० ऑगस्टला बर्गहॉफ ( Berghof ) येथे बोलावण्यात आली. जनरल जोडल व जनरल मॅनस्टीन हे दोघे या बैठकीला हजर होते. यापैकी जोडल याने या बैठकीचा वृत्तान्त लिहून ठेवला आहे.

" फ्रेंच सरहद्दीवर यावेळी जनरल अॅडॅम होते. झेकांवरील हल्ल्यासाठी सैन्य निघून गेल्यावर त्यांच्या आधिपत्याखाली फक्त पाच डिव्हिजन्स एवढे सैन्य उरणार होते. फ्रेंचांचा प्रतिकार एवढ्या तुटपुंज्या सैन्याने करणे शक्य नाही ही गोष्ट ५ ऑगस्टला त्यांनी फ्यूररला कळवली होती. या बैठकीला त्यांचा तरुण सहकारी जनरल विटरशीम ( Weitersheim ) हा हजर होता. त्याने जनरल अॅडॅमच्या शंकेचा उच्चार फ्यूररपुढे केला. तो म्हणाला, " तीन आठवडे देखील आपले सैन्य फ्रेंचांपुढे टिकाव धरणार नाही." यावर फ्यूररने आत्मविश्वासाने सांगितले,

" I say to you, Herr General, the position will be held not only for three weeks but for three years ".

[ तीन आठवडेच काय पण तीन वर्षे फ्रेंचांना आपण दाद देणार नाही. ]

हिटलर हे सर्व कशाच्या जोरावर म्हणत होता ? सैन्यात एकदा पराभूत मनोवृत्ती शिरली तर पराक्रमाची कामेच थंडावतात, हे सूत्र त्याला माहीत होते. अंगावर येईल ते शिंगावर घेऊ या जिद्दीनेच सैन्याने वागले पाहिजे. यासाठी तो हे सांगत असावा. तो तसे पाहिले तर खोटेच बोलत होता. परंतु हिटलरच्या याच गुणाचा उपयोग पुढे पंतप्रधान चर्चिलने केलेला आपल्याला आढळून येईल. फक्त हिटलरने आपले गुण आक्रमणासाठी राबवले व चर्चिलने आक्रमण थांबवण्यासाठी.

## बेकचा राजीनामा

बेकला वारे कसे वाहात आहे याचा अंदाज आला. १८ ऑगस्ट १९३८ ला त्याने चीफ ऑफ आर्मी जनरल स्टाफ या आपल्या पदाचा राजीनामा दिला. बेकच्या या राजीनाम्याचे वृत्त त्यावेळी प्रसृत झाले असते तर त्याचे वाईट परिणाम होतील ही गोष्ट हिटलरने ओळखली. त्याने बेक व त्याच्या मताच्या सेनाधिकाऱ्यांना भेटीला बोलावले. त्याने बेकला जबाबदारीतून मुक्त केले, पण या राजीनाम्याचे वृत्त वर्तमानपत्रात वा कुठल्याही सरकारी दप्तरात येणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली.

बेक व त्याचे सहकारी यांनीही आपल्या राष्ट्रभक्तीला जागून, याबाबत बाहेर चकार शब्दही न सांगण्याचे अभिवचन फ्यूररला दिले. कारण शिरर सांगतो त्याप्रमाणे बेक हा विचारी आणि निश्चित तत्त्वाचा माणूस असला तरी कुठलीही अनुषंगिक क्लृप्ती करण्याची जिद्द त्याच्या ठिकाणी नव्हती. नाहीतर सर्व जनरल स्टाफ फ्यूररविरुद्ध असूनही राजीनाम्याच्या मार्गाने तो जाता ना.

बेकची अधिकारसूत्रे फ्रान्झ हालडर ( Franz Halder ) कडे आली. हालडर हा बेकच्याच मताचा असल्यामुळे त्याची शिफारस बेकनेच फ्यूररकडे केली.

हालडर हा एखाद्या प्रोफेसरसारखा दिसे. त्याच्या तोंडावर विद्येचे तेज होते. गणित व वनस्पतिशास्त्र या विषयाचा त्याचा खास अभ्यास होता. याचा अर्थ अत्यंत सुसंस्कृत असे मन त्याच्यापाशी होते. तो धर्माने कॅथॉलिक होता व श्रद्धाशील होता. याचा परिणाम असा झाला, की फ्यूररला अधिकारावरून उडवण्याचा जो पहिला कट पुढे झाला त्याचे नेतृत्व ओघानेच हालडरकडे आले.

## हालडर-बेक संधान

जनरल हालडर व बेक यांच्या मनात आता जर्मनीतील दुसऱ्या क्रांतीचे विचार मूळ धरू लागले. बेक हा राजीनामा देऊन मोकळा झालेला असला तरी असंख्य निवृत्तसेनाधिकारी व चीफ ऑफ स्टाफचे सभासद यांच्याशी त्याची मैत्री होती. या सर्वांशी बेकने संधान ठेवावे व ज्या क्षणी हिटलर झेकोस्लोव्हाकियावर चाल करून जाण्याचा आदेश देईल, त्या क्षणी त्याला हालडरने बर्लिनमध्ये गिरफदार करून अधिकार आपल्याकडे घ्यावे, अशी क्रांतीची ढोबळ कल्पना मूळ धरू लागली.

बेकला इतिहासाचे ज्ञान होते. परंतु राजकारणातील डावपेचांची रंगत त्याला फारशी कळत नव्हती. हे ज्ञान हिटलरला होते. महायुद्ध भडकेल की नाही याबाबतचा बेकचा अंदाज म्हणूनच झेकांवरील हल्ल्याबाबत संपूर्ण खोटा ठरला व हिटलरच्या अंदाजाप्रमाणे रक्ताचा थेंब न सांडता त्याने प्रागमध्ये स्वस्तिक निशाण फडकविले. जगाच्या दृष्टीने बेक तात्पुरता चूक ठरला खरा. परंतु केवळ अकरा महिन्यांच्या अवधीत पुढे महायुद्ध भडकले. या अकरा महिन्यात जर्मनीने एवढी प्रचंड तयारी केली की बेक हा आणखी काही वर्षे चूकच ठरत गेला. शिरर सांगतो—

" General Beck had a sense of History but not of contemporay politics Hitler had. For sometime now, he had felt that Prime Minister Chamberlain would secrifice the Czechs rather than go to war and that in such a case France would not fulfill her obligation to Prague. "

चेंबरलेनसाहेब युद्ध करण्यापेक्षा झेकांचा बळी देतील आणि असे नेतृत्व इग्लडकडे असताना फ्रान्स, प्रागहून येणारा हंबरडा ऐकला न ऐकल्यासारखा करून आपल्या वचनाला हरताळ फाशील ही गोष्ट हिटलरला सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट कशी दिसू लागली ? लंडनमध्ये काय वारे यापूर्वीच्या दोन तीन महिन्यात वाहत आहेत याचा पूर्ण अभ्यास फ्यूररने केला होता. आणि म्हणूनच केवळ स्वत:च्या आत्मविश्वासावर २ ऑक्टोबर उजाडण्यापूर्वी झेकोस्लोव्हाकियाचा फडशा पाडण्याचा आपला कार्यक्रम पुरा पाडण्याचा त्याचा निश्चय होता.

आता इग्लडमध्ये काय घटना घडल्या होत्या त्या पाहू. १४ मे या दिवशी ॲस्टर साहेबाच्याकडे जेवताना चेंबर्लेन साहेबानी असे सागितले होते, की झेकोस्लोव्हाकियाचे स्वरूप आहे या स्थितीत राहणे ब्रिटनला शक्य वाटत नाही. सुडेटन लँड हा भूभाग जर्मनीला द्यावा लागेल.

हे वृत्त वर्तमानपत्रानी प्रसिद्ध करताच कॉमन्स सभागृहात त्यांच्यावर विरोधी पक्षयानी प्रश्नांचा भडिमार केला. चेंबर्लेनसाहेबानी आपले मत जाहीरपणे पुन्हा सागितले नाही.

१ जून १९३८ ला लडनच्या 'टाइम्स' पत्रात अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्याचे शीर्षक होते, Self determination ( स्वयनिर्णय ). झेक सरकारने सुडेटन जर्मनाना स्वयनिर्णय देऊन टाकावा व याचा परिणाम हा भाग जर्मनीत जाण्यात झाला तरी हरकत नाही असे मत या पत्राच्या सपादकानी व्यक्त केले होते. 'टाइम्स'च्या या अग्रलेखाचा उगम चेंबर्लेन याच्या खासगी उद्‌गारात आहे, हे वृत्त जर्मन वकिलातीने हिटलरला कळवले होते.

मॉस्कोमधील जर्मन वकिलाने याच सुमारास कळवले होते की रशियात झेक प्रश्नाबाबत फारसे औत्सुक्य नाही. रशिया काही करीलसे दिसत नाही.

तीन ऑगस्टला चेंबर्लेन साहेबाचा खास प्रतिनिधी लॉर्ड रुनकिमन (Runciman) हा सुडेटन प्रश्नाबाबत मध्यस्थी करण्याकरता, प्रागमध्ये दाखल झाला. झेकोस्लोव्हाकियाच्या राजधानीत रुनकिमनसाहेब पोचले व त्यानी पत्रकाराना पाचारण केले. या पत्रकारात शिरर स्वत: होता. लॉर्ड रुनकिमन यांना आपण झेक सरकारच्या विनतीवरून पाठवीत आहोत असे विधान चेंबर्लेन यानी कॉमन्स सभागृहात २६ जुलैला केले होते, ही गोष्ट अर्थातच खोटी होती. लॉर्ड रुनकिमन याची मध्यस्थी झेकोस्लोव्हाकियावर लादण्यात आली, आता भाडण हे सुडेटन जर्मन व झेक सरकार याच्यातच राहिले होते कुठे ? आता तोड लागले होते ते बर्लिन-प्राग संघर्षाला ! मग प्रागमध्ये बसून रुनकिमन साहेब वाटाघाटी करणार कुणाशी ? याचा अर्थ असा, की झेक सरकारने विनातक्रार सुडेटन जर्मन भूभाग हिटलरला द्यावा यासाठी त्याचे मन वळवण्यासाठी चेंबर्लेनसाहेबाचा हा खास दूत आलेला होता.

या सर्व घटना हिटलरला दिसत होत्या आणि या सर्वांवरून त्याने रास्त तर्क केला होता तो हाच, की चेंबर्लेनसाहेब युद्धाला उभे राहणे शक्य नाही. कारण सुडेटन जर्मन भूभाग हा जर्मनीपासून वेगळा करून जर्मनीची जी लाडगेतोड झाली ती मूलत: अन्यायकारक होती या जाणिवेने, चेंबर्लेन हे हा भूभाग पुन्हा जर्मनीला परत करण्यास उत्सुक आहेत. असे असताना १८ ऑगस्टला जनरल बेक यानी राजीनामा दिला तेव्हा तो स्वीकारून जनरल बेकला परस्पर घडा देण्याची सधी हिटलर कशी गमावील ?

हिटलर आपले पुढील डावपेच खेळू लागला.

## हंगेरीसाठी गळ सोडला

२३ ऑगस्टला 'पॅट्रिया' (Patria) बोटीवर हिटलरने हंगेरीचा रीअर ॲडमिरल हॉर्थी व हंगेरियन सरकारातील अधिकारी याना खाना दिला. यावेळी हिटलरने, झेकोस्लोव्हाकियाचा खातमा होतच आहे व त्यात हंगेरीचा मुलुख हंगेरी का घेत नाही असे सुचविले. म्हणजे झेकोस्लोव्हाकिया सपल्यावर उद्या ज्या देशांशी आपल्या देशाची सरहद्द भिडणार, त्या देशाला त्याचाच भूभाग दान करून ओशाळे करण्यासाठी हिटलरने फासे टाकावयास सुरुवातही केली. यावेळी हिटलरने काढलेले उद्‌गार मोठे गमतीचे आहेत. हिटलर म्हणाला,

" He who wants to sit at the table must at least help in the kitchen. " [ ज्याला पाटावर बसायचे आहे त्याने स्वयंपाकघरातही थोडी मदत करायला हवी ]

O. K. W. च्या कचेरीत झेकोस्लोव्हाकियावरील लष्करी आगमनाची तयारी जारीने चालली होती. २४ ऑगस्टला जनरल जोडल याने लिहिलेली खालील सूचना वानगीदाखल पाहा.

" No advance measures may be taken before X minus 1 for which there is no innocent explanation as we shall appear to have manufactured the incident. "

यातील 'X' म्हणजे हल्ला करण्याचा दिवस. X उणे १ म्हणजे त्याआधीचा दिवस. या सूचनेत हे सागितले आहे, की आदल्या दिवशी आगाऊ अशी विशेष तयारी दृष्टोत्पत्तीस येता कामा नये. कारण याचा अर्थ असा होईल की जी घटना घडली म्हणून आपण झेकोस्लोव्हाकियात शिरत आहोत, ती घटना आपण योजनापूर्वक घडवून आणली असा सशयदेखील येऊ नये.

२६ ऑगस्टला हिटलरने जोडल, हिमलर याचेबरोबर पश्चिम सरहद्दीची पाहणी केली. जनरल ॲडॅम याने पुन्हा फ्रेंचाच्या शक्तीचा बाऊ करताच हिटलर कडाडून म्हणाला,

" The man who does not hold these fortifications is a scoundral. "

[ ज्या माणसाला ही तटबंदी लढवता येणार नाही तो एक हरामखोरच असला पाहिजे. ]

युद्ध होत नाही. फ्रेंच फौजा बराकीबाहेरही येणार नाहीत या खात्रीबरोबरच, युद्ध झालेच तर झेकोस्लोव्हाकियात गेलेल्या फौजा तिकडले काम उरकून तत्काल या तटबंदीकडे धाडू शकू या आत्मविश्वासावर हिटलरने हे उद्‌गार काढले होते.

## कटवाल्यांचे चर्चिलशी संधान

हिटलरला अर्थात याची कल्पना असेल का की चीफ ऑफ स्टाफ जनरल हालडर व जनरल बेक यानी हिटलरच्या उचलबागडीचा कट बराच पुढे रेटीत आणला होता ! या कटातील आणखी एक जनरल स्टुएल्प नागेल याने O. K. W. कडे विचारणा करून ठेवली होती की हल्ल्याची सूचना पूर्वी काही दिवस मिळणार आहे ना ! उत्तर आले की, होय, दोन दिवस आधी सूचना देण्यात येईल.

कटवाल्याची अपेक्षा अशी होती—

हिटलर फौजाना झेकोस्लोव्हाकियात घुसण्याचा आदेश देताच, इग्लंड, फ्रान्स ही राष्ट्रे युद्ध पुकारतील. जर्मन जनतेला व बहुसख्य वरिष्ठ सेनाधिकाऱ्याना युद्ध नको आहे. अशा परिस्थितीत हालडरने हिटरला कैदेत टाकून अधिकार हाती घ्यावेत व इंग्लंड, फ्रान्सला तावडतोब युद्ध बंद करण्याची विनंती करून झेकोस्लोव्हाकियातून जर्मन फौजा मागे घेऊन, जगाला युद्धाच्या खाईतून आपण वाचवावे.

याकरता इंग्लंडमध्ये युद्धाची तयारी होत आहे की नाही हे पाहण्याकरता एक खास कटवाला इंग्लंडमध्ये धाडण्यात आला. एवॉल्ड क्लीस्ट (Kliest) हा एक कटवाला १८ ऑगस्टला लडनमध्ये दाखल झाला. क्लीस्ट हा कटवाल्याचा मनसुबा ब्रिटिश सरकारच्या कानावर घालण्यासाठी गेला खरा, परतु जर्मनीतील इग्लिश वकील हेंडरसन याने इग्लडमध्ये गुप्त खलिता आधीच धाडलेला होता, की क्लीस्ट याचेशी सरकारीरीत्या सपर्क ठेवू नये ! यामुळे क्लीस्टची डाळ चेबर्लेनच्या निकटवर्तियात शिजेना. क्लीस्ट कोणाला भेटला असेल ? विन्स्टन चर्चिल यानी क्लीस्टला भेट घेऊ दिली ! क्लीस्टने सांगितले, " झेकोस्लोव्हाकियावर हल्ला करण्याचा बेत हिटलरने पक्का केला आहे. या बेताला बहुसख्य जर्मन सेनानीचा विरोध आहे. जर इग्लड व फ्रान्स हिटलरची मनधरणी न करता या सुडेटन प्रश्नाबावत ताठ धोरण ठेवतील तर हिटलर त्याच दिवशी उडवला जाईल. "

विन्स्टन चर्चिल यानी क्लीस्टजवळ कटवाल्यांसाठी एक स्वत च्या सहीचे पत्र दिले. त्यात चर्चिल यानी हमी दिली होती. " I am sure that the crossing of the frontier of Chechoslovakia by German armies will bring about renewal of the world war. England will march with France. " [ माझी खात्री आहे की ज्यावेळी जर्मन फौजा झेकोस्लोव्हाकियाची सरहद्द ओलांडतील तेव्हा पहिल्या जागतिक युद्धाची पुनरावृत्ती होईल. इग्लड फ्रान्सच्या जोडीने या युद्धात सामील होईल. ]

यावेळी चर्चिल हा विरोधी पक्षात होता. परंतु युद्ध सुरू झालेच तर ही कटवाली मडळी जर्मनीत क्रांती करून युद्ध तावडतोब बद पाडतील. हिटलरचाही कायमचा बदोबस्त होईल, या दूरदृष्टीने विन्स्टन चर्चिल यांनी हे पत्र दिले होते. तसे पाहता या पत्रात विशेष काय आहे ? फक्त यातली भूमिका ही चेबर्लेन याच्या भूमिकेशी शभर टक्के विरोधी आहे.

### ब्रिटिश परराष्ट्रमंत्र्याची अदूरदृष्टी

क्लीस्टने सागितलेली हकीकत जेव्हा लॉर्ड हॅलिफॅक्स या ब्रिटिश परराष्ट्रमत्र्याने ऐकली तेव्हा ते काय म्हणाले ? " याबाबतीत काहीतरी केले पाहिजे. परंतु क्लीस्ट सांगतो त्यातला बराचसा भाग विश्वसनीय वाटत नाही. "

मग हॅलिफॅक्स साहेबानी काय केले, की जर्मनीतील ब्रिटिश वकील हेंडरसन यांना २८ ऑगस्टला विचारविनिमयासाठी लडनला बोलावले. हेंडरसन यांना हॅलिफॅक्स यांनी दोन सूचना केल्या.

१ हिटलरला कटाची सूचना द्या.

२ हिटलरबरोबर व्यक्तिगत संपर्क निर्माण करा. एकदा लागूलचालनाचे, प्रियाराधनेचे धोरण पत्करले की राजकारणात मुत्सद्याचा किती अध:पात होतो पाहा. क्लीस्ट हा कटाचा सूत्रधार मोठ्या विश्वासाने दारी आला असताना ब्रिटिश वकिलाने हिटलरला या कटाची बातमी देऊन कटवाल्यांचाच गळा कापावा व हिटलरची मर्जी सपादन करावी ही ब्रिटिश परराष्ट्रमंत्र्याची लागूलचालनी वृत्ती कुठे आणि अधिकारावर नसताना कटवाल्याना हाताशी धरून हिटलरचा काटा काढण्याच्या प्रयत्नाना साथ देणारी विन्स्टन चर्चिल याची चाणाक्ष बुद्धी कुणीकडे !

हेंडरसन यानी पहिली गोष्ट करण्यास शहाणपणाने नकार दिला व दुसरी सूचना मान्य केली. हेंडरसन यानी जो विवेक दाखवला त्याचमुळे केवळ कटवाल्याच्या माना फासातून सुटल्या.

परंतु ब्रिटिश परराष्ट्र राजकारणाची ही पूर्ण अधोगती हीच 'म्युनिक' येथील अंतिम शरणागतीची नांदी होती व हीच हिटलरच्या सर्वात मोठ्या रक्तविरहित लष्करी आक्रमणाची दुंदुभी होती.

हिटलरला अर्थात या कटाची दाद नव्हती. तो निश्चित होता एकाच गोष्टीवर, की चेंबर्लेन यानीच आता सुडेटन प्रात जर्मनीला देण्यासाठी झेक सरकारमागे लकडा लावला आहे. चेबर्लेन यानी मुद्दाम पाठवलेल्या लॉर्ड रुनकिमन याच्या प्रयत्नांना यश येऊन बेनेस यानी ५ सप्टेंबरला सुडेटन पुढाऱ्यांना वाटाघाटीस पाचारण केले.

सुडेटन जर्मन नेता हेनलीन याला शंका आली, की आपल्या सर्व मागण्या मान्य करून, बेनेस या कटकटीतून उरलेला झेकोस्लोव्हकिया वाचवू पाहत आहे. त्याने धूर्तपणाने ७ सप्टेंबरला कुठल्यातरी खेड्यात जर्मनावर अत्याचार झाले, हे कारण सागून वाटाघाटीना सुरुंग लावला. कारण हेनलीन हा आता हिटलरच्या आक्रमक योजनेतील घटक झालेला होता.

### गोअरिंगच्या चोराच्या उलट्या

१० सप्टेंबरला गोअरिंग याने न्यूरेन्बर्ग येथील नाझी पक्षाच्या मेळाव्यापुढे भाषण करताना सागितले,

A petty segment of Europe is harassing the human race. This miserable pigmy race is oppressing a cultured people and behind it is Moscow."

[ एक युरोपचा क्षुल्लक तुकडा मानववंशालाच हैराण करीत आहे. क्षुद्र व करटी अशी झेक जमात सुसंस्कृत अशा समाजावर वर्चस्व गाजवू पाहत आहे, आणि या कृत्यामागे मॉस्कोचा हात आहे. ]

मॉस्कोचा उल्लेख या अशा सदर्भात ? इग्लंड–फ्रान्सला तरी रशियाचे वाढते बल कुठे सहन होत होते ? मग त्याना गोंधळात पाडण्यासाठी ही वडाची साल पिंपळाला लावायला हरकत काय !

१२ सप्टेंबरला नाझी पक्ष मेळाव्यापुढे भाषण करताना हिटलर भाषण करणार होता. युद्धाच्या दारात उभे असलेले जग आशेने व भीतीने या भाषणाकडे पाहत होते.

झेकोस्लोव्हाकियात एकच गडबड उडाली होती. विल्सन रेल्वेस्टेशन व सर्व विमानतळ ज्यूनी भरून गेले होते. झेकोस्लोव्हाकियातून ज्यूची पळापळ सुरू झाली होती. थोड्याच दिवसापूर्वी ऑस्ट्रियातून पळून त्यांनी येथे आसरा घेतला होता. परंतु पाठोपाठ हिटलरही येणार हे पाहताच बायकामुले, सामानसुमान घेऊन ज्यू लोक देशाबाहेर जाण्यासाठी रांगा लावून उभे राहिले होते. विषारी वायूपासून सरक्षण करता यावे म्हणून झेक सरकार लोकाना ' गॅस मास्क ' (संरक्षक

त्राणे) वाटू लागले होते.

राष्ट्राला उद्देशून भाषण करण्यासाठी १० सप्टेंबरलाच बेनेस रेडिओ स्टेशनवर आला असताना शिररने त्याला पाहिला. शिररला तो असा दिसला,

" His face was grave and he seemed to be fully aware of the terrible position he was in."

[ त्याचा चेहरा विमनस्क दिसत होता. आपण कोणत्या भीषण परिस्थितीत सापडलो आहोत याचा पुरेपूर अंदाज त्याला आलेला दिसत होता. ]

१२ सप्टेंबरला हिटलरने आपल्या भाषणात बेनेसवर टीकास्त्र सोडले. १ ऑक्टोबरला फौजा झेकोस्लोव्हाकियात शिरतील ही अपेक्षित घोषणा त्याने केली नाही. परंतु तशा गर्भित अर्थाची धमकी त्याने या शब्दात दिली, " झेक सरकारने सुडेटन जर्मनांना न्याय द्यावा. तसे न होईल तर मात्र जर्मनीला योग्य ते उपाय योजावे लागतील. "

हिटलरच्या या उघडद्या चिथावणीबरोबर सुडेटन भूभागात दंगे सुरू झाले. जाळपोळ सुरू झाली. दंगल शमवण्याकरता लष्करी कायदा पुकारण्यात आला. हेनलीन सरहद्द ओलांडून जर्मनीत पळून गेला. निघून जाताना त्याने पत्रक काढले, " सुडेटन जर्मनांचे जर्मनीशी एकीकरण हाच या प्रश्नावर एकमेव उपाय आहे. "

### चेंबर्लेनचे पहिले पत्र

हेनेलीन याने जो उपाय सुचवला तोच उपाय गेले काही महिने चेंबर्लेन यांनी सुचवला होता. युद्धाचे ढग जमू लागताच फ्रेंच मंत्रिमंडळाची तातडीची बैठक झाली व झेकोस्लोव्हाकियाला दिलेले आश्वासन पाळून जर्मनीविरुद्ध युद्ध घोषित करावे की नाही यावर मतभेद निर्माण झाले ! यावर फ्रेंच पंतप्रधान डलाँदिया (Daladier) यांनी काय उपाय काढला ? फ्रान्समधील इंग्लिश वकिलामार्फत त्यांनी चेंबर्लेन यांना असा निरोप दिला, " हिटलरशी वाटाघाटी करा ! "

चेंबर्लेनसाहेब ' अग अग म्हशी ' कोण म्हणते याचीच वाट पाहत होते. डलाँदिया यांचा निरोप येताच (१३ सप्टेंबर) त्याच दिवशी रात्री त्यांनी हिटलरला पहिले पत्र लिहिले,

" In view of the increasingly critical situation, I suppose to come over at once to see you, with a view to find a peaceful solution. Please indicate earliest time at which you can see me and suggest place of meeting. I shall be grateful for a very early reply.

[ युरोपात क्षणोक्षणी अत्यंत गंभीर होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून मी ताबडतोब आपल्याला भेटण्यासाठी येण्याचे ठरवले आहे. वादग्रस्त गोष्टींची शांततामय मार्गाने काही तड लावावी म्हणून मी प्रयत्न करू इच्छितो. तुम्ही मला लवकरात लवकर केव्हा व कोणत्या ठिकाणी भेटू शकता ते कृपया कळवावे. लवकर उत्तर पाठवल्यास आभारी होईन. ]

शरणागतीला आता सुरुवात होत होती.

चेंबर्लेनचे पत्र पाहताच हिटलरने आश्चर्योद्‌गार काढले. " अरे बापरे ! (God heavens ! )." त्याला एक गोष्ट विलक्षण सुखावत होती, की बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याचा पंतप्रधान आज दीनपणे आपल्या भेटीची याचना करीत आहे ! ६९ वर्षांचा हा वृद्ध पंतप्रधान





जेथे हिटलर जाई तेथून ज्यूंची पळापळ सुरू होई

यापूर्वी कधीही विमानात बसलेला नसताना केवळ आपल्या भेटीसाठी लंडन ते बर्चेसगार्डन हा सात तासांचा विमानप्रवास अंगावर घेत आहे. हिटलरने भेटीचे ठिकाण कळवले, बर्चेसगार्डन ! चेंबर्लेन यांचा प्रवास कमी व्हावा म्हणून ऱ्हाईनच्या तीरावरील एखादे स्थळ भेटीसाठी ठरवण्याचा मनाचा मोठेपणाही हिटलरने दाखवला नाही. विजयाच्या क्षणी असा मोठेपणा क्वचितच कुणी दाखवतो म्हणा.

ब्रिटिश प्रजाजनांना चेंबर्लेन साहेबांच्या या प्रवासाच्या वृत्ताने विलक्षण आनंद झाला. त्यांना वाटले हिटलरला अखेरचे बजावण्याकरता चेंबर्लेन बर्चेसगार्डनला जात आहेत. शांतीकरता सर्व प्रयत्न थकले तरच युद्ध करणे शूराला शोभते. चेंबर्लेन साहेबांना देशाने उत्साहाने जो पाठिंबा दिला तो या अटीवरील शांतीप्रयत्नांसाठीच चेंबर्लेनचे पत्र येताच हिटलरची मात्र खात्री झाली, की झेक प्रश्नावर फ्रान्स वा इंग्लंड यांची युद्ध करण्याची तयारी नाही, हा आपला कयास शंभर टक्के खरा ठरत आहे.

१५ सप्टेंबर १९३८ ला बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याचे वृद्ध पंतप्रधान नेव्हिल चेंबर्लेन हे म्युनिच विमानतळावर दुपारी एक वाजता

उतरले. तेथून उघडच्या मोटारीतून ते जवळच्या रेल्वे स्टेशनवर गेले व बर्चेसगार्डनला जाणाऱ्या खास गाडीने ते पुढचा तीन तासांचा प्रवास करू लागले.

चेंबर्लेन याची खास रेल्वे गाडी बर्चेसगार्डनकडे जात असताना विरुद्ध दिशेने जर्मन सैनिकानी भरलेल्या गाड्या जात होत्या त्या त्याच्या नजरेस पडत होत्या.

## हिटलरच्या अभ्यासिकेत

बर्चेसगार्डन स्टेशनवरही त्याच्या स्वागताला हिटलर आला नाही. बर्गहॉफ हॉटेलच्या पायऱ्यावर त्याने त्याचे स्वागत केले. यावेळी चारचा सुमार झालेला होता आकाशात मेघानी गर्दी उडवली होती व थोड्याच वेळात पावसास सुरुवात झाली.

आल्याबरोबर हिटलरने चेंबर्लेन व त्यांची सहकारी मंडळी याचेबरोबर चहा घेतला. नंतर हिटलर व चेंबर्लेन हे दोघेच दुसऱ्या मजल्यावर हिटलरच्या अभ्यासिकेत गेले. सात महिन्यांपूर्वीच याच खोलीत हिटलरने ऑस्ट्रियाच्या डॉ. शूशेनिगला दम भरला होता. हेंडरसन यांच्या विनतीनुसार रिबेन्ट्रॉपला या वाटाघाटीतून वगळण्यात आले.

हिटलरने सभाषणाला सुरुवात केली. नेहमीप्रमाणे सुरुवातीला त्याने आपण जर्मन लोकाकरता, अँग्लो–जर्मन मैत्री टिकवण्याकरता काय काय केले याचा पाढा वाचला. तो शेवटी म्हणाला, "झेकोस्लोव्हाकियातील तीस लाख जर्मन लोकाचा प्रश्न या ना त्या मार्गाने मी आता सोडवणार आहे. या लोकाची आमच्या राईशमध्ये सामील व्हायची इच्छा आहे."

डॉ. श्मिद हा दुभाष्या यावेळी दोघांच्या दिमतीला होता. यानेच या भेटीचा वृत्तान्त लिहून ठेवला आहे.

यावेळी हिटलरने ही गोष्ट स्पष्ट केली, की युद्ध पेटलेच तर त्याला त्याचा इलाज नाही. तो म्हणाला,

"I am forty nine years old and if Germany is to become involved in war over the Chech question, I will lead my country through the crisis. I would face any war, even a world war for this. The rest of the world might do what it liked. I would not yield one single step."

[मी आताच एकूणपन्नास वर्षांचा आहे. जर या झेक प्रश्नावर जर्मनीला युद्धात गुतावे लागले तर या कठिण काळात जर्मनीचे नेतृत्व मी अवश्य करीन. कोणत्याही युद्धाला, नव्हे जागतिक युद्धालाही, तोंड देण्याची माझी तयारी आहे. इतर जगाने काय करावे हा माझा प्रश्न नाही. मी मात्र याबाबत एक रेसभरही पाऊल मागे घेणार नाही.

हिटलरची ही भाषा ऐकताना चेंबर्लेन याना काय यातना झाल्या असतील ? शातपणे त्यानी सागितले,

"सैन्यबळावरच हा प्रश्न सोडवायची जर फ्यूररची इच्छा असेल तर यापुढे वाटाघाटी चालू ठेवण्यात काय हशील ? मी उगाच माझा वेळ वाया घालवला."

## हिटलर, विश्वासार्ह माणूस !

चेंबर्लेन हा काही शूशेनिग नव्हता. ब्रिटिश साम्राज्याचा आधार त्याच्या पाठीशी होता. त्यामुळे निर्धाराने त्याने हे वाक्य तरी उच्चारले. यावरोबर हिटलरने पवित्रा बदलला. तो एकदम म्हणाला,

"सुडेटन जर्मनानी झेकोस्लोव्हाकियातून फुटून निघावे याला ब्रिटनची मान्यता आहे की नाही ? अर्थात स्वयनिर्णयाच्या तत्त्वानुसार हे घडेल."

स्वयनिर्णयाचा उच्चार नेमका हिटलरने करताच चेंबर्लेननी नि.श्वास टाकला. कारण या गोष्टीला त्याची मान्यता होतीच. यावर चेंबर्लेन नेमके काय म्हणाले याबाबत मतभेद आहेत. चेंबर्लेन याच्या म्हणण्याप्रमाणे ते असे म्हणाले,

"मी याबाबत आताच निश्चित असे काही सांगू शकत नाही. मी देशात परत जाईन व माझे मंत्रिमंडळ व फ्रेंचसरकार याच्याशी विचार विनिमय करून मग काय ते कळवीन."

याउलट डॉ. श्मिद ह्या दुभाष्याच्या म्हणण्याप्रमाणे चेंबर्लेन असे म्हणाले, "सुडेटन जर्मन भूभाग हा झेकोस्लोव्हाकियापासून वेगळा काढावा या गोष्टीला माझी वैयक्तिक मान्यता आहे. कारण स्वयनिर्णयाचे तत्त्व मी मानतो. माझ्या या मताला माझ्या सरकारचा पाठिंबा मिळवण्यासाठी मी माझ्या देशात परत जातो."

यातले नेमके खरे काय ते एक परमेश्वर जाणे. परतु दोन्ही निवेदनाचा साधारण सूर एकच आहे. 'बाबारे, युद्ध कशाला ? सुडेटन जर्मन भूभाग हा जर्मनाचा आहे तो तुम्हाला मिळेल.' या शरणागतीपासूनच पुढच्या शोकातिकेला सुरुवात झाली.

ज्यावेळी या वाटाघाटी चालू होत्या त्याच दिवशी म्हणजे १५ सप्टेंबरला सुडेटन नेता हेनलीन हा सरहद्द ओलाडून जर्मनीत पळून आल्यावर हिटलरला गुप्त पत्र लिहीत होता. हे पत्र नतर हिटलरला मिळाले. यात तो लिहितो,

"प्रिय फ्यूरर,

मी काल लॉर्ड रुनकीमन या ब्रिटिश मध्यस्थाला असे सागितले, की याबाबत करावयाच्या वाटाघाटी एकाच दिशेने होतील, की सुडेटन जर्मन भूभाग हा राईशला जोडता यावा.

बहुधा चेंबर्लेन एकीकरणाची योजनाच तुमच्यापुढे माडतील.

(It is possible that Chamberlain will propose such a union). हेनलीन."

या पत्रावरून पाहता चेंबर्लेन यानी नेमके काय म्हटले असावे याचा अदाज करता येईल. लॉर्ड रुनकीमन यांचेकडून चेंबर्लेन शरणागतीला तयार असल्याचे वृत्त हेनलीनला कळते व ते तो फ्यूररला कळवतो येवढी ही गोष्ट उघड झालेली होती.

सपली, बोलणी सपली ! शरणागती दिल्यावर बोलणी करायची तरी कसली ? आता प्रश्न उरला फक्त इग्लंडमध्ये परत गेल्यावर सागायचे काय ? म्हणून मग हिटलरजवळ चेंबर्लेन यानी आश्वासन मागितले, की पुन्हा याबाबत बोलणी झाल्याशिवाय हिटलरने आक्रमण करू नये. हिटलरने हे अभिवचन दिलेही. चेंबर्लेन साहेबानी पत्रकाराना निर्वाळा दिला,

"I got the impression that here was a man who could be relied upon when he had given his word."

[माझी अशी समजूत झाली, की (हिटलर) हा असा एक माणूस आहे, की ज्याने एकदा शब्द दिल्यावर त्याच्यावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही.]

१६ सप्टेंबरला सायंकाळी चेंबर्लेनसाहेब लडनला परत पोचले.

लॉर्ड रुनकीमन यांना प्रागहून तातडीने बोलावलेलेच होते. रुनकीमन यांनी मंत्रिमंडळाला अहवाल सादर केला, त्यात चेंबरलेनच्या पुढेच एक पाऊल होते. चेंबरलेन सुडेटन भागाला स्वयंनिर्णय देण्यास तयार होते. म्हणजे राईशमध्ये जायचे की स्वतंत्र राहावयाचे हे त्यांचे त्यांनी ठरवावे. रुनकीमनने सूचना केली की स्वतंत्र सार्वमताची गरजच नाही. सर्व सुडेटन भाग सरळ एकदमच जर्मनीला जोडून दिला जावा.

पॅरिसला फ्रेंच प्रंतप्रधान दलादिया व परराष्ट्रमंत्री बॉनेट यांना तातडीचे निमंत्रण गेले. या निमंत्रणानुसार १८ सप्टेंबरला हे दोघे विचारविनिमयासाठी लंडनला आले.

## हलवायाच्या घरावर तुळशीपत्र

ज्या देशाच्या भूभागाचे उदक हिटलरच्या हातावर सोडण्यास हे दोघे तयार झाले होते त्या देशाचा, म्हणजे झेकोस्लोव्हाकियाचा प्रतिनिधी या वाटाघाटींना हजर राहावा असे कुणालाच वाटत नव्हते. इंग्लंड-फ्रान्स ठरवतील तेच झेक सरकारने फक्त अमलात आणावयाचे, असे हे दोघे पराभूत वृत्तीचे पंतप्रधान धरून चालले होते.

वाटाघाटीत काय ठरले ? ज्या भूभागात ५० टक्क्यांहून अधिक जर्मन्स आहेत तो सर्व भूभाग...जगात शांतता राहावी म्हणून तावडतोब जर्मनीला द्यावा आणि हे केल्यानंतर झेक देशाच्या ज्या नव्या सरहद्दी ठरतील, त्याचा जर कुणी भंग केला तर, झेकोस्लोव्हाकियाच्या रक्षणाची नवी हमी ब्रिटिश व फ्रेंच सरकार देण्यास तयार होते !! झेक सरकारला हे तावडतोब कळवावे असा निर्णय झाला व हा निर्णय हिटलरच्या कानावर घालून पुढील वाटाघाटी करण्याकरता पंतप्रधान चेंबर्लेन यांनी १२ सप्टेंबरपूर्वी पुन्हा हिटलरची गाठ घ्यावी असेहि नक्की झाले.

प्रागमधील ब्रिटिश व फ्रेंच वकिलांना लगेच सूचना गेल्या व वरील निर्णय झेक सरकारला कळविण्यात आला १९ सप्टेंबरला दुपारी.

चोवीस तासांच्या आत, म्हणजे २० सप्टेंबरला सकाळीच झेक सरकारने शरणागतीस नकार दिला व ब्रिटिश–फरेंच पंतप्रधानांना स्पष्ट कळवले––

"To accept these proposals would put Czecoslovakia sooner or later under the complete domination of Germany."

( ही सूचना स्वीकारणे म्हणजे पर्यायाने आज ना उद्या झेकोस्लोव्हाकियाला संपूर्णपणे जर्मनीच्या पंजाखाली लोटण्यासारखेच आहे. )

झेक सरकारने आपल्या उत्तरात फरेंच सरकारला त्यांनी त्यांच्या राष्ट्राला दिलेल्या संरक्षणाच्या हमीची आठवण करून दिली. या कराराचे पावित्र्य मानून आता माघार घेऊ नये, अशी विनंतीही त्यात होती. परंतु फरान्स व इंग्लंड यांनी शरणागतीचा मार्ग पत्करला होता व या मार्गात, दिलेल्या अभिवचनांना जागणे बसत नव्हते !

यावर फ्रान्स व इंग्लंड यांची प्रतिक्रिया काय झाली ती दोन्ही सरकारांनी झेक सरकारला कळवली.

" तुम्ही आमचे ऐकले नाही. याचा वाईट परिणाम झाला तर आम्ही आता तुमच्याकडे ढुंकूनही पाहणार नाही !"

'अजापुत्रो बलिं दद्यात्' हे तर खरेच; परंतु ज्याचे क्षात्रतेज फक्त बकरी मारण्यापुरतेच शिल्लक उरते, त्याच्यावरही नजीकच्या भविष्यात प्राणसंकट गुदरतेच ! झेकोस्लोव्हाकियाचा बळी घेऊन



चेंबर्लेन

हिटलर थांबणार नव्हता ! तिबेटचा बळी घेऊन माओ कुठे थांबला ?

'अध्यक्ष बेनेस याने हातपाय गाळले. ज्याच्या खांद्यावर विश्वासाने मान ठेवली त्यांनेच खांदा काढून घेतला होता. नरडघावर सुरी मात्र हिटलर फिरवणार होता. बेनेसने फ्रेंच सरकारला विनंती केली की आम्ही कराराप्रमाणे तुमच्या मदतीला येणार नाही. असे लेखी कळवा !' बेनेसला हे सर्व कागदोपत्री अशाकरता हवे होते, की उद्या इतिहासात झेकोस्लोव्हाकियाचा बळी फरान्सने व त्यांच्या पाठिराख्या इंग्रजाने दिला हे स्पष्ट व्हावे.

२० सप्टेंबरेला रात्रभर बेनेसला झोप लागली नाही. देशाच्या झालेल्या विश्वासघाताने तो बेचैन होता. २१ ला सकाळी प्रागमधील रशियन वकिलाने सांगितले––' कराराप्रमाणे फरान्सने तुमची साथ केली तर आम्ही तुमची साथ करू...परंतु फरान्स डोळ्यावर कातडे ओढीत असताना आम्हाला काही करणे नाही !'

२१ सप्टेंबरला दुपारी झेक सरकारने माघार घेतली. सरकारी पत्रकात विश्वासघाताचा स्पष्ट आरोप करून इंग्लंड–फरान्सची सूचना झेक सरकारने स्वीकारली. हे सरकारी पत्रक म्हणते–' We had no other choice because we were left alone. ( आम्हाला दुसरी गतीच उरली नाही, कारण आमची साथ करण्याचे सर्वांनी नाकारले. )खाजगीरीत्या बेनेसने आरोप केला–– " We have been basely betrayed." ( नीच मार्गाने आमचा विश्वासघात करण्यात आला आहे. )

अध्यक्ष बेनेसने दुसऱ्या दिवशी लोकनियुक्त सरकारचा राजीनामा घेऊन जॉन सिरोव्ही या सेनाधिकाऱ्याकडे राज्यकारभार दिला.

## चेंबर्लेनची दुसरी वारी

चेंबर्लेन हिटलरच्या दुसऱ्या भेटीसाठी याच दिवशी निघाले होते. ही भेट ऱ्हाईन नदीच्या तीरावरील Godesberg या शहरी होणार होती.

२२ सप्टेंबरला सकाळी चेंबर्लेन साहेबांना विमानात बसवून इंग्लंडमधील जर्मन वकिलातीतील अधिकाऱ्याने वकिलातीत पोचण्यापूर्वी बर्लिनला तार दिली––

" चेंबर्लेन येथून निघाले आहेत. येथे काळजीचे वातावरण आहे. चेंबर्लेनच्या धोरणाला अंतर्गत विरोध निश्चित वाढत आहे."

ऱ्हाईनच्या अलीकडील तीरावर गॉडेस्बर्ग शहरात चेंबर्लेन पोचले, तेव्हा रस्त्यावर स्वस्तिक निशाणे व युनियन जॅक शेजारी

शेजारी सर्वत्र फडकत होते. पीटरशॉफ या हॉटेलात याच्या निवासाची व्यवस्था होती. खाना झाल्यावर दुपारी चेबर्लेन हिटलरच्या भेटीसाठी निघाले. ऱ्हाईनच्या पलीकडील तीरावर Dreesen हॉटेलात हिटलर उतरलेला होता होडीने चेबर्लेन यानी ऱ्हाईन नदी ओलाडली. हॉटेलच्या पायऱ्यांवर हिटलरने त्याचे स्वागत केले

डॉ. स्मिदनेच यावेळीही दुभाष्याचे काम केले व या भेटीचा वृत्तांत लिहून ठेवला आहे

चेबर्लेन यांनी यावेळी बोलण्यास प्रथम प्रारंभ केला. ते म्हणाले—

" लॉर्ड रुन्कीमन याच्या अहवालाचा विचार करून आम्ही असे ठरवतो आहोत, की सुडेटन भूभाग जिथे जर्मन हे निर्विवादपणे बहुसख्येत आहेत, तो सर्व भाग तावडतोब जर्मनीला जोडला जावा, ज्या भूभागात त्याचे बहुसंख्यत्व सशयातीत नाही अशा भागाचा विचार करण्याकरता त्रिसदस्य–सीमामडळ नेमण्यात यावे. उरलेल्या झेकोस्लोव्हाकियाच्या सरक्षणाची हमी देणारा नवा करार आम्ही तदनतर करू—"

" याचा अर्थ सुडेटन जर्मन भू-भाग जर्मनीला जोडण्यास ब्रिटन फ्रान्स व झेक सरकार तयार आहेत असाच होतो ना ? " हिटलरने विचारले.

" हो—! " चेबरर्लेन यांच्या चेहऱ्यावर समाधान पसरले परंतु केवळ क्षणभर. कारण त्यांच्या ' हो 'चा ध्वनि उमटला न उमटला तोच हिटलरने म्हटले,—

" आता त्याचा काय उपयोग ? मला फार वाईट वाटते. परतु गेल्या काही दिवसांतील घटना विचारात घेता तुम्ही माडलेली योजना फारशी उपयोगाची नाही ! "

चेबरर्लेन साहेब दचकून...ताठ झाले. (sat up with a start) त्याच्या घुबडसदृश चेहऱ्यावर आश्चर्य आणि संताप दृग्गोचर होऊ लागला, आपण मोठ्या भगीरथ प्रयत्नानी उभ्या केलेल्या शांतता मदिराचा कळस चढण्याच्याच क्षणी या मंदिरावर वीज पडून सगळा चक्काचूर व्हावा तसे या वृद्ध पंतप्रधानाना वाटले.

जगात शांतता राखण्याची सर्व जबाबदारी केवळ आपल्या शिरावर आहे या नादाने ठोकरा खाल्लेला नेता ठोकर बसली तरी जगापुढे आपण हळूहळू जिकत आहोत असेच नाटक उभे करीत असतो. हिटलरने अचानक वाटाघाटीत—विघ्न निर्माण करून दगाबाजी केली, याची पुरती जाणीव असूनहि कॉमन्स सभागृहापुढे तशी कबुली न देता चेबरर्लेन यांनी उलट मखलाशी केली. ही घटना सभागृहापुढे ठेवताना पतप्रधानांनी सांगितले.

" I do not want the house to think that Hitler was deliberately deceiving me. I do not think so for one moment, but for me I expected that when I got back to Godsberg, that I had only to discuss quietly with him the proposal that I had brought with me & it was a profound shock to me..."

[ हिटलर हा मला जाणून बुजून फसवीत होता अशी सभागृहाने कल्पना करू नये. मला असे क्षरमरही वाटले नाही. परंतु मी जेव्हा परत गॉडेसबर्गला भेटीसाठी गेलो. तेव्हा या समजुतीने गेलो, की आता फक्त शांतपणे मी बरोबर आणलेली योजना चर्चेसाठी ध्यायची आहे...यामुळे हिटलरच्या बोलण्याने मला जबर धक्का बसला...]

मला धक्का बसला—मला असे वाटले–माझी अशी समजूत झाली...ही सर्व भापा बोलणारा पतप्रधान हा देशोदेशी स्वत चे वैयक्तिक गुण अवगुण याचे देव्हारे का माजवतो ? चेबर्लेन याना हिटलरने दिलेला धक्का हा इग्लडच्या पृष्ठभागावर लत्ताप्रहार—असताना कॉमन्सने स्वस्थ कसे राहावे ? इंग्लंडची अब्रू ही काही चेबर्लेनच्या वडिलाची वैयक्तिक अब्रू नव्हती.

प्रत्यक्ष वाटाघाटीच्या वेळी चेबरर्लेन याना जेव्हा हा जबर धक्का बसला तेव्हा हिटलरला ते म्हणाले—

" शातता राहावी म्हणून माझे राजकीय कर्तृत्व मी पणाला लावलेले आहे. इग्लडमध्येच काही वर्तुळात मी झेकोस्लोव्हाकियाचा विश्वासघात करून तो देश विकला असे उघड आरोप माझ्यावर होत आहेत ..आणि मी जेव्हा आज सकाळी इथे येण्यास निघालो तेव्हा माझी काहीनी हुर्योही केली .. "

देशाच्या हिताशी जी गोष्ट सुसंगत नाही अशी कोणतीहि गोष्ट करण्याकरता पतप्रधानाने आधी स्वत:चे राजकीय कर्तृत्व पणास लावावेच का ? असे कर्तृत्व जेव्हा पणास लावले जाते तेव्हाच त्या कर्तृत्वाची किंमत शून्य झालेली नसते का ? हिटलरने म्हणूनच या वृद्ध पंतप्रधानाच्या वैयक्तिक, कठीण, दयनीय परिस्थितीच्या कहाणीकडे लक्ष दिले नाही. सुडेटन प्रात...तावडतोड आम्ही व्यापू व हा प्रश्न ताबडतोब सुटला पाहिजे असे पुन्हा सागून त्याने टेबलावरचा नकाशा पुढे पसरला.

या नकाशात जो टापू जर्मन सैन्य ताबडतोब व्यापणार होते तो विस्तृत भाग दाखवला होता. नकाशावर बोट फिरवीत हिटलरने निर्वाणीने सांगितले,

" १ ऑक्टोबर पूर्वीच हा प्रश्न आम्ही कायमचा निकालात काढू. "

चेबर्लेन हताश झाले. आता बोलण्यासारखे काही उरलेच नव्हते. याला सरळ उत्तर एकच होते, की ज्याक्षणी तू आपले सैन्य झेकोस्लोव्हाक सरहद्दीवरून पुढे पाठवशील त्याच क्षणी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले जाईल. जय–पराजय काय व्हायचा असेल तो होईल. परतु तू करत असलेली गोष्ट अन्यायकारक आहे हे उघड असल्यामुळे आम्हाला तुला उत्तर युद्धानेच द्यावे लागणार. जर हिटलर चेबर्लेनला भेटायला लंडनला आला असता तर कदाचित असे म्हणण्याचा विचार तरी चेबर्लेनच्या मनात जोर करता, परतु आपले वृद्धत्व, आपले जबाबदार नेतृत्व, आपले राजकीय कर्तृत्व या सगळ्याचा विसर पडून चेबर्लेन यानी जेव्हा हिटलरच्या दारात पुन:पुन्हा जायचेच ठरवले तेव्हाच ही सर्व आशा जाणत्याच्या मनात मावळलेली होती.

चेबर्लेनच्या शब्दात सागायचे तर यानंतर त्यांनी काय केले !

" I withdrew across the Rhine to consider what I was to do. "

[ मी पुन्हा ऱ्हाईनच्या अलीकडील तीरावर माघारा येऊन विचार सुरू केला की मी आता काय करावे. ]

अरेरे ! हा ' मी ' विसरून त्यानी असा प्रश्न केला असता की, " इग्लडने आता काय करावे, " तर नेल्सनच्या पुतळ्यानेही त्यांना सांगितले असते, ' आता युद्धाशिवाय दुसरा उपाय नाही.' नाहीतर देशात हे दगडी पुतळे बांधले होते कशाला ? चेंबर्लेननी हा निर्णय

घेतला असता तर नेल्सनची सर्वात मोठी 'जयंती' साजरी नसती का झाली ?

सायंकाळी सातच्या सुमारास आपल्या निवासातून चेंबर्लेन फोन-वरून आपल्या लडनमधील सहकाऱ्याशी आणि पॅरिसमधील पंतप्रधानाशी विचारविनिमय करू लागले. याचवेळी म्हणजे बरोबर सात वाजून वीस मिनिटानी जनरल कायटेलने आर्मी हेडक्वार्टरला फोन केला,

" Date cannot yet be as certained; continue preparations according to plan. "

[तारीख अजून निश्चित नाही. ठरलेल्या योजनेप्रमाणे तयारी जारी ठेवा.]

२२ सप्टेंबरला सध्याकाळनंतर पुन्हा चेबर्लेन-हिटलर यांनी कसलेच बोलणे केले नाही वा चिठ्ठीचपाटी लिहिली नाही. ऱ्हाईन नदी दोघाच्या निवासामधून सथपणे वाहात होती.

दुसऱ्या दिवशी सकाळ झाली. रात्रभर चेंबर्लेन यानी विचार केला. सकाळी न्याहारी होताच त्यानी हिटलरला चिठ्ठी लिहिली, की मी तुमचे म्हणणे झेक सरकारला कळवतो. पण सर्व मागण्या झेक सरकार स्वीकारीलच अशी खात्री मी देऊ शकत नाही.

हिटलरने सायंकाळपर्यंत चिठ्ठीचे उत्तरच दिले नाही. सायकाळी उत्तर आले, की आमच्या मागण्यात बदल शक्य नाही. आता यासाठी शस्त्र उचलण्याखेरीज अन्य मार्ग दिसत नाही.

याला चेबर्लेन यानी प्रतिचिठ्ठी धाडली, की काय मागण्या आहेत त्या लेखी, नकाशासह द्या. मी मध्यस्थी म्हणून त्या प्राग सरकारला कळवतो. एवढे सागून चेंबर्लेन यानी पुढे लिहिले, " मी येथे अधिक थांबण्यात स्वारस्य नाही. मी इंग्लंडला परतत आहे."

## मेमोरँडम की अल्टिमेटम

रात्री १०-३० वाजता फ्यूररचा निरोप घेण्यासाठी चेंबर्लेन पुन्हा ऱ्हाईन ओलाडून ड्रीसेन हॉटेलात आले. हिटलरने आपल्या मागण्या नकाशासह त्यांच्याजवळ दिल्या. या मागण्याना शीर्षक होते, ' Memorandum ' (खलिता) त्यात पुढे लिहिले होते, झेक सरकारने नकाशात दाखवलेला भूभाग खाली करण्यास २६ सप्टेंबरला सकाळी ८ वाजता सुरुवात केली पाहिजे व २८ सप्टेंबरपूर्वी सर्व ताबा जर्मनीला दिला पाहिजे.

यातली भाषा वाचून चेंबर्लेन साहेब म्हणाले,

" But this is nothing less than an ultimatum. " (हा तर निर्वाणीचाच खलिता दिसतो. )

हिटलर म्हणाला,

" Nothing of the sort. The German word Dictate cannot be applied to it. Look, the document is headed by the word memorandam. "

[ छे छे. तसे काही नाही. जर्मन भाषेत ज्याला डिक्टेट म्हणतात. तो शब्द वापरलेला दिसत नाही. पाहा वर शीर्षक आहे, मेमोरँडम्. ]

एवढे बोलणे होते न होते तोच हिटलरचा खासगी सहकारी आत आला. त्याने एक महत्त्वाचे पत्र हिटलरच्या हाती दिले. त्यातील मजकुरावर नजर फिरवून हिटलरने ते पत्र समोर श्मिद याचेकडे उडवले व तो म्हणाला " चेबर्लेन याना यातील मजकूर भाषांतर करून सागा. "

श्मिदने वाचले.

" Benes has just announced over the radio a general mobilization "

[ बेनेस यानी आताच रेडिओवर युद्धतयारीची घोषणा केली आहे. ]

त्या दालनात एकदम मरणकाळची शातता पसरली, मग हिटलर म्हणाला,

" यापुढे आता हे प्रकरण संपतच आले. झेकांचा आम्हाला भूभाग देण्याचा विचार दिसत नाही. "

यावर चेंबर्लेन व हिटलर याची शब्दाशब्दी झाली की आधी ही तयारी जर्मनीने केली की झेकानी ? शेवटी चेबर्लेन यानी सागितले की मी जड अन्त:करणाने परतत आहे. ज्यासाठी आलो होतो ते काम यशस्वी झाले नाही याचे मला दु:ख होते

## हिटलरची साखरपेरणी

गळाला लागलेला मासा सुटत चालला हे पाहाताच हिटलरने सूर बदलला. तो म्हणाला,

" You are one of the few men for whom a have done everything. I am prepared to set one single date for the Czech evacuation. October lst, if that will facilitate your task. "

[ मी केवळ तुमच्याकरता आतापर्यंत सर्व काही केले आहे. झेकानी आमचा भूभाग खाली करण्यासाठी, केवळ तुम्हाला मी मानतो म्हणून आणखी फक्त एक तारीख देतो. १ ऑक्टोबर. यामुळे तुमचे काम सुकर होईल.]

देशाचे शत्रू नेहमी शत्रूदेशातील कमकुवत नेत्याला असेच स्तुतीने भारून टाकीत असतात. त्याला ते नेहमी असे भासवतात की तुम्ही केवढे थोर ! अशा वेळी जो नेता या ' मी ' ची किंमत ओळखत नाही तो स्वत:ची फसवणूक करीत शत्रूच्या तालावर अधिकच तन्मयतेने नाचू लागतो. आता चेबर्लेन याच्यावर काय परिणाम झाला तोच पाहा, चेबर्लेन खूष होऊन म्हणाले, " याबाबतीत तुम्ही जी पुन्हा विचार करण्याची तयारी दाखवली ती खरोखर स्पृहणीय आहे. "

[ I fully appreciate Fuehrer's consideration on this point. ] लगेच हिटलरने आपल्या हाताने त्याने दिलेल्या मागण्यांच्या खलित्यात खोडाखोड करून नवीन तारीख दिली. १ ऑक्टो. १९३८ !

वाटाघाटीत निर्माण झालेली कटुता एकदम सपलीच. दोघे आता हास्यविनोद करू लागले. दोघे दालनाबाहेर आले तेव्हा रात्रीचा दीड वाजला होता.

[ पुढील अंकी चालू ]

# फुलाआत्ती

आनंद यादव

“माझ्या हाताला येशी नाही. सगळ्या पोरीच हुत्यात लेकाला. तुझ्या तरी हाताला येश येतं का बघू!” एकाएकी कालवा करीत फुलाआती घरात आली
नव्याचं जुनं झालं आणि सहाव्या नातीला जपत रामरगाडा सुरू झाला.

फुलाआत्तीचं तोंड लोखंडाचं आहे. ती सबंध म्हातारी झाली आहे. पण तोंड म्हातारं झालं नाही. अजून लेजीम खेळताना वाजणाऱ्या रण–हलगीगत खणखणत असतं. चांदीच्या बंद्या रुपयासारखे शब्द छनाछना करतात. या चांदीच्या रुपयांना मिरच्यांचं तिखट पुरे म्हणूस्तर लावलेलं आहे. ऐकणाऱ्याच्या नाकाडोळ्यांतनं पाणी येतं.

“काय फुलाआत्ती?”

“का रं बाबा?” फुलाआत्तीचा एक हात हलगीवर पडतो.

“काय चाललंय?”

“शेणी स्वाय लागलेय् गाडीत.”

“कशाला?”

“वड्यावर न्ह्यायला. माझ्या सुडक्या, ‘काय चाललंय’ म्हणून काय इचारतोस? काम चाललंय दिसत न्हाई? डोळं शिवल्यात व्हय बाकळंच्या दोऱ्यानं?”

माणूस आपलं चाल म्हणून विचारायला जातं; आणि ही तोंडानं एरंडाचं वाळलं बासं कडाकडा मोडत बोलती. जवळच्या ओळखीचं असलं तर माणूस हसतं. नाहीतर पांदीतल्या चिखलात अवस्थी पाय घसरून पडल्यागत घाबऱ्या–घुबऱ्या इकडं तिकडं बघतं आणि अचानक थोबाडीत बसल्यागत निघून जातं... शिवा एकदा म्हणाला; “दादा, हे बघितलंस काय?”

“हे बघ. फुलाआत्तीच्या घरावर जरा बघ.”

“कुठं हाय रं काय?” मी वर बघितलं.

“त्या खापऱ्या तरी बघ, ल्हया उडाया लागल्यागत उडत्यात.”

“काय भडव्या!”

शिवा हासत उभा राहिला. खापऱ्या उडत नव्हत्या. फुलाआत्ती सुनेला शिव्या मोजत होती. तिच्या ढाबळी लुगड्याचा सैल ओटा भरावा इतक्या शिव्या तिच्याजवळ होत्या. अगदी भाजी निवडल्यागत निवडून साठविल्या होत्या.

सुनेला आतापर्यंत पाच पोरीच झालेल्या. सगळ्या जगलेल्या. फुलाआत्तीला एकच पोरगा. आणि पोराच्या वंशाला नुसत्या शेंगाच. एकही बी त्याच्यात नाही; असं तिला वाटायचं. ह्या ना त्या निमित्तानं सुनेला ती ऊस फोडून खाल्ल्यागत खात होती.

एकचा एक पोरगा भिकू. बहाद्दूर निपजला होता. (त्याच्यासाठी साठ नवसं तिला करावी लागली होती.) दुपारी बारा वाजले की चुकारीचा रेडा घराकडं धावत आल्यागत येत होता. बसाबसा जेवत होता. झोपल्यावर रेड्यागतच घोरत होता. घोरून झालं की गावातलं देऊळ नाहीतर देवळापुढचा पिंपळाचा पार. देवळात इस्पीटं फाटूपर्यंत पिसत बसायचा. पैशांनी खेळायचा. वेळप्रसंग पडलाच तर मनावर उदार होऊन घरातला तांब्या, भांडं, पातेलं–, काय हाताला लागेल ते पैशासाठी विकायचा नि पैसा आल्यावर त्याचा धूप खेळासाठी देवासमोर घालायचा. भिकूनं दोन वक्ताला खावं, दोन वक्ताला झोपावं नि एखाद्या वक्ताला भांडी विकावीत हा त्याचा दिवसभराचा बेत. बिचारा आईच्या पोटाला एकटाच होता. आणि त्याच्या एकट्या पोटाला सहा पोटांचा घस लागला होता. पाच पोटं पोरीची नि एक पोट बायकोचं. राबणारी फक्त फुलाआत्ती.

शेजारीच राहते. भल्या पहाटे उठते. कोंबड्याच्या आधी तिच्या जांभया ऐकायला येतात. त्यावेळी आमच्या घरातही जाग आलेली असते. (कोणी ना कोणी अंथरुणातली ढेकणं मारत बसलेलं असतं.) जांभई देऊन झाल्यावर फुलाआत्ती अंगातला नेट हातांच्या दाही बोटात घालून डोकं खाजवत असावी. कारण सकाळी बाहेर आल्यावर तिच्या केसांची सर्व बाजूंनी चवरी झालेली दिसते. मी उठून दात घासत असतो; त्यावेळी ती थंडथंड पाण्यानं आंघोळ करत असते. माझ्या अंगावर काटा येतो. तोंड धुतो; त्यावेळी ती घराची झाडलोट करीत असते... हात आणि तोंड एकदम काम करीत असतात.

“ऊठ की ग रांडं.” सुनेला सकाळची हाक. “दिसाची किरणं चांगली साऱ्यातनं



पडाय् लागली की मग ऊठ. आता ऊठू नगं. आई–बा मरतील तुझं. ”

सून आळस देत नि शिव्या खात उठते. सांगून ठेवल्यागत पोरंही पटापट उठतात. मग ती त्यांचा शेंबूड काढण्यात किंवा आणखी काहीतरी काढण्यात गुरफटून जाते.

“ निजा की ग सटवाया हो ! भोरडचा उठल्यागत लगीच उठल्या कलाकला करत. तुमच्या बाऽनं का एवढचा सकाळी गठळं पुरून ठेवलंय ! ...चूल–पोतिरी कर ग ए ऽ भवाने. मग बस पोरांची उस्तवारी करत. त्या भाडचालावी उठीव. जरा बघ म्हणावं काय-तरी कामाचं. न्हाईतर खा म्हणावं माझीच हाडं उगळून रात–ध्याड. ” पेळूच्या सुतागत शिवीतनं शिवी सगळचांसाठी निघते. स्वतः-वरही एक–दोन शिव्या असतात.. तोंडाचा पट्टा बंद केला की फुलाआत्तीच्या कामाला गतीच येत नाही. आणि कामं तर सगळी न्याहारीच्या वक्तापर्यंत आटपायची असतात. जेवून बाजारला जायचं असतं.

गावात आठवडचातनं दोन बाजार भरतात. कोगनोळीला शुक्रवारचा बाजार. कोल्हापूरला रविवारचा आणि गावात सोमवार नि गुरु-वारचा. हे चारही बाजार फुलाआत्ती करते. कांदा, लसून, मिरची, कडधान्यं यांची खरेदी-विक्री चालते. ह्या बाजाराचं त्या बाजारात. त्या बाजाराचं ह्या बाजारात. पुन्हा ह्यातलं त्यात. स्वस्त–महाग एकाजागी करून मधला दर काढायचा. पोटं चालवायची....पायाला मोटारीची चाकं लावल्यागत धावते.

“ फुलाआत्ती, किती कामं करशील ? म्हातारी झालीस. गप घरात बस जा की आता. ”

“ हं ऽ घरात बसून काय खाऊ ? बरा सांगतोस की. ”

“ लेकाला जरा कामं कर म्हणावं. लाडका लाडका म्हणून गावातनं किती उंडगा सोडायचा त्येला ! ”

“ ल्योक मेला न्हाई माझा ? ” फुलाआत्तीचा राग आणि गंभीर विनोद एकदम बाहेर पडलेला असतो.

“ कवा ? ” विचारणारा माणूसही तसा गोंधळून घाबरल्यागत विचारतो.

“ बारा दीस झालं की. ”

“ खरं का काय ? ”

“ जा माझ्या सुडक्या. छपन्न नवसं केल्यात त्येच्यासाठी. तेवढाच हाय माझ्या वंसाला. खाऊ दे फिरून तिकडं. ” फुलाआत्तीच्या या अनपेक्षित हिसक्यानं ऐकणारा माणूस टोमॅटो कोंबल्यागत तोंड करून निघून जातो.

घरात पाच नाती, एक सून, पोरगा एव-ढचांची पोटं एकटी चालवते. तसल्यात एक मांजरी पाळलेली.

“ फुलाआत्ती, मांजरी व्याली काय ? ”

“ व्याली की ! ”

“ किती पिल्लं हाईत ? ”

“ चार. ”

“ आणि पोराला किती पोरी हाईत ? ”

“ जा माझ्या हांटचा. चांगली खंडीवर पेंडी झाली तरी मी भिणार न्हाई. ईसभर पोरं हुईस्तवर एक तरी ल्योक हुईल माझ्या पोराला. ”

“ हुईल हुईल. एकविसावं तरी पोरगं हुईलच. ” असं म्हणत माणूस हसत जातो. फुलाआत्तीच्या मनाला आतल्या आत विंचू झोंबतात. तिचं तोंड सुनेकडं वळतं; “रांडला नुसत्या पोरीच ! काय माझं नशीब तरी ! एकचा योक ल्योक. साता नवसानं झालेला. त्येच्या पोटाला ह्या औदसा. उद्या दाल्लं करून दिल्यावर माझ्या लेकाला वळखबी द्यायच्या न्हाईत. नोडेऽ, आता फुडच्या डावाला पोरगा झाला तर बरं; न्हाईतर

सोडचिठ्ठी द्यायला लावून दुसरी बायकू करून देते लेकाला. सगळ्या ह्या भोरड्या वघून लोकं तोंडात ध्याण घालत्यात माझ्या. माझ्या पोरान न्हवरं तरी कुठलं आणायचं हुडकून. आधीच इदरकल्याणी जलमलय; आणि त्यात ह्या सगळ्या भवान्या. काय गंऽ बाई व्हायचं माझ्या पोराचं. कामाला हात लावत न्हाई; कशी लगनं व्हायची ह्येंची ? तुज्या ह्या रांडा, तुमची पोटं, बाळंतपणं वघून बघून हाडं वैकुंठाला गेली माझी. किती करू मी एकटीच. आणि कुणासाठी ? याकबी पॉर न्हाई तुला."... बोलू लागली म्हणजे फुलाआत्ती बोलते. कामावर राग काढते. आधीमधी आलेल्या पोरीच्या पाठीत धपाटा रपदिशी बसतो. मात्र दोन-चार कामं जास्त होतात.

सगळ्या गावाची बाळतपण करते. तिचा हात ह्या बाबतीत कोणी धरणार नाही. किती तरी पोराना तिन जन्माला आणल. मल्या पहाटे, अगर भल्या रात्री जरी हाक मारली तरी अर्ध्या घटकेत ती बटवा घेऊन बाहेर पडते. त्या कामाचा तिला कंटाळा नाही. तेवढंच लुगडं-चोळी तिला मिळतं. सुनेचं, तिच, पोरीचं अंग सालभर झाकतं. कैक वर्षं झाली तरी हा उद्योग करते...पहिलट-करणीचा नवरा कधीमधी धावत येतो. "फुलाआत्ती, बायकूच्या पोटात चावाय लागलय."

"सुठ आणि गूळ दे जा की मग ! वाट सरकली असल वघ तिची."

"वाट न्हाई सरकली."

"मग ?"

"आता मग आणि आता. तुला वलवून आण म्हटलय तिनं."

"माझ्या माड्या, कालच पोर तू. मीच तुला जन्माला आणल काल-परवा. तवर ह्यो घोटाळा करून ठेवलास व्हय ? ... चल."

फुलाआत्ती जाते. इथं एक ढेंग तर तिथ एक ढेंग. गाडी लागत नाही नि घोडं लागत नाही.

कोणत्याही बाईला पोरगा झाला की तिचा जीव हरखतो. "आग, पोरगा हाय गऽशाते. वमाचा योल चढला बाई तुझ्या घरावर."

"फुलाआत्ती, तुमचा हातगुण हाय."

"आग, तुझ्या न्हवऱ्याचा गुण. तुझा गुण. माझा गुण कसला; डोंबलाचा ! माझा हातगुण असता तर मला भराभरा नाती झाल्या असत्या ? ... रांडा, डुकरिणीगत व्हाईत बघ. खाऊन दल-दुप्पट झाल्यात. ... तुझ्या पोरासाठी एक वडून आण म्हणं त्यातली.-आरं दत्त्या, च्या कर गाढवा. त्योक झाला बघ."

आतनच मोठ्यान ओरडते आणि बाळ-तिणीच्या दाल्ल्याला चहा करायला सांगते. पोराला आंघोळ घालून निरपून काढते. मग चहा पिऊन घराची वाट. दुसरी कामं. सुनेचं सहावं बाळतपण आल होतं.

"तारा, आगऽतारा" एकाएकी कालवा करती आमच्या घरात आली. आई वाकळ शिवत बसली होती.

"का हो फुलाव्हंजी ?"

"आग, माझ्या सुनला येणा आल्यात. तेवढं बाळतपण करून दे चल बघू."

"हो व्हया ! गंमत करता व्हय माझी?"

"अग, न्हाई. खरंच चल."

"जगाचं बाळतपण तुम्ही करतासा नि सुनेच बाळंतपण करायला मी येऊ व्हय ? मला हो काय कळतय त्यातल ?"

"आग, चल तरी. माझ्या हाताला येशी न्हाई. सगळ्या पोरीच हुत्यात लेकाला. आता त्या सुनचं तोंड मला बघवना. तुझ्या तरी हाताला येश येत का बघू या."

शेवटी फुलाआत्तीला सहावीही नात झाली. आभाळ- पाताळ एक केल. घरावरच्या खापऱ्या उडीविल्या. केस तोडून घेटली. सुनेला उगळून खाल्ली.-नव्याच जुन झालं नि सहाव्या नातीला जपत रामरगाडा सुरू झाला.

सुताराची राधी गरोदरपणात विहिरीत पडून मेली. दाल्ल्याच्या माराला कंटाळली होती. विहिरीतन काढून तिला तपासायला पोटफाडीत आणल होतं. सगळ गाव फुटलं होत. फुलाआत्ती तिथं यायला चुकली नाही. सगळेजण कळकळत होते. राधीच्या नवऱ्याला शिव्या देत होते.

"माझ्या सुडक्या, काय म्हणून र तिला मारलं असशील ?" फुलाआत्तीनं तिच्या नवऱ्याला गाठलं.

"तिला नुसतीच मारली. तासणीनं पाठच तासून काढणार होतो."

"काय म्हणायचं तुला आता !"

"बायकू लई वांड हुती, फुलाआत्ती. एक काम ऐकायची न्हाई." उभा राहिलेला राधीचा नवरा दगड होऊन बोलत होता. मढ्याचा कुजका वास आल्यावर अधून-मधून बाजूला थुकत होता.

"पैलारूच हुती न्हवं का ?"

"पैलारूच."

"माझ्या हाटचा, वंस तरी वाढला असता की तुझा."

"न्हाई वाढना तिकड !"

"खुळच हाय बघ हे." जवळ उभ्या असलेल्या तिसऱ्या माणसाला ती बोलली.- "बघ बघ. डाक्टरानं तपासल्यावर त्येला इचारून तरी बघ पोरगा हुता का पोरगी हुती ते."

आसपासची माणसं हासली. "फुलाआत्ती, तुझं याक लुगड-चोळी चुकल वाटतं." कुणी-तरी त्या गर्दीत फटकळपणा केला. "कोण र त्यो सुडक्या ?" म्हणत फुलाआत्तीहि हसली.

गल्लीत कोणीही मेल तरी त्याच्या घराकडं जाऊन आल्याशिवाय ती राहत नाही. तिथ जाते. आडवा पदर लावून रडते. तिला रडूही वेळच्या वेळी येत. घटकाभर रडल्यावर घरच्या माणसांना समजावते. "जाऊ दे बाई. सोनं झालं त्येचं. देवाच्या सावलीखाली गेला आता त्यो. त्येला रडून रडून आडवी नटी का आणायची ? आगऽजगाची ही अशीच रीत हाय. नवी पानं थोरली हायच्या वक्ताला जुनी पानं झडून जायचीच. ... रोज मी पाच-सात बाळतपणं करते. एवढी जलमत्यात, मग एकदोन तरी हितनं उठून जाणारच. जोडा लेकाच्या पायाला आला की बाऽचा भरवसा नाही म्हणायच. त्येच्यात जीव अडकून ठेवायचा न्हाई. ... ऊठ बघू, चूळ भर." रडत रडत हे शहाणपण वाहत असत. रडणारी माणसं गप बसत असतात. हुंदका आला की पुन्हा रडतात. पुन्हा गप बसतात. घटकातास गेला की फुलाआत्ती उठते. "कामाला लागा आता. रडत बसू नका. गेलेलं माणूस काय परत येत न्हाई." असं सागून बाहेर पडते.

साठ-पासष्ठ वर्षांची आहे. अजून खड-खडीत. नव्या बैलगाडीगत. तिचे वडील शभरीच्या आसपास होते. नवरा मेल्यावर ती एकचा एक पोरगा घेऊन वडिलाकडे आली होती. तिच्या वडिलानी तिला एक बारकसं घर बांधून दिलं होत. त्यात ती राबून खात होती. व्यापार-टापार करत होती. वडील हात-टेकीला आलेले. त्याना तीन मुलगे. आणि ही एक मुलगी. तिघेही भाऊ आनंदाने बायका-

पोरांसह एका घरात राहत होते. हिला मात्र सवतं घर. नणंद-भावजांची भांडणं नकोत म्हणून.

वडिलांना दिसत नव्हतं. काठी धरून राहिले होते. आजारी आहेत की नाहीत काही कळायचं नाही. म्हातारपणाची सर्व काही लक्षणं दिसत होती.

एक दिवस परड्यात जाताना काठी निसरून पायरीवरनं खाली पडले. आणि तिथंच त्यांचा प्राण गेला.

घरात हलकल्लोळ उडाला. सगळी माणसं जमली. फुलाआत्ती बाजारात गेली होती. धावत धावत सगळं गोळा करून घेऊन आली. .. रडून सरकदान केलं. सगळ्या आठवणी उसळून बाहेर आल्या.

दोनतीन दिवस होऊन गेले. दाराच्या तोंडाला रस्त्यात फुलाआत्ती उभी होती. तिच्या वडिलांच्या वारगीचा तवन्नाप्पा वाणी उभा होता. ती सांगत होती, "तवन्नाप्पाण्णा माझ्या बाऽला झकास मराण आलं बघ. मला त्येची लई काळजी वाटत होती. हाल हुतंय का काय, की असं वाटायचं. पर माझा बाऽ वाळला खडखडीत मेला. हातरुणात पडणं न्हाई, हागणं न्हाई, मुतणं न्हाई; समदं त्येचा त्यो करत हुता...दोन वक्ताला ताककण्या तेवढ्या कालवून द्याव्या लागायच्या एवढंच... माझ्या बाऽनं चौथा ल्योक म्हणून मला राखला गा. मला सवतं घर दिलं. पोराचं लगीन करून दिलं. रांड-मुंड बायकू मी. ना दाल्ला, ना जमीन. पोरगं याक इदरकल्याणी. कोण देणार त्येला बायकू. उगच माझा बाऽ हुता म्हणून समदं झालं. नडल्या–कडल्या वक्ताला मूठपसा दिला. हुता तवर राबायला हुश्शी हुती. कुणाचं भ्या वाटत न्हवतं... व्हगाडलं समदं आता. मरतानं त्येची एक इच्छा माझ्या हातानं पुरी झाली न्हाई. "नातू नातू" म्हणून मेला. माझ्या पोराला एकादा ल्योक असता तर त्येला साकडं पडलं नसतं..."

सून सातव्यांदा गरोदर होती. खंगून खंगून तोळा–मासा उरली होती. सगळीकडनं उगळली होती. फक्त पोट तेवढं ढीगभर उरलं होतं. तिन्हींकडून तिघेजण खात होते. नवरा मनात आल्यावर भूक भागवण्यासाठी पोटभर लाथा घालत होता. फुलाआत्तीनं आपलं तोंड संपूर्ण सोडलं होतं. उलती-पालथी करून तव्यावर भाजल्यागत करत होती. पाच-सहा पोरीतर एक वक्तालाही धड जेवू देत नव्हत्या. एक रडायचं तर दुसरं प्यायचं. तिसरं पाणी घाल ये म्हणून उंबऱ्यात बसून आरडायचं. चौथ्यानं गाडगं नाहीतर झाकणी आपटून फोडलेली असायची. सुनेला त्यावेळी सासूचं नुसतं डोळं दिसायचं. आतल्या आत मनाला कोरून खायची. अवघडलेलं पोट घेऊन हिकडनं तिकडं हिंडायची.

फुलाआत्तीचे वडील वारल्यावर तीन महिन्यांनी बाळंतपण आलं. फुलाआत्ती आईकडं आली.

"तारा, सुनंला येणा यायला लागल्यात."

"आता मी कशाला येऊ फुलाव्हंजी? मागच्या डावाला बघिटलंसा न्हवं?"

"एवढ्या डावाला चल."

"तुम्हीच करा जावा आता. देवाच्या मनात आल्याबिगार पोरगा हुणार हाय व्हय? आणि मला त्या बाळंतपणातलं तरी कुठं कळतंय?"

"न्हाई कळंना. मी सांगते चल. खरं एवढ्या डावाला तुझा आणखी एकदा हातगुण बघायचा."

आई गेली. सुनेला बाळंतपण कुचंबलं. दोघींनी मिळून केलं.

पण ह्या वेळी फुलाआत्तीला नातू झाला. सून मुलाला जन्म देऊन टाकलेल्या टरफलासारखी बाजूला बसली. आणि फुलाआत्तीचीच घरातनं गडबड उडाली...मला नातू झाला! माझ्या लेकाला ल्योक झाला! तिचा जीव सुपाएवढा झाला. सुनेला तशीच मिठी मारून ती घळाघळा रडली.

"लई छळली बाई मी तुला. आता सुखानं बसून खा." सून हुंदके देऊन गरगरून रडली.

पोराला पहिली आंघोळ घालता घालता आईला फुलाआत्ती म्हणाली, "तारा, पोराला माझ्या बाऽचं नाव ठिवायचं, माझा बाऽ माझ्या सुनंच्या पोटाला आलाय. त्येला माझ्या सुनंची कळकळ आली...तारा, माझ्या सुनंला गेली आठ नऊ वरसं मी फोडून खाल्ली ग! वाळल्या गवतागत झालीया. जळ्ळं देवानं तोंड एक असलं दिलंय मला!"

• • •


उत्कृष्ट मसाला
बनवणारे दोनच!




हे दोन कोण बुवा?
असा प्रश्न पडण्याचें कारण नाहीं
दोना पैकीं पहिले तुम्ही स्वतः!
तुम्ही बनवलेला मसाला उत्कृष्ट
असतो याबद्दल कुणीच शंका
घेणार नाहीं. पण तुमच्यानंतर
मात्र आमचा क्रमांक! तुम्हांला मसाला बनवण्यास वेळ न
झाल्यास बेडेकर मसाला त्याची उणीव भासूं देणार नाहीं.




व्ही. पी. बेडेकर ॲन्ड सन्स प्रा. लि. मुगभाट मुंबई ४
शाखा:–ठाकुरद्वार, दादर, फोर्ट, परेल, पेरूगेट पुणें

# अपराध मीच केला !

## हे कालेलकरांनी कबूल करावे



● कामिनी कदम ● बालनट सचीन

सुप्रसिद्ध नानावटी प्रकरणावरील हे नाटकी कलम ! त्या खटल्यातील व्यक्तीं-प्रमाणेच येथेही नेव्हल कमांडर आहे. (अशोक वर्टी ), त्याची सुस्वरूप पत्नी आहे ( शैला वर्टी ) आणि यांच्या प्रेमातील खलनायक ठरणारा रंगेल, श्रीमंत आणि देखणा व्यापारीही आहे ( अजिक्य ). कमांडर अशोक वर्टी महिनेन्‌महिने घराबाहेर असतो. त्यामुळे एकलेपणाच्या व्यथेने व्याकुळ झालेली त्याची पत्नी अजिक्याच्या सहवासात दिवसेंन्‌दिवस घालवू लागते. अजिक्य अनेक स्त्रियांच्या आयुष्याशी खेळला असल्याने शैलाला भुरळ घालण्यात तो सहजासहजी यशस्वी ठरतो. साहजिकच नाना प्रकारचे लोकापवाद उठू लागतात. पण शैला अजिक्यच्या मायाजालात इतकी गुरफटलेली असते, की प्रत्यक्ष नवऱ्याचा स्पर्श तिला नकोसा वाटू लागतो. मनातून नवऱ्याविषयी ओढ वाटत असतानाही ती अजिक्यला विसरू शकत नाही. अशोकला ही गोष्ट समजताच तो विलक्षण संतापतो आणि मग चिडलेल्या अशोकच्या पिस्तुलाने अजिक्य मृत्यू पावतो. प्रकरण कोर्टात जाते. अशोक जन्मठेपेच्या शिक्षेवर जातो. पुन्हा शैला एकटी ती एकटीच !

नानावटी खटल्यात जे पुढे आले तेवढेच कालेलकरांनी सांगितले आहे. त्यांची मुख्य कॉन्ट्रिब्युशन म्हणजे अशोक, शैला व अजिक्य, ही तीन नवी नावे त्यांनी अनुक्रमे कॅप्टन नानावटी, सिल्व्हिया नानावटी व अहुजा यांच्यासाठी शोधून काढली ! यापेक्षा नावे आहेत तीच ठेवली असती तर नाटक अधिक वास्तव नसते का झाले ?

### संवाद साधे-सोपे

कालेलकरांचे संवाद साधे, सोपे आहेतच; पण त्यांत आकर्षकताहि आहे. अशोकचे मास्तर (गोळे मास्तर) यांचे व्यक्तिचित्रण रेखाटताना लेखक तन्मय झाला आहे ! आता नाटकाच्या कथानकाशी गोळे मास्तरांचा सूतराम संबंध नाही हे सोडा. पण हे गोळे मास्तर ठाशीवपणे उभे राहतात. गोळे मास्तरांच्या तोंडून आजच्या अनेकविध गोष्टींवर टीका असल्याने फारच रंगत येते, जिवंतपणा येतो. त्यामध्ये स्त्रियांचे नटणे-मुरडणे, त्यांच्या स्वातंत्र्याच्या कल्पना, त्यांतून निर्माण झालेली त्यांची मनोवृत्ती, आजच्या मुलांना मिळणारे शिक्षण, त्यावरील पाश्चात्य संस्कृतीचा पगडा, आजचे मंत्री, त्यांचे राजकारण, अशा कितीतरी गोष्टींवर टीकास्त्र सोडले आहे. ही टीका परखड असल्याने मजा येते !

अन्य पात्रात अशोक वर्टी आणि शैला वर्टी या व्यक्तिरेखाही नीट कोरलेल्या आहेत. या आणि अन्य व्यक्तिरेखा रंगभूमीवर प्रभावीपणे व्यक्त करण्यात कलाकारांनीही भरपूर श्रम घेतले असल्याचे दिसून येत होते. बाल–कलाकार सचीन हा तर सर्वांच्याच चर्चेचा विषय होता. त्याला बुजरेपणा कसा तो माहीतच नव्हता. मोठ्यांच्याच तोडीने अगदी सहजपणे तो स्टेजवर वावरला. भावी काळात त्याच्याबद्दल आशा बाळगायला हरकत नाही. वगैरे...! लोकप्रियता त्याची प्रगती थांबविणार तर नाही ना, असाही संशय व्यक्त करून पळवाट ठेवावी म्हणजे बरे ! कामिनी कदम यांचे रंगभूमीवरील आगमन अनेक दृष्टीने अभिनंदनीय ठरले आहे. त्या दिसल्या अतिशय सुंदर, सुस्वरूप ! जशा हव्या होत्या, वर्णन केल्या होत्या तशाच ! त्यांनी कामही समजून, मन लावून केले. अरूण सरनाईक यांचे परिश्रम जागोजागी व्यक्त होत होते. तिसऱ्या अंकात अजिक्यच्या खुनाच्या वेळी मात्र नाटकाचा जो अपेक्षित परिणाम व्हायला हवा होता तो देण्यात ते कमी वाटले, अर्थात अशोक कामातून म्हणजे राजन जावळे यांच्याकडून जो प्रतिसाद मिळायला हवा होता तो कमी होता हेही लक्षात घेतले पाहिजे. राजन दिसले ठीक, पण अभिनय शून्य ! त्यामुळे पहिल्या दोन अंकांत नाही तरी तिसऱ्या अंकात ही उणीव फार प्रकर्षाने जाणवली. तारा दीक्षित यांच्या भूमिकेची जरूरी खरोखरच होती का ? मग त्यांच्या कामाविषयी काय लिहायचे ? राजा नेने ( जस्टिस बागळे ) आणि वसंत ठेंगडी ( पोलीस-प्रॉसिक्यूटर उपळेकर ) हे दोघेही असेच अधांतरी वाटतात. पण कोर्टाच्या सीनमध्ये त्यांचा उपयोग झाला ! शरद तळवलकर यांची गोळे मास्तरांची भूमिका

स्मरणीय आहे ही गोष्ट अगदी खरी असली तरी ते सर्व यश कालेलकराचे आहे. तळवलकरांनी स्वत चे असे कोणतेच वैशिष्टच उभे केलेले नाही.

### दिग्दर्शक दोनच अंकांत

आत्माराम भेंडे याचे दिग्दर्शनकौशल्य पहिल्या दोन अकात फारच उत्तम तऱ्हेने व्यक्त झाले आहे. त्यांत अभ्यास आहे, रेखीवपणा आहे. पण पुढील दोन अक इतके दुबळे आणि पोचट आहेत की ' हे तेच का भेंडे ? ' असा प्रश्न पडतो. अजिक्यच्या खुनाचा आणि कोर्टाचा सीन हे ज्या प्रमाणात उठावदार व्हायला हवे होते तितके होत नाहीत. पहिल्या दोन अकानतर मन भारावलेले प्रेक्षक, तिसरा अक सपताच इतके कावरेबावरे होतात की हे आपण पाहिले काय असा प्रश्न त्याना पडतो. हीच गोष्ट चौथ्या अकात ! नाटक घसरत घसरत अशा पातळीवर येते की त्याचा थाग लागणेच अशक्य ! नाटकाने जी काही उची गाठली होती ती साभाळणे अगर वाढविणे या दोनही बाबतीत लेखकाचा पराभव झाला आहे, असेच खेदाने म्हणावे लागते. नाटकाचा मूळ गाभा मानसिक संघर्षावर आधारित आहे. पण लेखकाला ह्या सघर्षाला नीट पकडता आलेले नाही. त्याची हाताळणी अत्यत उथळ वाटते. शैला आणि अजिक्य याची जवळीक येण्याबाबतची अधिक कारणे, प्रसंग दाखवायला हवे होते.

रघुवीर तळाशिकर याचे नेपथ्य देखणे आहे, ते फक्त अशोक वर्टीच्या घराची सजावट पाहताना पटले ! पण तिसऱ्या अकातील अजिक्यच्या बेडरूमबाबत त्यानी एवढी काटकसर का दाखविली ? अजिक्य श्रीमत, ऐषारामी, रगेल आहे असे नाटकातून समजते. पण त्याच्या बेडरूमला फक्त एअरकुलर्स लावून ते कसे व्यक्त व्हावे ? त्यामधून तळाशिकर याच्या कल्पनेला खचितच वाव होता. पण संपूर्ण निराशा होते. हीच गोष्ट कोर्टाच्या सीनची ! प्रश्न पडतो की दुसऱ्या दोन अंकाला तळाशिकराचे सेटिंग आहे का दुसऱ्या कुणाचे ? अर्थात, नाटक दोन अकानतर घसरते, याची सर्व जबाबदारी नाटककाराची आहे, हे कालेकरानी कबूल केले म्हणजे झाले !

●

# चिनी बदाम

## • • • कडू आणि गोड

दोन महिन्यात पचवीस प्रयोग करण्याचे भाग्य फारच थोड्या नाटकाना लाभते. विशेषत: बालनाट्य सस्थाना तर असा सुदिन क्वचितच यायचा. पण मुबईची ' लिट्ल थिएटर ' ही सस्था ' चिनी बदाम ' या नाटकाच्या बाबतीत अशी भाग्यवान ठरली आहे, असे ऐकले होते.

नुकताच झालेला पुण्यातील प्रयोग पाहून आमच्या मनात या भाग्याविषयी काहीसा संभ्रम निर्माण झाला.

नाटकाचे कथानक असे आहे – दिल्ली येथील हवाई दलातील एक अधिकारी, बाबासाहेब काळे याचा मुलगा श्याम आणि त्याचा पूर्वीचा नोकर केवलसिग गुरखा याच्या साहसाची ही कथा आहे. हरनाम मोगा नावाच्या एका चीनच्या हेराच्या तावडीत केवलसिग सापडतो. मोगा त्याचा वाईट उपयोग करून घेऊ पाहात असतो. पोलिसाना त्याचमुळे केवलसिगाचा सशय येतो. ते त्याच्या मागावर असतात. श्याम केवलसिगच्या नेकीबद्दल पोलिसांना वारंवार खात्री देत असतो, पण पोलिसाना हे पटत नाही. अखेरीस केवलसिग आणि श्याम यांच्यामुळेच हरनाम मोगा पोलिसाना सापडतो. आजच्या काळात तरुण मुलांपुढे हे असे धाडसाने भरलेले, देशभक्ती शिकविणारे कथानक सादर केले आहे; यात योग्य निवड आणि कल्पकता आहे याबद्दल वादच नाही. पण त्यातील अनेक असंभाव्य घटनामुळे पुष्कळच असमाधान निर्माण होते, त्या मनाला पटत नाहीत. बाबासाहेब काळे याच्या तिजोरीत असलेले नकाशे आणि त्याच्या खाजगी विमानाच्या किल्ल्या हेराच्या हाती केव्हाही पडण्याची शक्यता आहे, असा सशय पोलिसांना येतो. पण त्या गोष्टी बाबासाहेबाकडून घेऊन सुरक्षित ठिकाणी हलविण्याऐवजी, अगर त्या ठिकाणी पोलीसपहारा बसविण्याऐवजी पोलीस बाबासाहेबाच्याच राम नावाच्या १४–१५ वर्षांच्या मुलावर त्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपवून चालते होतात; ही गोष्ट मनाला कशी पटावी ? रामचे धाडस, श्यामची, केवलसिगची कर्तबगारी वगैरे सिद्ध करण्यासाठी या न पटणाऱ्याही गोष्टी समाविष्ट केल्या आहेत. त्यामुळे नाटकाला उणेपणा येत नाही का ? मुलाचे धाडस दुसऱ्या अनेक गोष्टीतून दाखविता आले नसते का ! अशासारख्या इतरही तीनचार असभाव्य घटना नाटकात आहेत. पण त्या केवळ मुलाना खूष करण्यासाठी, टाळ्या घेण्यासाठी आहेत हे लक्षात आल्याने त्याकडे दुर्लक्ष करावेसे वाटते. नाटकातील पदाची रचना मात्र उत्तम आहे.


### बाल-कलाकारांचे यश

सर्व बाल-कलाकाराकडून कामे व्यवस्थित तऱ्हेने करवून घेतल्याबद्दल दिग्दर्शिका सौ. सुधा करमरकर याचे मन:पूर्वक अभिनंदन केले पाहिजे. सर्वच कलाकाराची कामे उत्तम असली तरी हेमागी दुमणे (मिनी) आणि प्रकाशभानू (श्याम) हे दोघे बालकलाकार तर मनात घर करून राहतात. विशेषत: हेमागी दुमणे हिचे विस्मरण होणे केवळ अशक्य ! तिचा धीटपणा, तिची समज आणि मुद्राभिनय सारेच काही उल्लेखनीय ठरेल. प्रेक्षक अक्षरश: थक्क होतात. प्रकाशभानूचेही कौतुक वाटते याबरोबर लता वर्वे (मालू) आणि कमलाकर नाडकर्णी, केवलसिग ऊर्फ चिनी बदाम याची कामेही उत्तम वाटतात.

प्रयोग पाहताना तो बरा वाटत असला तरी लेखनातील गोंधळून टाकणारा भाग आणि नेपथ्याबाबतची हेळसाड या गोष्टी मनाला डाचतात. आजवर लेखन आणि नेपथ्य या दोनही बाबतीत सुधाबाई अणि ' लिट्ल थिएटर ' अजोड होते, मग याचवेळी ह्या दोनही बाबतीत निराशा का व्हावी ?

● ●

टॉम वीव्हर्स



# नवा 'डेव्हिडसन' –टॉम वीव्हर्स!

भारत-ऑस्ट्रेलिया सामना नुकताच संपला. ऑस्ट्रेलियाने हा सामना १३९ धावांनी अखेर जिंकला असलातरी या सामन्यात कुठल्याही संघाची सामन्यावर, शेवटच्या दिवशी उपहारापूर्वीचे पट्क पडेपर्यंत पकड बसलेली नसल्यामुळे, सामना पाची दिवस रंगत गेला. भारताचा पराभव झाला, त्याला मुख्य कारण मद्रासच्या मैदानावर, शेवटच्या दिवशी खेळण्याची पाळी भारतावर आली येवढे एकच आहे. जर भारताने नाणेफेक जिंकली असती व प्रथम फलंदाजी केली असती तर कदाचित हा सामना भारतानेही जिंकला असता.

चौथ्या दिवशी सायंकाळी वाईट उजेडामुळे खेळ थांबवण्यासाठी दिलीप सरदेसाई यांनी केलेले अपील पंचांनी फेटाळले नसते तर कदाचित हा सामना अनिर्णित ठेवण्यात भारताला यश लाभले असते. भारताने सामना निश्चितच जिंकला नसता याचे उघड कारण हे आहे, की शेवटच्या दिवशी २५० पेक्षा जास्त धावा करून सामना जिंकल्याचे उदाहरण कसोटी सामन्यांच्या इतिहासात अपवादात्मक एखादे असले तरच ! सामना जेव्हा निर्णायक होतो तेव्हा तो शेवटच्या दिवशी क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाने जिंकलेला असतो –जर शेवटच्या दिवशी सकाळपासून २५० धावसंख्येची आघाडी असती तर !

या दृष्टीने जेव्हा चौथ्या दिवशी वीव्हर्स–मार्टीन या जोडीने ६१ मिनिटांत ६४ धावा करून व पाठोपाठ वीव्हर्स-मॅकेंझी या जोडीने ७३ धावांची भागीदारी केली, तेव्हाच हा सामना भारताच्या दृष्टीने हातातून गेला. उरल्या दोन शक्यता. अनिर्णित किंवा ऑस्ट्रेलियाचा विजय–! सरदेसाईने वाईट प्रकाशासंबंधी केलेले अपील पंचांनी फेटाळून लावल्यावर सरदेसाई बाद झाला. यावेळी पतौडीने कृपालला पाठवून आणखी एक चूक केली. यावेळी बापू नाडकर्णी आला असता तर कदाचित सामन्याचा रंग पालटला असता. असो. लढत चांगली झाली. खेळ कंटाळवाणा झाला नाही. पतौडीचे नाबाद शतक, हनुमंतसिंगची आक्रमक टोलेबाजी, आणि नाडकर्णीचे अकरा बळी ऑस्ट्रेलिया विसरणार नाही.

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात ५ बाद १७४ धावसंख्येवर मार्टीनने धावसंख्या २०३ वर आणल्यावर जेव्हा वीव्हर्स बाद झाला तेव्हाच ऑस्ट्रेलियाची धावसंख्या आता २५० गाठीत नाही हे स्पष्ट झाले ! इंग्लंड–ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यात पूर्वीच्या ऑस्ट्रेलियन संघातील डेव्हिडसन्‌ची जागा नेमकी कुणी भरून काढली असेल तर ती आस्ट्रेलियाचा खेळाडू टॉम वीव्हर्स याने, हे क्रिकेटषोकिनांच्या ध्यानी आले असेल. अर्थात वीव्हर्सचा त्रिफळा कृपालने उडवताच ऑस्ट्रेलियाची शेपटी वळवळलीच नाही. दुसऱ्या डावात काय झाले पाहा–रेडपाथची विकेट नाडकर्णीने घेतली, तेव्हा ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ६ बाद २३२ अशी होती. वीव्हर्स व मार्टीन ही जोडी यावेळी जमली तर पहिल्या डावाप्रमाणे वीव्हर्स उडला असता तर सुमारे १९० धावाच भारताला दुसऱ्या डावात कराव्या लागल्या असत्या व भारताने सामना जिंकला असता. परंतु बरोबर उलटे झाले. वीव्हर्सने तीन षट्‌कारांनी व पाच चौकारांनी ७३ धावा काढल्या. वीव्हर्स खेळल्यामुळे मार्टीनवर दबाव पडला नाही. वीव्हर्सची विकेट पडली ती आठवी. लगेच दहा मिनिटांत उरलेल्या विकेट्स पडून ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव संपला तो ३९७ धावसंख्येवर. भारताच्या हातातून सामना हिसकला तो वीव्हर्सने !

याच वीव्हर्सने इंग्लंड-ऑस्ट्रेलिया लढतीत दुसऱ्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी डावात ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ५ बाद ८४ असताना, ५४ धावा काढून या सामन्यातून ऑस्ट्रेलियास वाचवले, हे वाचकांना आठवत असेल.

हा टॉम वीव्हर्स आहे, क्विन्सलंडचा खेळाडू. हा डावखोरा फलंदाज आहे. आणि उजव्या हाताने तो 'ऑफस्पिन' गोलंदाजी करतो. १९५६ साली मकाय आणि लिंडवाल यांनी वीव्हर्सला प्रथम खेळताना पाहिले. इऑन् जॉन्सन निवृत्त झाल्यानंतर ऑस्ट्रेलियाला चांगला ऑफस्पिनर मिळालेला नाही. या दृष्टीने, वीव्हर्स हाच तयार होण्यातला आहे. असे त्यांना वाटले व त्यांनी त्याला गोलंदाजीवरच भर देण्याचा सल्ला दिला. १९५७ साली क्विन्सलंडकडून फलंदाज म्हणून निवड झालेला वीव्हर्स सात वर्षांच्या तपश्चर्येनंतर इंग्लंडच्या दौऱ्यासाठी निवडला गेला, तो मात्र स्पिनर म्हणून. पहिल्याच कसोटी सामन्यात इंग्लंडच्या दोन्ही डावांत मिळून वीव्हर्सने पाच बळी घेतले. या सामन्यात त्याचे पृथक्करण आहे—२४ षट्के २ निर्धाव, ६४ धावा आणि ५ बळी. दुसऱ्या कसोटी सामन्यात तो ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीचाच कणा ठरला. या सामन्यातही त्याने ३ बळी घेतले. चौथ्या सामन्यात दोन्ही संघांनी ६०० च्यावर धावा केल्या. यातही वीव्हर्सला ३ बळी आहेत. शेवटचा पाचवा सामना तर वीव्हर्सने गाजवलाच. त्याने नाबाद ६७ धावा काढून आपली फलंदाजी सिद्ध केलीच, परंतु शेवटच्या दिवशी त्याने सकाळी ११ वाजता गोलंदाजी सुरू केली ती सव्वापाच वाजेपर्यंत तो अविश्रांतपणे चेंडू टाकीत होता. सामना अनिर्णित होणार हे निश्चितच झाले होते. वीव्हर्सने ४७ षट्के टाकली, त्यातहि १५ निर्धाव होती.

याच वीव्हर्सने भारताच्या हातातून मद्रासचा सामना फलंदाजीने हिसकला व हनुमंतसिंगला बाद करून सामना सिम्पसनच्या हाती ठेवला.

दुसरा कसोटी सामना मुंबईला १० ऑक्टोबरला सुरू होत आहे. जो संघ पहिल्या दिवशी नाणेफेक जिंकून फलंदाजी पत्करील, त्याची अनपेक्षित घसरगुंडी नाही झाली तर हा सामना अनिर्णितच राहील.

इंद्रजितसिंहचा आग्रह सोडून यावेळी फरुक इंजिनीयरला पुनश्च संघात स्थान मिळेल अशी आशा करू या. कृपाल जाणार हे नक्की! त्याचे जागी बहुधा चंद्रशेखर येईल.

—मद्रास कसोटी सामन्याचे वर्णन करताना विजयानगरचे महाराज यांनी क्षेत्ररक्षणाचे वर्णन एकदा असे केले—

"फोर मेन ऑन दि ऑफ साइड, फाईव्ह ऑन दि लेग साईड, विकेट कीपर अॅन्ड बोलर!" अखेरच्या जोडीपैकी रांजणे उडाला की दुराणी हे देखील या—इसमानं नीट सांगितले नाही. विजय मिळताक्षणीच मैदानावर ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या काय प्रतिक्रिया होत होत्या हे सांगण्याची जरूरी याला वाटली नाही. हनुमंतसिंगने चौकार मारून संघाची धावसंख्या शंभर झाली म्हणून ज्या टाळ्या पडल्या त्या हनुमंतसिंगच्या चौकारालाच आहेत असे समजून हा माणूस त्या चौकाराचीच आचरट स्तुती करीत राहिला! 'वेल डन सर' या एका उद्गाराखेरीज ज्याला फलंदाजीचे वर्णन करता येत नाही, क्षणापूर्वी कितवी विकेट पडली हे त्याला आठवत नाही, अशा या म्हातारचळी माणसाला रेडिओवर निवेदक नेमण्यात येते ते कोणत्या गुणावर, याचा रेडिओच्या अधिकाऱ्यानी सदाचाराला स्मरून निदान खुलासा तरी करावा! सर्व क्रिकेट शौकिनांनी इंदिरा गांधी यांना पत्रे धाडून—निदान कलकत्ता सामन्याचेवेळी तरी याची उचलबांगडी करावी अशी विनंती करण्याची वेळ आता आली आहे. मुंबई सामन्याचे वेळी मर्चंट असल्यामुळे विझी निवेदक नसणार! ●

## ट्रूमनचे तीनशे

कसोटी सामन्यांत तीनशेहून अधिक बळी घेण्याचा जागतिक विक्रम नुकताच इंग्लंडचा वेगवान गोलंदाज फ्रेडी ट्रूमन याने केला. ५ जून १९५२ ला लीड्स् येथील पहिल्या कसोटी सामन्यात भारताच्या पॉली उमरीगर याचा पहिला बळी घेऊन ट्रूमन याने आपल्या कसोटी कारकीर्दीचा श्रीगणेशा केला. उमरीगर—झेल इव्हान्स गोलंदाज ट्रूमन!—८! यानंतर ओळीने ६५ कसोटी सामने निरनिराळ्या देशांविरुद्ध खेळताना १२ वर्षांत ट्रूमनने ३०० बळी घेतले. शेवटचा ३०० वा बळी म्हणजे ऑस्ट्रेलियाचा हॉक.



नुकत्याच झालेल्या ओव्हल येथील ५ व्या कसोटी सामन्यात १५ ऑगस्ट १९६४ ला हा बळी त्याने घेतला. हॉक-झेल काउड्री—गोलंदाज ट्रूमन १४!

या सर्व तीनशेबळीकरतां त्याने ही गोलंदाजी टाकली, तिचे पृथक्करण असे—

१४५८४ चेंडू टाकले.
४९८ निर्धाव पडले.
६३८७ धावा दिल्या
३०० बळी घेतले.

सरासरीने २१ धावांना त्याने एक बळी खरेदी केला.

या बळीत सर्वांत स्वस्त बळी कुणाचे मिळाले? भारताचे! भारताने ५३ बळींची वर्गणी ट्रूमनला दिली व यासाठी त्याने प्रत्येक बळीला सरासरीने १५ धावा दिल्या. सर्वात महाग बळी पडले ते कुणाचे? ऑस्ट्रेलियाचे. ७८ बळी या ३०० बळीत ऑस्ट्रेलियाचे आहेत. ही खरेदी त्याने सरासरीने एका बळीसाठी २६ धावा देऊन केली आहे.

म्हणजे सध्या कसोटी सामने चालू आहेत ते ट्रूमनच्या दृष्टीने, सर्वात जगातील कमकुवत आणि सर्वांत बलवान संघाचे!

—— पण हे काही तितकेसे खरे नाही.

—— जयसिंह, सरदेसाई, कुंदरम्, हनुमंतसिंग, पतौडी, नाडकर्णी, बोर्डे, सुरती, दुराणी यांच्या खेळात जोम आहे. ट्रूमनच्या कारकीर्दीच्या अखेरीस ही मंडळी पुढे आली आहेत आणि यांची व ट्रूमनची अजून गाठच पडलेली नाही! ●●०

समजताच श्रीनगरच्या काही भागात लोकांनी फटाके उडवून आनंद व्यक्त केला.



शेख अब्दुल्ला

## : १ :
## काश्मीर

काश्मीरमध्ये काय घडत आहे ? काश्मीर आमच्या हाती राहाणार आहे की नाही अशी चिंता वाटावी अशा घटना गेल्या काही दिवसांत घडल्या आहेत. हिंदशी एकनिष्ठ म्हणून एखाद्या नेत्यावर विश्वास टाकून काश्मीरच्या कारभाराची सूत्रे त्याच्याकडे द्यावी आणि काही वर्षांनी त्यांची निष्ठा तकलुपी, खोटी, ढोंगीपणाची असल्याचे दिसून यावे, असे किती वेळा घडणार आहे ? शेख अब्दुला व बक्षी गुलाम महमद ही दोन्ही खोटी नाणी निघाली. शेख अबदुल्लांनी १९४७ ते १९५३ व बक्षींनी त्यानंतर दहा वर्षे काश्मीरची सत्ता अनिर्बंध उपभोगली. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना या दोघांचे खरे स्वरूप लौकर का समजले नाही ? त्यांना माणसांची पारख नव्हती. की पारख झाली असूनही एकदा जवळ केलेल्या व्यक्तींना दूर कसे लोटावयाचे म्हणून या दोघांना इतकी वर्षे अधिकारावर राहू दिले ?

ता. २२ सप्टेंबरला पहाटे ४–५५ ची वेळ. बक्षी झोपेतून उठण्यापूर्वीच श्रीनगरच्या पोलीस सुपरिंटेंडेंटने त्यांच्यावर अटकेचे वारंट बजावले. आणि तीन तासांनी शेख अबदुल्लांना ज्या उधमपूर तुरुंगात ठेवले होते तेथेच बक्षींची रवानगी करण्यात आली. शांतता व सुरक्षिततेस धोका आणणाऱ्या हालचाली केल्याच्या आरोपावरून बक्षी, काश्मीर विधानसभेचे चार आमदार व आणखी दोघांना भारत संरक्षण नियमांखाली अटक झाली. याशिवाय लाचलुचपतीचे आरोप बक्षींवर असून त्यांच्या चौकशीसाठी कमिशन नेमण्यात येईल,

# रा ज की य घ डा मो डी

असे मुख्यमंत्री सादिक यांनी सांगितले. लाचलुचपतीच्या आरोपांचा फारसा तपशील अजून बाहेर आलेला नाही, पण बक्षींच्या भावांच्या नावावर निरनिराळ्या कंपन्या काढण्यात आल्या, त्यांना परवाने व सवलती दिल्या गेल्या आणि त्यांनी अमाप संपत्ती मिळवली असे काश्मीरमध्ये सर्वत्र बोलले जाते. बक्षींच्या अटकेची बातमी

### केंद्र सरकार अंधारात

बक्षींची अटक केंद्रसरकारच्या सांगण्यावरून झालेली नाही. केंद्र सरकारचा सल्लाही या बाबतीत घेतलेला नव्हता. एवढेच नव्हे तर केंद्र सरकारला आगाऊ कळविलेही नाही, असे पंतप्रधान शास्त्रींनी राज्यसभेत सांगितले. काँग्रेसच्या मध्यवर्ती नेतृत्वाची जरब, पकड व वचक राज्यांतील नेत्यांवर राहिलेला नाही, याचे ओरिसानंतरचे हे ताजे उदाहरण. अटकेचा निर्णय सादिक सरकारने २१ सप्टेंबरला रात्री घेतला व पंतप्रधान शास्त्रींना दुसऱ्या दिवशी नऊ वाजता म्हणजे अटकेनंतर चार तासांनी फोनने कळविले. केंद्रीय गृहखात्याचा काश्मीर विभाग असून त्याचे खास चिटणीस शंकर प्रसाद या महत्त्वाच्या घटनांचे वेळी श्रीनगरातच होते. पण त्यांनीही केंद्र सरकारला काहीच कसे कळविले नाही ? की त्यांनासुद्धा अटकेची कल्पना नव्हती ?

बक्षींच्या अटकेबरोबरच काश्मीर विधानसभेची बैठक बेमुदत स्थगित करण्यात आली. ही बैठक आदल्याच दिवशी सुरू झाली होती. हा महत्त्वाचा निर्णय काही तडकाफडकी घेतलेला नसून आदल्या दिवशी बक्षींच्या अटकेच्या निर्णयाबरोबरच घेतला असला पाहिजे, पण त्याबद्दलही केंद्रसरकारला काही कळविण्यात आले नाही. काश्मीर भारताचा अविभाज्य घटक आहे असे म्हणावयाचे आणि तेथे घडणाऱ्या महत्त्वाच्या घटनांची केंद्रसरकारला अगाऊ कल्पनाही असू नये ही परिस्थिती निश्चितच चिंतनीय आहे.



बक्षी

### बक्षींचे मनसुबे

बक्षींची अटक आणि काश्मीर विधानसभा बरखास्त करणे या दोन्ही घटनांचा एकमेकांशी संबंध होता. विधानसभेत सादिक सरकार विरुद्ध सदरेरियासत डॉ. करणसिंग यांच्याविरुद्ध आणि स्पीकरविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याचे बक्षींचे प्रयत्न चालू होते. विधानसभेचे सध्या ७१ सभासद असून त्यात नॅशनल कॉन्फरन्सचे ६७ आहेत. त्यापैकी ३६ जणांचा म्हणजे बहुसंख्य सभासदांचा पाठिंबा बक्षींनी अविश्वास ठरावास मिळविला

## काश्मिरात राज्य भारताचे सत्ता कोणाची ?

होता असे, म्हणतात. सादिक सरकार गडगडले की आपण स्वतः मुख्यमंत्री व्हायचे आणि शेख अब्दुल्लांना सदरेरियासत करावयाचे, मग आपली लाचलुचपतीची प्रकरणे सहज उडविता येतील, असे बक्षींचे मनसुबे होते.

**राजीनाम्याचे नाटक**

बक्षींच्या गेल्या वर्षभरातील हालचाली लक्षात घेण्यासारख्या आहेत. कामराज योजनेखाली एक वर्षापूर्वी मुख्यमंत्रिपद सोडण्याची तयारी बक्षींनी आपण होऊन दर्शविली व पंडित नेहरूंकडे राजीनामा सादर केला. वास्तविक कामराज योजना कॉंग्रेस संघटनेपुरतीच होती. नॅशनल कॉन्फरन्सला ती लागू नव्हती. एवढीच तांत्रिक अडचण असेल तर चार आणे देऊन कॉंग्रेस सभासद होण्याचीही तयारी बक्षींनी दर्शविली. पण बक्षींचा हा राजीनामा म्हणजे त्यागाचे नाटक होते. आपला राजीनामा खरोखरच स्वीकारला जाईल अशी त्यांना कल्पना नव्हती व तशी त्यांची अपेक्षाही नव्हती. पण बक्षींच्या लाचलुचपतीच्या कारभाराविरुद्ध तक्रारी नेहरूंकडे आल्या होत्या. त्यांना अधिकारपदावरून दूर करण्याची संधी कामराज योजनेने मिळाली, तिचा पूर्ण फायदा नेहरूंनी घेतला व बक्षींचा राजीनामा स्वीकारला.

मुख्यमंत्रिपद सुटले तरी काश्मीर सरकारवर आपली पकड कायम ठेवण्याच्या दृष्टीने बक्षींच्या हालचाली यानंतर सुरू झाल्या. बक्षींच्या जागी निवडलेले नवे मुख्यमंत्री शमसुद्दीन बक्षींच्याच गटातले व त्यांच्या तंत्राने चालणारेही होते. पण हजरतबाल चोरीनंतरच्या परिस्थितीस परिणामकारकपणे तोंड देण्यास शमसुद्दीन असमर्थ ठरले. आपणालाच पुन्हा मुख्यमंत्री होण्याची विनंती केली जाईल, अशी बक्षींची अपेक्षा होती. पण त्यांच्याकडे सूत्रे द्यावयाची नाहीत या निर्णयावर शास्त्री आणि नेहरू ठाम राहिले. सादिक यांची मुख्यमंत्रिपदी निवड झाली.

**सादिक सरकारवर दोष का ?**

सादिक मंत्रिमंडळाला पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन बक्षींनी दिले होते, पण प्रत्यक्षात आपल्या हाती सत्ता कशी येईल, या दृष्टीने त्यांच्या हालचाली सुरू झाल्या. नॅशनल कॉन्फरन्सचे ते अध्यक्ष होते. विधानसभेतहि नॅशनल कॉन्फरन्सचे बहुसंख्य सभासद त्यांच्याच तंत्राने चालणारे होते. सादिक सरकारने लाचलुचपतीविरुद्ध परिणामकारक उपाय योजण्याचे ठरविले, तेव्हा सादिक सरकार खाली ओढण्याच्या बक्षींच्या हालचालींना अधिक जोर चढला. ज्यांच्या मालकीच्या मोटारी आहेत त्यांनाच ' रूट परमिटस् ' वाळगता येतील असा निर्बंध सादिक सरकारने जारी केला. त्यामुळे परमिटस् विकून बराच पैसा मिळवणारांची ही मिळकत गेली. बक्षी गटाचे बरेच लोक अशी कमाई करणारांपैकी होते. अर्थातच ते सादिक मंत्रिमंडळावर नाराज झाले. अनेक माजी मंत्र्यांविरुद्ध लाचलुचपतीचे आरोप करण्यात आलेले असून त्यांची चौकशी करणे सुलभ होण्याचे दृष्टीने माजी मंत्र्यांनाहि सार्वजनिक नोकर समजण्यात यावे, अशी तरतूद करणारे बिल चालू अधिवेशनात यावयाचे होते. आपणाला आता चौकशीस व खटल्यास तोंड द्यावे लागणार, यामुळे बक्षींचे सहकारी असलेल्या माजी मंत्र्यांत खळबळ उडाली होती.

**दिल्लीत स्थान राहिले नाही**

बक्षी कॉंग्रेस-श्रेष्ठींना दिल्लीत अनेकवेळा भेटले. विधानसभेच्या बहुसंख्य सभासदांचा आपणास पाठिंबा आहे, तेव्हा आपणाकडे पुन्हा मुख्यमंत्रिपदाची सूत्रे यावी, असा दावा त्यांनी मांडला. पण त्यांच्याकडे पुन्हः सूत्रे द्यावयाची नाहीत असे कॉंग्रेस-श्रेष्ठींनी ठामपणे ठरविले होते. परराष्ट्रीय क्षेत्रात किंवा हिंदच्या अंतर्गत क्षेत्रात बक्षींकडे काही कार्य सोपविता येईल हीही शक्यता श्रेष्ठींना दिसेना. अटकेपूर्वी एक आठवडा बक्षी दिल्लीहून परतले. तेव्हा कॉंग्रेसच्या मध्यवर्ती नेत्यांना आपली आता गरज उरलेली नाही, अशी त्यांची खात्री पटलेली होती. पण बक्षी स्वस्थ बसणारांपैकी नव्हते. सादिक सरकारला खाली ओढून पेचप्रसंग निर्माण करायचा व पुन्हा आपणास मुख्यमंत्रिपदावर आणणे केंद्र सरकारला भाग पाडावयाचे, या दृष्टीने पवित्रे टाकण्यास त्यांनी सुरवात केली. अविश्वासाच्या ठरावाचा पवित्रा त्यापैकीच एक होता.

**शेख अब्दुल्लांशी संधान**


सादिक

बक्षींनी आपल्या हालचाली एवढ्यापुरत्याच मर्यादित ठेवल्या असत्या तर कदाचित त्यांना यश आलेही असते. पण सत्तेमागे लागलेल्या माणसाचा विवेक सुटतो, तसे त्यांचे झाले. जातीयवादी व पाकधार्जिण्या गटांशी ते संधान जोडू लागले. दिल्लीत शेख अब्दुल्ला व बक्षी यांची भेट झाली तेव्हा हिंद-पाक सलोखा व समझोता घडवून आणण्यासाठी अबदुल्लांच्या बरोबर कार्य करण्याचे त्यांनी मान्य केले. यातील हिंद-पाक सलोख्याची भाषा हा केवळ देखावा होता. कॉंग्रेसच्या मध्यवर्ती नेतृत्वास आपणाशी तडजोड करण्यास भाग पाडावयाचे हे दोघांचेहि समान उद्दिष्ट होते व ते साधण्यासाठी

# स मा लो च न : वि वे च न

ताबडतोबीची गोष्ट म्हणजे सादिक सरकारला खाली ओढणे व काश्मीरचा कारभार आपल्या हाती घेण्यास केंद्र सरकारला भाग पाडणे. पंधरा सभासदांच्या बंडखोरीने केरळमधील शंकर मंत्रिमंडळ गडगडले व तेथील कारभार राष्ट्राध्यक्षाकडे सोपविण्यात आला, हा दाखला त्यांच्यापुढे होता. राष्ट्राध्यक्षांची राजवट आल्यास काश्मीर-मधील जनतेने सरकारविरुद्ध बंड केले म्हणून तेथे राष्ट्राध्यक्षांची राजवट लादण्यात आली, असा प्रचार करायला पाकिस्तानला चांगली संधी मिळेल व त्या परिस्थितीत आपल्याशी तडजोड करण्याचे दडपण हिंदवर आणता येईल, असा त्यांचा आडाखा होता.

बक्षींनी शेख अब्दुल्लाशी नुसतेच सधान बांधले नाही तर त्यांची मतेही त्यांच्यासारखीच झाली. काश्मीरचे हिंदमधील सामिलीकरण कायमचे असून त्यात आता बदल होणार नाही अशी भाषणे बक्षींनी पूर्वी अनेकदा केलेली आहेत. पण शेख अब्दुल्लाच्या मुक्ततेनंतर त्यांनी या विषयावर एकदाही न बोलता सोयीस्कर मौन राखले. काश्मीर प्रश्नावर तोड म्हणून काश्मीर स्वतंत्र ठेवण्याच्या योजनेला बक्षींनी पूर्वी विरोध केला होता. पण अटकेच्या आदल्याच दिवशी काश्मीर विधानसभेत केलेल्या भाषणात स्वतंत्र काश्मीरच्या कल्पनेचा त्यानी उघड नव्हे पण सूचक पुरस्कार केला होता. पंडित नेहरूंना श्रद्धांजली वाहणाऱ्या ठरावावर बोलताना साम्राज्यशाही व वसाहतवाद नष्ट करण्यासाठी पंडितजींनी केलेल्या प्रयत्नाचा गौरव करून बक्षी म्हणाले, " माल्टासारखा काही लाख वस्तीचा छोटा देशसुद्धा स्वतंत्र झाला आहे. माल्टा स्वतंत्र होऊ शकतो तर काश्मीरही स्वतंत्र का राहू शकणार नाही ?" असेच त्यानी सूचित केले असे अनेक सभासदांना वाटले. शेख अबदुल्लाच्या अटकेपूर्वी तेही असाच स्वतंत्र काश्मीरचा पुरस्कार करीत होते हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

## पाकधार्जिण्या गटाशी संबंध

बक्षींनी शेख अबदुल्लांप्रमाणेच मीरवैझ फरुकी याच्या गटाशीही संधान बांधले होते. हा गट काश्मीर पाकिस्तानला जोडावे या माग-णीचा उघड पुरस्कार करतो. या गटाच्या नेत्यांशी बक्षींनी संबंध ठेवावेत हे शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टीने निश्चितच धोक्याचे होते. म्हणून त्याना अटक करण्यात आली. बक्षीना अटक करण्याचा सादिक सरकारचा निर्णय चुकीचा नव्हता, पण हिंद सरकारला या महत्वाच्या निर्णयाची कल्पना देणे आवश्यक होते.

बक्षीच्या अटकेचा पाक नेत्यानी आपल्या प्रचारासाठी पुरेपूर उपयोग केला. शेख अब्दुल्ला गेले, बक्षी गेले आता सादिकहि जातील आणि काश्मीरमध्ये राष्ट्राध्यक्षाची राजवट येईल असा त्यांच्या टीकेचा रोख होता.

## 'ऑब्झर्व्हर'ची प्रतिक्रिया

काश्मीरमधील घटना परदेशी वार्ताहरांना कशा दिसतात हेही पाहण्यासारखे आहे. लंडनच्या 'ऑब्झर्व्हर' पत्राचा श्रीनगरमधील बातमीदार लिहितो, " काश्मीरशिवाय दुसरे एखादे राज्य असते तर तेथे अध्यक्षीय राजवटच आली असती. शेख अब्दुल्लांची अटक बक्षीं-नीच घडवून आणली असे म्हणतात, पण अब्दुल्ला ज्या तुरुंगात होते त्याच तुरुंगात आता बक्षीची रवानगी झाली आहे. मोगल बादशहांचे-नंतर एवढी लाचलुचपत व दहशत बक्षीशिवाय दुसऱ्या कोणाच्या कारकीर्दीत दिसली नव्हती, असे त्यांचे शत्रु म्हणतात. आपल्याविरुद्ध लाचलुचपतीचे आरोप तयार केले जात असता सादिक सरकारचे लक्ष दुसरीकडे वळवावे या उद्देशाने दंगली घडवून आणण्याचा बक्षीचा बेत होता, म्हणून त्यांना अटक झाली अशी दिल्लीची बातमी आहे. पण श्रीनगरात हे कोणी मान्य करीत नाही. येथे असे मानण्यात येते की बक्षींनी विधानसभेच्या स्पीकरविरुद्ध अविश्वास ठराव मांडण्याचे ठरविले होते. तो पास झाला असता तर विधानसभेवर सादिक याचे नियंत्रण नाही हे उघड होऊन दिल्लीला तिकडे दुर्लक्ष करणे शक्य झाले नसते. " लोकशाही वाचविण्यासाठीच सरकारने कडक उपाय योजले. "

बक्षीच्या अटकेपेक्षाहि महत्त्वाचा प्रश्न काश्मीरच्या भवितव्याचा आहे. शेख अब्दुल्लांच्या सुटकेनंतर याबाबतीत जे अनिश्चित वाता-वरण निर्माण झाले आहे, ते दूर करून सरकारने आपली भूमिका ठामपणे मांडणे आवश्यक आहे. ही भूमिका नुसती शब्दात न राहता कृतीत उतरविली गेली पाहिजे. आतापर्यंत हे न केल्यामुळेच काश्मीर प्रश्नाचा गेली सतरा वर्षे एवढा घोळ झाला.

## यूनोत प्रश्न नेण्यात चूक

पाकमधील टोळीवाल्यानी काश्मीरवर पहिले मोठे आक्रमण केले, त्या घटनेला येत्या ऑक्टोबरला सतरा वर्षे पुरी होत आहेत. या सतरा वर्षांनंतर काश्मीर प्रश्न आहे तेथेच आहे. एक जानेवारी १९४९ पासून युद्ध-तहकुबी करार अमलात आला. पण या कराराचा भंग करून पाक सैनिकानी हल्ले केल्याच्या बातम्या रोज येतच आहेत. काश्मीर प्रश्न यूनोत नेण्यात आपली फार मोठी चूक झाली. युद्ध-तहकुबी न करता आपल्या लष्करास काश्मीर मोहीम पुरी करण्याचा आदेश सरकारने दिला असता तर काश्मीर प्रश्न त्याचवेळी निका-लात निघाला असता. यूनोत आपणाला न्याय मिळणे बाजूलाच राहून प्रश्न रेंगाळला. पाकिस्तानी आक्रमणाच्या आपल्या मुख्य तक्रारीला बगल दिली गेली.

काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याचे आश्वासन द्यायला नको होते. त्यामुळेच काश्मीर प्रश्न सुटणे कठीण झाले आहे, अशी टीका केली जाते ती बरोबर नाही. राजाने केलेले सामिलीकरण कायम स्वरूपाचे न मानता प्रजेचे सार्वमत घेण्याचे आश्वासन आपण दिले ते आपल्या लोकशाहीनिष्ठेशी सुसंगतच होते. सार्वमतासाठी यूनो ठरावात घातलेल्या अटी पाकने पाळल्या नाहीत. लोकमताचा कौल घेणे हा जो सार्वमताचा मुख्य उद्देश तो निवडणुकांनी साध्य झाला असल्याने, आता सार्वमताची आवश्यकता नाही. तसेच सार्वमताला आवश्यक असे निकोप वातावरण आता राहिले नसून जातीय भावना चेतविल्या जात आहेत. अशा स्थितीत सार्वमतातून खरे लोकमत व्यक्त होण्याचा संभव नाही.

मग या प्रश्नावर तोड काय? आपल्या दृष्टीने काश्मीरचे हिंदमधे सामिलीकरण हे आता कायमचे झालेले असून त्यात आता कोणालाहि

बदल करता येणार नाही, हे आपण स्पष्ट केले पाहिजे. गेल्या वर्षा-भरातील वाटाघाटीचे गुन्हाळातून काहीच हाती लागले नाही हे लक्षात घेता पाकशी या बाबतीत आता वाटाघाटीचा घोळ घालवयाचा नाही, हेहि आपण स्पष्ट ठरवून टाकले पाहिजे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे काश्मीरचा कारभार सुधारला पाहिजे. पाक व चीन यांच्या सीमेस लागून असलेल्या राज्यात जनतेत असतोष असणे धोक्याचे आहे. काश्मिरी जनतेची परिस्थिती सुधारली, प्रगती झाली तर त्याचा परिणाम पाकच्या ताब्यातील काश्मीरवरहि होईल. हिंदच्या ताब्यातील काश्मीरमध्ये सामील होण्याची इच्छा तेथील जनतेतही बळावेल व त्यातच अखेर काश्मीरची सध्याची कृत्रिम फाळणी रद्द होऊन काश्मीर प्रश्न कायमचा सुटेल.

**: २ :**

# आपली लोकसभा सार्वभौम नाही !

उत्तर प्रदेश विधानसभा आणि हायकोर्ट याच्या हक्कांचे वादात सुप्रीम कोर्टाने आपला अभिप्राय व्यक्त करावा म्हणून राष्ट्राध्यक्षानी हा प्रश्न सुप्रीम कोर्टाकडे सोपविला होता. त्यावर सुप्रीम कोर्टाने आपला अभिप्राय नुकताच व्यक्त केला आहे. आपली लोकशाही मूलभूत हक्कांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यत महत्त्वाचा आहे.

सुप्रीम कोर्टाच्या अभिप्रायाचा विचार करण्यापूर्वी या साऱ्या प्रकरणाची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. उत्तर प्रदेशच्या गोरखपूर जिल्ह्यातील समाजवादी कार्यकर्ते केशवसिंग यानी आमदार नरसिंह नारायण पाडे यांच्या खास अधिकारांचा भंग करणारे आणि विधानसभेची बेअदबी करणारे वर्तन केले, म्हणून त्याना ताकीद देण्यासाठी त्यानी विधानसभेच्या सभागृहापुढे हजर व्हावे, असा आदेश स्पीकरनी दिला. पण केशवसिंग हजर राहिले नाहीत. त्याना वॉरंट काढून अटक करून आणावे लागले; एवढेच नव्हे तर उचलून विधानसभेत नेऊन ठेवावे लागले. केशवसिंग याना सात दिवसाच्या साध्या कैदेची शिक्षा देणारा ठराव विधानसभेत मजूर झाला. केशवसिंगांना उचलून तुरुंगाकडे पाठविण्यात आले ! यानतर लखनौ येथील एक वकील बी. सालोमन यांनी केशवसिंग याना हायकोर्टापुढे हजर करावे असा हेबियस कार्पस अर्ज केला. कोर्टाने तसा हुकूम दिला. या निर्णयाने आपला अपमान झाला म्हणून हायकोर्टाचे दोन न्यायमूर्ती व वकील सालोमन यानी विधानसभेपुढे उत्तर देण्यास हजर रहावे असे वॉरंट विधानसभेने त्याच्यावर काढले. विधानसभेच्या या वॉरंटाविरुद्ध त्या दोन न्यायमूर्तींनी हायकोर्टाच्या फुलबेंचपुढे अर्ज केला. यानंतर राष्ट्राध्यक्षांनी या प्रश्नावर सुप्रीम कोर्टाचे मत विचारले. केशवसिंग यांचा गुन्हा असा की त्यांनी 'आमदार पांडे यांच्या कृष्णकृत्यांवर प्रकाश' नावाचे पत्रक काढून ते वाटले व त्यासंबंधी स्पीकरना पाठविलेल्या पत्रात म्हटले की 'लाचखाऊला मी लाचखाऊच म्हणेन.'

## आपली पार्लमेंट सार्वभौम नाही

या वादात आपला अभिप्राय देताना सुप्रीम कोर्टाने असे मत व्यक्त केले की ब्रिटिश पार्लमेंट ज्या अर्थाने सार्वभौम आहे त्या अर्थाने आपली पार्लमेंट व विधिमंडळे सार्वभौम नाहीत. त्यांच्या अधिकाराना घटनेने मर्यादा घातल्या असून त्या मर्यादेतच त्यांना कार्य करता येईल. घटनेत आहे ती वस्तुस्थिती सुप्रीम कोर्टाने माडली; पण ब्रिटिश पार्लमेंटपेक्षा आपली पार्लमेंट कमी सार्वभौम म्हणजेच कमी दर्जाची ठरावी ही गोष्ट आमच्या खासदाराना बरीच लागलेली दिसते. घटनेत दुरुस्ती करून पार्लमेंट व विधिमडळाचे खास हक्क निश्चित करून घ्यावे, अशी सूचना करण्यात येत आहे. पार्लमेंटने सुप्रीम कोर्टाच्या अभिप्रायाचा विचार करण्यासाठी एक समिती नेमली आहे. उत्तर प्रदेश विधानसभेनेही एक समिती नेमली आहे.

विधिमंडळ श्रेष्ठ की न्यायालय श्रेष्ठ या दृष्टिकोनातून या प्रश्नाचा विचार करणेच चुकीचे आहे. ब्रिटनमध्ये लिखित घटना नाही. पार्लमेंटने पाडलेल्या अलिखित परपरामधून तेथील लोकशाही विकसित झाली असल्याने तेथे पार्लमेंट सार्वभौम आहे सुप्रीम कोर्टाने म्हटल्याप्रमाणे आपल्याकडची परिस्थिती निराळी असून आपल्याकडे लिखित घटना आहे व तीच सार्वभौम किंवा सर्वश्रेष्ठ आहे. घटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे म्हणून पार्लमेंट सार्वभौम आहे, असे म्हणता येणार नाही. घटनेत घालून दिलेल्या तरतुदीनुसार ही दुरुस्ती करता येते, म्हणजे घटनेच्या मर्यादेतच पार्लमेंटला कार्य करावे लागते.

## अखेर जनताच सार्वभौम

घटनेने पार्लमेंटचे अधिकार मर्यादित केलेले आहेत, तसेच न्यायालयाचेहि केले आहेत. घटनेचा अर्थ लावण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टाला आहे म्हणून सुप्रीम कोर्ट सार्वभौम आहे असे म्हणता येणार नाही. कारण सुप्रीम कोर्टालाहि घटनेच्या कक्षेतच निर्णय द्यावे लागतात. सुप्रीम कोर्टाने घटना सार्वभौम आहे असे म्हटले आहे. पण घटना सार्वभौम आहे म्हणण्यापेक्षा ही घटना तयार करणारी जनता सार्वभौम आहे असे म्हणणे अधिक योग्य होईल. लोकशाहीत लोक सार्वभौम नसतील तर त्या लोकशाहीला काही अर्थ नाही. लोकहिताचे उद्दिष्ट, लोकाच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट हेच अखेर सर्वांत महत्त्वाचे आहे. घटनेतील तरतुदीत याच उद्देशाने आतापर्यंत अठरा दुरुस्त्या करण्यात आल्या. सारे कायदे, नियम, निर्बंध अखेर माणसासाठी आहेत. माणूस त्याच्यासाठी नाही या कायदेकानूंचा तो गुलाम होता कामा नये. त्यात जखडला जाऊन त्याचा विकास खुंटता कामा नये. सुप्रीम कोर्टाच्या अभिप्रायाचे अनुषगाने घटनेत काही दुरुस्ती करणे आवश्यक आहे काय, या प्रश्नाचा विचार या भूमिकेवरून होणे आवश्यक आहे.

**— समीक्षक**

एकदा एक ग्रामीण कॉंग्रेसकार्यकर्ता व्याख्यान देत होता. "समाजवादी भारतात समाजवाद आणणे हे आमचे एक स्वप्न आहे."

"स्वप्न म्हणजे काय ?" प्रेक्षकांतून एक आवाज.

"स्वप्न म्हणजे झोपल्यावर पडते ते." कार्यकर्त्याने खुलासा केला.

*

"तुम्ही दिलेल्या आंब्यांतले चार आंबे नासके निघाले. परत देण्यासाठी आलो आहे." गिऱ्हाईक.

"कशाला आंबे आणण्याचा त्रास घेतलात. तुमचा शब्द काय आणि नासके आंबे काय, दोन्ही सारखेच." दुकानदार.

*

एक फिरता पुस्तक विक्रेता खोलीत शिरलेला पाहून कामात असलेला कंपनीचा मॅनेजर त्याला म्हणाला,

"हे पाहा, तुम्हाला काय सांगायचं ते थोडक्यात सांगा. आपल्या लोकांना कुठल्याही गोष्टीविषयी कमीतकमी बोलायचं ज्ञानच नाही."

"म्हणून तर साहेब मी डिक्शनऱ्या विकतो." असे म्हणून विक्रेत्यानं भलीमोठी डिक्शनरी मॅनेजरपुढे सरकवली.

*

"तुमचे केस फार गेले हो !"

"काळजीने"

"कसली काळजी ?"

"हीच. केस का जातात ?"

"मिस्टर बेंद्रयांनी कांहीही विनोद केला की मिसेस बेंद्रे आपल्या हसतात."

*

"अस्सं, विनोद चांगले असले पाहिजेत."

"शी: कसले ते विनोद !"

"मग सौ. बेंद्रे निदान शहाण्या दिसतात."

*

"बाबा, तुम्ही कुठे हो जन्मलात ?"

"मुंबईला."

"आणि आई ?"


"पुण्याला."

"आणि मी ?"

"पुण्यालाच."

"म्हणजे आम्हा दोघांना तुम्ही एकदम मुंबईला आणलंत ना ?"

*




# च का ट्या

जज्ज : आरोपी मलगोंडा, तू दोषी आहेस असे तुला वाटते का ?

आरोपी : पुरावा काय पुढं येतो ते पाहिल्याविगर, साहेब मी काय सांगणार ?

*

श्री. मूर्खप्रकाश यांनी कधी कसली कमाई केली नाही. घरात ज्या वडिलोपार्जित वस्तू होत्या त्या भाड्याने देण्याचा धंदा फक्त ते करीत. त्यांनी दारावर पाटी लावली,

'कोणतीही वस्तू भाडे-आकारणीने मिळेल.' त्यांच्या शेजारचे गृहस्थ श्री. अनंतराय यांना एकदा ताप आला. ते थर्मामीटर मागण्यासाठी श्री. मूर्खप्रकाश यांचेकडे गेले व म्हणाले,

"मला थर्मामीटर हवा आहे."

"भाडे पडेल." मूर्खप्रकाशांनी बजावले.

"चालू आहे की नाही ते पाहातो आणि मग ठरेल ते भाडे देतो."

ताप पाहून अनंतराय यांनी थर्मामीटर परत केला व ते म्हणाले,

"थर्मामीटर चालू आहे, पण तो मला आता नको आहे."

*

एकदा एक स्काऊटमधला मुलगा दुकानात गेला व त्याने काही लहानशा वस्तू खरेदी केल्या. दुकानदार त्या वस्तू कागदात बांधू लागताच तो म्हणाला, "तुम्ही वस्तू बांधू वगैरे नका. गुंडाळायचा दोरा आणि कागद फक्त माझ्याकडे द्या. मी स्काऊट आहे."

*

"स्त्रीच्या प्रेमात पडूनही जो नशीबवान ठरला, अशा तरुणाला तुम्ही काय म्हणाल?"

"ब्रह्मचारी"

*

—मूनलाईट— लॉंड्री.
येथे कपडे मशिनमध्ये बुडवून फाडले जात नाहीत. येथे सर्व काही हाताने केले जाते.

● ● ●

## शिवकथामाला

- लाल महाल
- प्रतापगड
- पन्हाळगड
- राजगड
- पुरंदर
- आग्रा



नुकताच प्रसिद्ध झालेला ऐतिहासिक
कथासंग्रह

**मुजऱ्याचे मानकरी**

[ तिसरे पुनर्मुद्रण ]

- मूल्य प्रत्येकी दोन रुपये केवळ

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण पेठ, पुणे २

## ब. मो. पुरंदरे कथासाहित्य

MANOOS FORTNIGHTLY : 15 OCTOBER 1964 : 125 PAISE R. N. B 9304

# दिवाळी १९६१ १९६३ माणूस

प्रभात फिल्म विशेषांक

मा. विनायक विशेषांक



या पाठोपाठ १९६४ माणूस दिवाळी अंक

## *सत्यजित रे विशेषांक*

१ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

सत्यजित रे

यांचा संपूर्ण जीवनपरिचय आणि त्यानी केलेली खडतर वाटचाल

त्यांच्या एकाहून एक सरस असणाऱ्या सर्व चित्रपटांच्या कथा

त्यांच्या कलाकृतींचे व कलाकारांचे

जाणकारांनी केलेले रसग्रहण

त्यांच्या चित्रपटांतील अनेक छायाचित्रे

या सर्व वैशिष्ट्यांनी आणि आकर्षणांनी

या विशेषांकाचे मोल अधिकच वाढले आहे.

★ *या शिवाय या अंकांत कथासाहित्य आहे ते यांचे....*

**• दि. बा. मोकाशी • विजय तेंडुलकर • वि. ग. कानिटकर**

**• डॉ. रंगनाथ देशपांडे • सौ. जयश्री खिरे • चंद्रशेखर मराठे**

'नाझी भस्मासुराचा उदयास्त' या चालू लेखमालेतील आठवा लेखांक

[झेकोस्लोव्हाकियाची विल्हेवाट]

**मूल्य एक रुपया पंचवीस पैसे फक्त**

एजंटांनी पंचवीस टक्के कमिशन वजा करून, म. ऑ. पाठवून मागणी नक्की करावी.
किरकोळ प्रत रजि. बुक. पोस्टने हवी असल्यास एक रुपया पंच्याहत्तर पैसे



**'माणूस', ४१९ नारायण, पुणे २**